# वृषाली जोशी

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा



# हर्क्युल पायरोच्या साहसकथा

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा


लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा

## कथांचा क्रम

अगाथा ख्रिस्ती


1. विजयाचा नाचाच्या वेळचे प्रकरण
2. मिस्टर दवेनहेम गायब
3. किल्वर राजा
4. जॉनी वॅव्हर्लीचे साहस
5. प्लायमाउथ एक्सप्रेस
6. चॉकलेटचे खोके

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी ‘The Mysterious Affair of Styles’ ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या

गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. ‘And then There Were None’ यावर आधारित हिंदी सिनेमा ‘गुमनाम’ तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या सहा गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

# THE AFFAIR AT THE VICTORY BALL

# विजयाच्या नाचाच्या वेळचे प्रकरण



माझा मित्र हरक्युल पायरो हा निव्वळ नशीबाने स्टइल केसशी संबंधित असणाऱ्या बेल्जियन पोलिसांचा मुख्य बनला. त्याच्या यशाने त्याला प्रसिद्ध बनवले. मग त्याने गुन्ह्यांमधील प्रश्न सोडवण्याच्या कामी स्वतःला वाहून घेण्याचे ठरवले. सोमे येथे जखमी होऊन, अपंग झाल्याने मी सैन्यदलाबाहेर पडलो. नंतर लंडनमध्ये मी त्याच्याबरोबर राहू लागलो. मला त्याच्या बहुतेक केसेसमधील 'ऑखो देखा हाल' माहिती असल्याने, मला असे सुचवण्यात आले, की मी त्यापैकी काही रुचीपूर्ण केसेस निवडून त्या लिहून काढाव्यात. असे करतांना, विचित्रपणे लोकांमध्ये

स्वारस्य उत्पन्न केलेल्या विजयाच्या नाचाच्या वेळच्या प्रकरणाबद्दल सुरवातीला लिहावे, असे मी ठरवले. *[पहिल्या महायुद्धातील विजयानंतरचा, मुखवटे व वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालून करायचा प्रसिद्ध इटालियन नाच/प्रहसन, "The Commedia dell' Arte,"]*

कदाचित जरी पायरोच्या वैशिष्ट्यपूर्ण उकलीसाठी प्रसिद्ध असलेल्या केसपैकी ती नसली, तरी तिचे लोकांना उद्दीपित करणारे पैलू, त्यातील लोकोत्तर लोकांचा सहभाग, माध्यमांनी त्याला दिलेली अमाप प्रसिद्धी व ती लोकांच्या परस्परविरोधी मतांच्या चर्चेचा विषय होणे, यामुळे मला असे वाटले की पायरोने ती कशी सोडवली, ते सर्वांना समजले पाहिजे.

## एक

ती उन्हाळ्यातील रम्य पहाट होती. आम्ही पायरोच्या घरी बसलो होतो. माझा लहानसा मित्र नेहमीप्रमाणे, नीटनेटका व व्यवस्थित पोषाख केलेला होता. एका बाजूला कललेले, अंड्याच्या आकाराचे डोके असलेला तो त्याच्या मिशांना नवीन पोमेड लावत होता. पायरोचा विशिष्ट निरुपद्रवी अभिमान हा त्याच्या सर्वसामान्य शिस्तीशी व पद्धतीशी रमण्याच्या प्रेमाचा भाग

होता. मी वाचत असलेले रोजचे वर्तमानपत्र माझ्या हातून खाली जमिनीवर पडले. मी माझ्या विचारांमध्ये गुंग होतो. तेव्हा मला पायरोचा आवाज ऐकू आला,

"माझ्या मित्रा, एवढ्या कसल्या विचारात मश्गुल झाला आहेस?

मी उत्तरलो, "खरे सांगायचे तर, मी या विजयाच्या वेळेच्या नाचाच्या न समजणाऱ्या प्रकरणाने गोंधळून गेलो आहे. मी बोलतांना कागदावर टिचक्या मारत होतो.

"हो?"

"एखादा जितका जास्त त्याबद्दल वाचतो, तितके जास्त ते गूढ अस्पष्ट होत जाते." मी माझ्या मूळ मुद्द्याकडे वळलो. उमराव क्रोनशॉला कुणी मारले? कोको कोर्टेनेचा त्याच रात्री झालेला मृत्यु हा निव्वळ योगायोग होता? की तो अपघात होता? की तिने मुद्दाम कोकेनचा जास्त डोस घेतला होता?" मी थांबलो व नाटकीपणे म्हणालो, "हे प्रश्न मी स्वतःला विचारत होतो."

मला राग येईल, अशा रीतीने पायरो काहीच बोलला नाही. तो आरशात बघताना पुटपुटला, "हे नवीन पोमेड मिशांसाठी नक्कीच नवलपूर्ण आहे!"

तरीही माझ्या नजरेला नजर देत, तो घाईने पुढे बोलला, “ते तसेच असेल --- तू तुझ्या प्रश्नाला कसे उत्तर दिलेस?”

पण मी उत्तर देण्यापूर्वी, घरमालकीण इन्स्पेक्टर जापला घेऊन आली.

तो स्कॉटलंड यार्डचा माणूस आमचा जुना मित्र होता. आम्ही त्याचे यथोचित स्वागत केले.

पायरो ओरडला, “अरे भल्या माणसा, “तू आम्हाला भेटायला कसा काय आलास?”

जापने बसत, माझ्याकडे वळून डोके झुकवत म्हटले, “त्याचे काय आहे, मिस्टर पायरो, माझ्याकडे एक केस आली आहे. ती मला तुझ्या योग्यतेची वाटते आहे. कृपया, तू त्यात लक्ष घालशील का?”

जरी जापची पद्धतशीरपणे न जाण्याची वाईट सवय पायरोला पसंत नसली, तरी त्याला त्याच्या क्षमतेची चांगली जाणीव होती. पण माझ्यापुरते मी असे समजत होतो, की गुप्तहेराचा सर्वात मोठा गुण कुठला असेल, तर तो म्हणजे सर्वांची मान्यता मिळेल, असा देखावा निर्माण करणे.

जाप पाठपुरावा करत बोलला, “तो विजयाच्या वेळेचा नाच होता. चल, आता तुला त्यात डोके घालावेसे वाटेल.

पायरो माझ्याकडे बघून हसला.

“माझा मित्र हेस्टींग्ज सर्व प्रसंगी या विषयावर पकड घेऊन असतो. नाही का, मित्रा?

वरचढपणा दाखवत, जाप बोलला, “तू पण त्यात असशील. मी सांगतो, यामुळे तुझ्या शिरपेचात मानाचा तुरा खोचला जाईल. मिस्टर पायरो, मला वाटते, तुला या केसमधील महत्वाचे मुद्दे माहिती आहेत.”

“पत्रकारांचा अंदाज कदाचित चुकीचा असू शकतो. तर फक्त कागदांच्या आधारे तू मला सगळी हकीगत सांग.”

जापने त्याचे पाय आरामशीरपणे एकमेकावर टाकले व सुरवात केली.

“सगळ्या जगाला व क्रोनशॉच्या बायकोलाही माहिती होते, त्याप्रमाणे, गेल्या मंगळवारी विजयाचा आनंद साजरा करण्याचा नाचाचा मोठा कार्यक्रम क्रोनशॉने आखला होता. हल्ली कुठेही फालतू नाचाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. पण हा कोलोस्युस हॉलमध्ये आखलेला खरा कार्यक्रम होता. तिथे सर्व लंडन लोटले होते. त्यात क्रोनशॉ व त्याचा गटही होता.”

पायरो मध्येच बोलला, “त्याची खासगी माहिती? म्हणजे त्याचे चलतचित्र --- नाही, तुम्ही त्याला काय म्हणता --- जीवनचरित्र? ते सांग.”

“उमराव क्रोनशॉ हा पंचवीस वर्षांचा पाचवा उमराव होता. श्रीमंत, अविवाहित आणि सिनेमा नाटकांचे वेड असलेला! अल्बाने थिएटरच्या मिस कोर्टेनेबरोबर त्याचा साखरपुडा झाल्याची अफवा होती. ती तिच्या मैत्रिणींमध्ये कोको या नावाने संबोधली जात असे. ती फार आकर्षक तरुण स्त्री होती.”

“छान, चालू ठेव.”

“उमराव क्रोनशॉच्या गटात सहा लोक होते. तो स्वतः, त्याचा काका, माननीय युस्टास बेल्टाने, सुंदर अमेरिकन विधवा मिसेस मालाबाय, तरुण नट ख्रिस डेव्हिडसन, त्याची बायको व शेवटची पण महत्वाची मिस कोको कोर्टेने. तो वेगवेगळ्या प्रकारचे कपडे परिधान करून व मुखवटे लाऊन करायचा ‘कॉमेडिया डेल आर्टे’ नावाचा नाच होता. क्रोनशॉचा गट --- तो कसा का असेना, पण जुन्या इटालियन विनोदी पात्रांचा गट होता.”

पायरो पुटपुटला, “विनोदी पात्रांचा गट --- कलात्मक गट! मला माहिती आहे.”



युस्टास बेल्टानेच्या संग्रहातील चिनी कपड्यांप्रमाणे कपडे शिवले गेले. उमराव क्रोनशॉ हर्लेक्विन झाला. बेल्टाने पंचीनेलो झाला. मिसेस मालाबाय पल्सीनेला म्हणून त्याची जोडीदार झाली. मिस्टर व मिसेस डेव्हिडसन्स पायरॉट व पायेरेट झाले आणि मिस कोर्टेने अर्थात कोलंबाईन झाली. आता संध्याकाळी लवकर हे सरळ दिसत होते, की काहीतरी चुकले होते. उमराव क्रोनशॉ वेगळ्या मनस्थितीत असून विचित्र वागत होता. क्रोनशॉने ठरवलेल्या, एका लहानशा खोलीत ते सगळे संध्याकाळच्या खाण्यासाठी जमले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की मिस कोर्टेने व क्रोनशॉ एकमेकांशी बोलत नाही आहेत. ती अर्थात रडत होती आणि बेभान व्हायच्या काठावर होती. खाणे आरामशीरपणे चालले नव्हते. ते सर्व त्या खोलीच्या बाहेर पडले, तेव्हा मिस कोर्टेने ख्रिस डेव्हिडसनकडे वळली व तिने त्याला मोठ्या आवाजात विनंती केली, की ती नाचून दमल्यामुळे, त्याने तिला घरी सोडावे. तो तरुण नट उमराव क्रोनशॉकडे बघत, हो नाही करू लागला आणि शेवटी त्याने त्या दोघांना परत त्या खोलीत नेले.

पण तिला शांत करायचा सर्व प्रयत्न फोल ठरला. त्याने एक टॅक्सी बोलावून, शोक करणाऱ्या मिस कोर्टेनेला तिच्या घरी सोडले. जरी ती फार उदास असली, तरी तिचा डेव्हिडसनवर विश्वास नव्हता. ती तेच तेच परत परत सांगत होती, की 'त्या क्रोनशॉला याबद्दल मी माफी मागायला लावेन.' आपल्याकडे तिचा मृत्यू हा अपघात नसल्याचा तेवढाच निर्देशक आहे. ती छोटीशी महत्वाची गोष्ट आहे.  डेव्हिडसनने तिला थोडेफार शांत करेपर्यंत, त्याला कोलोस्युस हॉलमध्ये परत जायला फार उशीर झाला. त्यामुळे तो सरळ चेल्सीमधील त्याच्या सदनिकेवर गेला. तिथे थोड्या वेळाने त्याची बायको आली. तो गेल्यावर तिथे काय भयंकर दुःखद घटना घडली, ती बातमी तिने त्याला दिली.

असे वाटते, की नाच जसजसा पुढे गेला तसतसा उमराव क्रोनशॉ जास्त जास्त मनस्वी होत गेला. तो त्याच्या गटापासून लांब राहिला होता. उरलेल्या संध्याकाळभर गटातील कोणी त्याला क्वचितच पाहिले. पहाटेचा दीड वाजला, तेव्हा सगळ्यांनी त्यांचे चेहऱ्यावरचे मुखवटे काढून ठेऊन, भव्य इटालियन नाचाला सुरवात केली.  ऑफिसर कॅप्टन डीगबायला हर्लेक्विनचा पोषाख माहिती होता. हर्लेक्विन झालेला क्रोनशॉ  बॉक्समध्ये बसून, खालील दृष्य निरखत होता.

त्याने हाक मारली, “अरे क्रोंच, खाली येऊन सगळ्या लोकांमध्ये मिसळ. एखाद्या घुबडासारखा वर बसून काय करतो आहेस? खाली ये. आता छान मजा येऊ लागली आहे.”

क्रोनशॉ उत्तरला, “बरोबर. माझ्यासाठी थांब. गर्दीत तू मला सापडणार नाहीस.”

बोलून क्रोनशॉ बॉक्समधून बाहेर पडला. कॅप्टन डीगबाय वळला व  मिसेस डेव्हिडसन बरोबर थांबला. बरीच मिनिटे गेली. पण उमराव क्रोनशॉ आला नाही. शेवटी डीगबाय अधीर झाला.

तो ओरडला, “त्याला असे वाटते आहे की काय, की आम्ही सारी रात्र त्याची वाट बघत थांबू?

त्याच क्षणी मिसेस मालाबाय तिथे अवतीर्ण झाली. त्यांनी तिला परिस्थिती समजावून सांगितली.

ती सुंदर विधवा आकर्षकपणे ओरडली, “तो आज डोके चढलेले  अस्वल आहे. आपण जाऊन हाकलत त्याला आणू.”

क्रोनशॉचा शोध सुरु झाला. पण यशस्वी झाला नाही. मग मिसेस मालाबायला वाटले, की तासापूर्वी ज्या खोलीत त्यांनी खाणे खाल्ले, तिथे तो असेल. ते तिकडे गेले. तर तिथे त्याना काय दिसले! तो नक्की हर्लेक्विन होता. पण त्याच्या छातीत सुरा खुपसलेल्या अवस्थेत तो जमिनीवर पडला होता.

जाप थांबला. पायरोने मान हलवली व विशेष प्रकारे खूष होत म्हणाला,

“बापरे, हे काही मोठे प्रकरण दिसते आहे. मेलेल्याने बेकायदेशीर व अनैतिक कृत्य केल्याचा काही सुगावा सापडत नाही. पण तो कसा असणार!”

इन्स्पेक्टर बोलला, “बाकी तुला माहिती आहे. ही दुहेरी शोकांतिका होती. दुसऱ्या दिवशी सगळया वर्तमानपत्रात मथळा होता आणि छोटीशी पुस्ती जोडलेली होती, काल लोकप्रिय नटी, मिस कोर्टेने, तिच्या अंथरुणात मृतावस्थेत सापडली. तिचा मृत्यू अती प्रमाणात कोकेन घेतल्याने झाला. आता हा अपघात होता की आत्महत्या होती? तिच्या नोकराणीला साक्ष देण्यासाठी बोलावले गेले, तेव्हा तिने कबूल केले, की मिस कोर्टेने ही निश्चितपणे मादक पदार्थ सेवन करत होती. त्यामुळे अपघाती मृत्यूची शक्यता मावळली. पण आपण आत्महत्येच्या शक्यतेकडे डोळेझाक करू शकत नाही. तिचे मरण दुर्दैवी होते. त्याने आधीच्या रात्रीचा भांडणाचा काही पुरावा सोडलेला नव्हता. पण मृत माणसाजवळ एक एनॅमलची डबी सापडली. त्यात हिऱ्यांनी कोको असे लिहिलेले होते व ती अर्धी कोकेनने भरलेली होती. मिस कोर्टेनेच्या नोकराणीने, ती तिच्या मालकिणीची असल्याचे

ओळखले. ती नेहमी तिच्याजवळ असे. कारण ती डबी ती गुलाम बनलेल्या मादक पदार्थाची  होती.”

“उमराव क्रोनशॉसुद्धा मादक पदार्थांच्या आहारी गेलेला होता का?”

“तो त्यापासून फार लांब होता आणि त्याचा त्यासंबंधीचा दृष्टीकोन खूप कडक स्वरूपाचा होता.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली.

“पण डबी त्याच्याजवळ सापडली, त्याअर्थी मिस कोर्टेनेने ती घेतल्याचे त्याला माहिती होते.”

“अरे बाबा जाप, हे उलटे सुचवते, की ती तिने घेतली नव्हती.”

“ओहो!” जाप निरर्थकपणे बोलला.

मी हसलो.

जाप बोलला, “तर मग ही केस अशी आहे तर! तुला त्याबद्दल काय वाटते?”

“तुम्ही ज्याचा अहवाल दिला, असा कुठलाच सुगावा सापडला नाही?

जापने त्याच्या खिशातून एक बारीकशी वस्तू काढली व पायरोला दिली. तो एक हिरव्या रेशमी कापडाचे धागे लोंबत असलेला गोंडा होता. तो ओढून दूर फेकल्यासारखा वाटत होता.

इन्स्पेक्टरने स्पष्ट केले, “तो मृत मनुष्याच्या हातात होता व बोटांमध्ये घट्ट धरलेला होता.”

पायरोने काही शेरा न मारता, तो परत केला व विचारले, “उमराव क्रोनशॉला कुणी शत्रू होते का?”

“असे असल्याचे कुणाला माहिती नाही. तो लोकप्रिय तरुण माणूस होता.”

“त्याच्या मरणाने कुणाचा फायदा होणार होता?”

“त्याचे काका, माननीय युस्टास बेल्टाने यांच्या नावावर इस्टेट झाली असती. इथे त्याच्या विरुद्ध एकदोन संशयास्पद बाबी आहेत. बऱ्याच लोकांनी सांगितले, की सर्वांनी खाणे केलेल्या खोलीतून त्यांनी मोठ्या आवाजात दुमत होऊन वादावादी झाल्याचे आवाज ऐकले. त्यापैकी एक आवाज युस्टास बेल्टानेचा होता. भांडणाच्या भरात टेबलावरील सुरा उचलून खून झाला असावा.

“मिस्टर बेल्टाने या बाबतीत काय म्हणतात?”

एक वेटर म्हणाला रात्रीचा दीड वाजून गेल्यावर, त्याला रागारागाने भांडल्याचे आवाज आले. कॅप्टन डीगबायचा पुरावा व वेळ चांगल्यापैकी जमते. क्रोनशॉशी बोलल्यापासून, त्याचे प्रेत सापडेपर्यंत, मध्ये फक्त दहा मिनिटे गेली होती."

"कुठल्याही प्रकारे, मला वाटते, पंचीनेलोच्या भूमिकेतील बेल्टानेने पोंगा आलेले झालरवाले कपडे घातले होते का?"



जाप चौकसपणे पायरोकडे बघत बोलला, "मला त्याने बरोबर कसे कपडे घातले होते, ते माहिती नाही आणि तसेही खुनाचा त्याच्याशी काय संबध आहे?"

पायरोच्या हास्यात चेष्टेचा सूर होता. त्याच्या डोळ्यातून हिरवा प्रकाश चकाकत होता. तो शांतपणे बोलला, "नाही? या लहानशा खोलीत पडदा होता, नाही का?"

"हो. पण --- "

“त्या पडद्यामागे एखादा माणूस लपू शकेल, इतकी जागा होती.”

“हो. खरे तर, तिथे तशी जागा होती, पण हे तुला कसे माहित? मिस्टर पायरो, तू तर तिथे गेलाही नव्हतास, नाही का?”

“नाही प्रिय जाप, मी माझ्या डोक्याने ते शोधून काढले. त्याशिवाय नाटक खरेखुरे ठरणार नाही. पण मला सांग, त्यांनी डॉक्टरला बोलावले नाही का?”

“लगेच बोलावले. पण काही करण्यासारखे नव्हते. मृत्यू तत्काळ आला असणार.”

पायरोने अधीरपणे मान हलवली.

“हो. हो. मला समजले. या डॉक्टरने आता सुनावणीदरम्यान हा पुरावा दिला का?”

“हो.”

“त्याने काही वेगळ्या लक्षणांबद्दल सांगितले नाही का? --- त्याला शरीर काही वेगळे वाटले नाही का?”

जापने त्या छोट्या माणसाकडे रोखून पाहिले.

“हो, मिस्टर पायरो. तुला काय म्हणायचे आहे, मला कळत नाही. पण त्याने हात कडक झाल्याचे पाहिले. त्यामुळे तो मरून

काही वेळ झाला असणार, असे त्याला कळले पण तो ते सांगायचे विसरला.”

पायरो म्हणाला, “अरे बापरे, जाप, यावर विचार करावा लागेल, नाही का?”

मी पाहिले की जापला यावर निश्चितपणे विचार करावासा वाटला नव्हता.

“मिस्टर, तुम्हाला असे वाटत असेल, की पहिल्यांदा त्याला विष दिले गेले व नंतर त्याला सुऱ्याने भोसकले, तर असे कोण करेल?”

पायरो शांतपणे बोलला, “खरे तर हे काही वेडेवाकडे दिसते आहे.”

“मिस्टर, तुम्हाला प्रेत बघायचे आहे का? प्रेत असलेली खोली तुम्हाला तपासायची आहे का?”

पायरोने त्याचा हात नकारार्थी हलवला.

“अजिबात नाही. तू मला उमराव क्रोनशॉचा मादक द्रव्य सेवनासंबंधीचा दृष्टीकोन सांगितलास, त्यात मला स्वारस्य आहे.”

“तर मग तुला काही बघायचे नाही?”

“फक्त एकच गोष्ट.”

"कुठली?"

युस्टास बेल्टानेच्या संग्रहातील ज्या चिनी कपड्यांबरहुकूम कपडे शिवले गेले. होते, तो कपडेपट!"

जाप बघत राहिला.

"तू विनोदी आहेस!"

"तू असे म्हणू शकतोस."

"जर तुला यायचे असेल तर बर्कले चौकात चल. मिस्टर बेल्टाने --- किंवा त्याची माणसे, मला वाटते, अडवणार नाहीत."

## दोन

आम्ही लगेच टॅक्सीने निघालो. तेथील नवीन उमराव घरी नव्हता, पण जापने विनंती केल्याने, आम्हाला जिथे उत्तमोत्तम कपडे ठेवलेले होते, त्या चिनी कपडेपटाच्या खोलीत सोडण्यात आले. जापने त्याच्या भोवती असहाय्यपणे पाहिले.

"मिस्टर पायरो, तुला पाहिजे असलेले तू कसे काय शोधून काढणार, ते मला कळत नाही."

पण पायरोने अगोदरच शेकोटीसमोर खुर्ची ओढून घेतली होती आणि तो रॉबिन पक्षासारखा चपळपणे उड्या मारत होता. आरशावर एका मांडणीत सहा चिनी आकृत्या/ छोटे पुतळे ठेवलेले होते. ते पायरोने सूक्ष्मपणे तपासले. ते बघतांना त्याने त्यावर काही भाष्यही केले.

“इकडे बघा. जुने इटालिअन विनोदी नाटक. तीन जोड्या! हर्लेक्विन आणि कोलंबाईन, पायरॉट व पायेरेट --- फार लहान व नाजूक आणि पांढऱ्या व हिरव्या रंगात! पंचीनेलो व पल्सीनेला कोनफळी व पिवळया रंगात --- फार स्पष्टपणे, पंचीनेलोचे कपडे --- चुण्या व झालरी, एक बोंगा, एक उंच टोपी. हो, मी विचार केला होता तसेच!”

त्याने ते छोटे पुतळे परत होते, तसे ठेवले आणि खाली उडी मारली.

पायरोचा स्पष्टपणे काही बोलायचा विचार न दिसल्याने, जाप असमाधानी दिसत होता. पायरोने त्याचा चेहरा ठेवता येईल तेवढा बरा ठेवला होता. आम्ही तिथून निघायचा विचार करत असतांना घराचा मालक आत आला. जापने गरज असलेल्या ओळखी करून दिल्या.

सहावा उमराव क्रोनशॉ साधारण पन्नाशीचा माणूस असून, तो आल्हादक चेहऱ्याचा, उमदा व देखणा होता. नक्कीच वयाने मोठा व अशक्त असूनही, तसे नसल्याचे भासवत होता. त्याच क्षणी तो माझ्या मनातून उतरला. त्याने डौलदारपणे आमचे स्वागत केले. त्याने पायरोची कीर्ती ऐकली असल्याचा उल्लेख केला व आमची खातीरदारी करू लागला.

पायरो बोलला, “पोलीस शक्य तेवढे सर्व काही करत आहेत, हे मला माहिती आहे.”

“पण माझ्या पुतण्याच्या मृत्यूचे गूढ कधीच उकलणार नाही, अशी भीती मला वाटते आहे. सर्व काही फारच अनाकलनीय वाटते आहे.”

पायरो त्याचे सूक्ष्म निरीक्षण करत होता. “तुमच्या पुतण्याला कुणी शत्रू असल्याचे तुमच्या कानावर होते का?”

“कोणीच नाही. त्याबद्दल माझी खात्री आहे.” थोडे थांबून तो बोलला, “जर तुम्हाला काही प्रश्न विचारायचे असतील, तर --- “

पायरोचा आवाज गंभीर होता. “एकच विचारायचा आहे. या कपडेपटातील छोट्या पुतळ्यांवरून, हुबेहूब तसेच कपडे शिवले गेले होते ना?”

“अगदी जसेच्या तसे!”

“आभारी आहे, महाशय. एवढेच मला हवे होते. शुभ दिवस.”

आम्ही घाईने रस्त्यावर उतरल्यावर जाप बोलला, “आता पुढे काय? तुला माहिती आहे की मला यार्डमध्ये अहवाल द्यावा लागेल.”

“छान! मी तुला अडवणार नाही. मला दुसरे एक काम आहे आणि मग --- “

“अस्स?”

“ही केस पूर्ण होईल.”

“काय? तू असे कसे काय म्हणू शकतोस? उमराव क्रोनशॉला कुणी मारले, हे तुला माहिती आहे का?”

“पूर्णपणे!”

“तो कोण होता? युस्टास बेल्टाने?”

“अरे मित्रा, तुला माझ्यातील उणीव माहिती आहे. शेवटच्या मिनिटापर्यंत सर्व धागेदोरे मी स्वतःच्या हातात ठेवायची इच्छा करतो. पण मला भीती वाटत नाही. वेळ येईल, तेव्हा मी सर्व काही सांगेन. मला त्याबद्दल मोठेपणा नको --- तू मला माझ्या पद्धतीने पुढचे सर्व काम करू देशील, या अटीवर हे प्रकरण तुझे आहे.”

जाप बोलला, “पुरे झाले. म्हणजेच गूढाची उकल असलेला शेवटचा भाग आलाच तर! पण मी म्हणतो, तू [ गुपित राखून ठेवणारा ] मिटलेला शिंपला आहेस, नाही का?”

पायरो हसला. “पण कितीतरी काळ मी स्कॉटलंड यार्डपासून दूर आहे.”

जाप लांब ढांगा टाकत रस्त्याने निघाला आणि पायरोने एक टॅक्सी घेतली.

मी कुतुहलाने विचारले, “आता आपण कुठे चाललो आहोत?”

“डेव्हिडसनला भेटायला चेल्सीला.”

त्याने टॅक्सीचालकाला पत्ता दिला.

मी विचारले, “तुला नवीन उमराव क्रोनशॉबद्दल काय वाटते?”

“माझा चांगला मित्र हेस्टींग्ज काय म्हणतो आहे?”

“माझा त्याच्यावर विश्वास नाही.”

“तुला तो गोष्टीतील दुष्ट काका वाटतो का?”

“तुला नाही वाटत का?”

पायरो सालसपणे म्हणाला, “मला वाटते तो आपल्याशी फार मित्रत्वाने चांगला वागतो आहे.”

“त्याच्याकडे त्याची कारणे आहेत.”

पायरोने माझ्याकडे पाहिले व उदास होऊन मान हलवली. तो काही पुटपुटला, ते ‘अशी पद्धत नाही’ असल्यासारखे वाटले.

## तीन

डेव्हिडसन अनेक सदनिका असलेल्या इमारतीत, तिसऱ्या मजल्यावर रहात होता. आम्हाला सांगण्यात आले, की मिस्टर डेव्हिडसन बाहेर गेले आहेत पण मिसेस डेव्हिडसन घरी आहेत. आम्ही एका लांबलचक बुटक्या खोलीमधून, चकचकीत व दिखाऊ मोत्यांच्या लटकणाऱ्या वस्तूंखालून गेलो. हवा गच्च व दबलेली वाटत होती आणि उदबत्तीच्या काड्यांचा उग्र वास येत होता., छोट्याशा व उजळ मिसेस डेव्हिडसन लगेच आल्या. त्यांच्या फिकट निळसर डोळयात गर्विष्ठपणा व लबाडीची चमक होती. त्या दयनीयपणे नाजूक दिसत होत्या.

पायरोने आमचा केसशी असलेला संबंध सांगितल्यावर तिने दुःखाने डोके हलवले.

"बिचारा क्रोंच व कोको! ती आमच्या दोघांची खूप आवडती होती. तिचा मृत्यू आमच्यासाठी मोठा धक्का आहे. तुम्हाला मला काय विचारायचे आहे? पुन्हा त्या भयंकर संध्याकाळचा आढावा घ्यायलाच हवा का?"

"ओहो बाईसाहेब, माझ्यावर विश्वास ठेवा. मी कारणाशिवाय तुमच्या भावना दुखावणार नाही. खरे तर मला इन्स्पेक्टर जापने जरूर ते सर्व सांगितले आहे. मला फक्त तुम्ही नाचाच्या दिवशी घातलेले कपडे बघायचे आहेत."

त्या बाईने माझ्याकडे आश्चर्याने बघितले. पायरोने पुढे चालू ठेवले, "बाईसाहेब, मी माझ्या देशाच्या पद्धतीप्रमाणे वागतो. तिथे आम्ही गुन्हा परत निर्माण करतो. मला पुन्हा तो प्रसंग उभा करणे शक्य आहे. तुम्हाला समजेल, की त्यासाठी त्यावेळचे कपडे जरुरीचे आहेत."

तरीही मिसेस डेव्हिडसन थोडी संशयी वाटत होती.

ती बोलली, "मी अर्थात गुन्हा परत निर्माण करण्यासंबंधी ऐकले आहे. पण त्यात तुम्ही इतके खोलवर जात असाल, याची मला कल्पना नव्हती. पण मी ते कपडे आता आणते."

ती गेली आणि एक विस्कटलेली पांढऱ्या व हिरव्या रंगाची सॅटीनची  बारीकशी, नाजूक व सुंदर घडी घेऊन आली. पायरोने ती घेऊन, छडीने मागेपुढे करत नीट तपासली.

“बाईसाहेब, मी आपला आभारी आहे. पण हे तुमचे दुर्दैव आहे, की खांद्यावरील शोभेचा एक हिरवा गोंडा हरवलेला दिसतो.”

“बरोबर. तो नाचाच्या वेळी तुटला. मी तो उचलून माझ्यासाठी बिचाऱ्या उमराव क्रोनशॉकडे ठेवायला दिला.”

“हे खाण्यानंतर झाले का?”

“हो.”

“कदाचित, ती दुर्घटना घडायच्या फार आधी ते झाले नसावे का?

मिसेस डेव्हिडसनच्या फिकट डोळ्यात, एक धोकादायक झलक दिसली आणि तिने तत्परतेने उत्तर दिले, “नाही. नाही. त्यापूर्वी बराच वेळ. खरे तर खाण्यानंतर लगेच.”

“अस्स! ठीक आहे, एवढेच. मी तुम्हाला अजून त्रास देणार नाही. शुभ दिवस, बाईसाहेब.”

आम्ही इमारतीच्या बाहेर पडलो. मी म्हणालो, “हिरव्या गोंड्याचे गूढ अशा तऱ्हेने स्पष्ट झाले आहे.”

“मला नवल वाटते.”

“का? तुला काय म्हणायचे आहे?”

“हेस्टींग्ज, तू मला तिच्या कपड्यांची तपासणी करतांना बघितलेस?”

“हो.”

“ठीक आहे. तो हिरवा गोंडा, ती बाई म्हणाली त्याप्रमाणे तुटून पडला नाही. तर मुद्दाम तोडला गेला. कात्रीने कापला गेला. दोरे अगदी एकसारखे दिसत होते.”

मी ओरडलो, “अरे बापरे, हे गूढ अजूनच वाढत चालले आहे.”

पायरो शांतपणे बोलला, “उलट, ते जास्त जास्त सोपे होत चालले आहे.”

मी ओरडलो, “पायरो, एक दिवस मी तुझा खून करेन. सर्व काही शोधून काढायची तुझी पद्धत एकदम साधी आहे व टोकाचा राग आणणारी आहे.”

“पण मित्रा, मी जेव्हा स्पष्ट करतो, तेव्हा ते एकदम साधे सोपे वाटते की नाही?”

“तोच तर राग येण्यासारखा भाग आहे. मला वाटते, हे तर काय मी देखील शोधून काढले असते.”

“हेस्टींग्ज, तू हे करू शकतोस. नक्कीच करू शकतोस. फक्त तुझ्या कल्पना सुसंगतपणे मांडायचा त्रास घे. काही पद्धतीशिवाय --- “

मी घाईने म्हणालो, “हो. हो.” कारण मला माहिती होते, की एकदा पायरोच्या आवडत्या विषयावर त्याचे प्रवाही बोलणे सुरु झाले, की ते लवकर संपणे कठीण असते. मी म्हणालो, “मला सांग, आपण पुढे काय करायचे? तू खरोखरच गुन्हा घडला, तसा पुन्हा उभा करणार आहेस का?”

“क्वचितच! आपण असे म्हणूया का, की नाटक संपले आहे, पण मला हे अजून त्यात घालायचे आहे --- हर्लेक्विनची प्रमुख भूमिका असलेला नृत्यनाट्याचा भाग?”

## चार

हे गूढ उकलायचा दिवस म्हणून पायरोने येता मंगळवार ठरवला. तयारी करताना मी फार उत्सुक झालो होतो. खोलीच्या एका बाजूला रंगमंचासमोर पांढरा पडदा लावला होता. बाकी सर्व बाजूंना जड पडदे लावले होते. नंतर एक मनुष्य दिवे लावायचे

सामान घेऊन आला. शेवटी प्रहसनात कामे करणाऱ्या लोकांचा गट येऊन ठेपला. ते पायरोच्या झोपायच्या खोलीत अदृष्य झाले. ती तात्पुरती कपडे बदलायची व मेकप वगैरेच्या तयारीची खोली केली होती.

आठ वाजण्यापूर्वी थोडा वेळ फारशा चांगल्या मनस्थितीत नसलेला जाप येऊन दाखल झाला. त्याला पायरोचे बेत फारसे पसंत नसावेत, असे मला वाटले.

"त्याच्या सगळया कल्पना थोड्या अतिरंजित क्षोभनाट्यासारख्या असतात. पण त्याचा काही त्रास नाही आणि तो म्हणतो त्याप्रमाणे, उलट आपले श्रम वाचतील. तो या केसबाबत फारच चटपटीतपणा दाखवतो आहे. मी अर्थात त्याच वासावर आहे --- "

मला मनापासून असे वाटते आहे, की जाप सत्य फार ताणतो आहे --- जापने पुढे चालू ठेवले, "पण मी त्याला वचन दिले आहे, की त्याला त्याच्या पद्धतीने गोष्टी जशा पुढे न्यायच्या आहेत, तशा नेऊ देत. ओहो, गर्दी आली."

नवीन उमराव प्रथम आले. त्यांच्या मागोमाग मी अजून न बघितलेली मिसेस मालाबाय आली. ती सुंदर काळे केस असलेली बाई होती आणि ती चांगलीच उदास दिसत होती. मागे डेव्हिडसन

होता. ख्रिस डेव्हिडसनलादेखील मी प्रथमच पाहिले. तो उंच, काळसर, नटाचा डौल असलेला व असायला पाहिजे तेवढा देखणा होता.

पायरोने रंगमंचाकडे तोंड करून, लोकांची बसायची सोय केली होती. रंगमंच दिव्यांनी उजळलेला होता. पायरोने बाकीचे दिवे मालवून, अंधार केला. त्यातून पायरोचा आवाज उमटला,

‘‘मिस्टर व मिसेस, थोडक्यात स्पष्टीकरण देतो. पडद्यावर सहा पात्रे ये जा करतील. ती तुम्हाला माहिती आहेत. पायरॉट व त्याची पायेरेट. पंचीनेलो विदूषक व नखरेवाली पल्सीनेला, हलकेच नाचणारी सुंदर कोलंबाईन व देवदूत, हर्लेक्विन.

या प्राथमिक शब्दांनंतर नृत्यनाट्य सुरु झाले. पायरोने सांगितलेली पात्रे पाळीपाळीने पडद्यावर येऊ जाऊ लागली. ती तिथे क्षणभर थांबत व निघून जात. दिवे वर उचलले गेले आणि सुटकेचा सुस्कारा सर्व बाजूंनी ऐकू आला. प्रत्येकजण कशामुळे कोणास ठाऊक, पण काळजीत दिसत होता. मला वाटले, नाटकाचा ओघ ओम फस् झाला. जर गुन्हेगार आमच्यात असेल आणि पायरो अशी अपेक्षा करत असेल, की मरण पावलेल्या ओळखीच्या व्यक्तीला पाहून तो दचकेल --- म्हणजे असे होणे अपेक्षित होते --- तर ते तसे झाले नव्हते. पायरो मात्र जराही

विचलित झाला नव्हता. तो हसत हसत पुढे आला व नाटक मंडळींकडे बघून बोलला,

"मिस्टर आणि मिसेस, आता कृपया तुम्ही मला सांगाल का --- एका वेळी एकाने --- आपण आता काय पाहिले? महाशय, तुम्ही सुरवात कराल का? तो गृहस्थ गोंधळून गेला. "मी घाबरलो आहे. मला काही नीट समजले नाही."

"आपण काय पाहिले, तेवढे सांगा."

"अं --- ओय --- ठीक आहे. आपण त्या रात्री पडद्यावर सरकणारी व जुन्या इटालीयन विनोदी प्रहसनातील वेगवेगळ्या भूमिका करणारी सहा पात्रे पाहिली.

पायरो बोलला, "त्या रात्री असे म्हणू नका. तुमचे नंतरचे अर्धे बोलणे मला पाहिजे तसे होते. बाईसाहेब, तुम्ही नवीन उमराव युस्टास बेल्टाने क्रोनशॉ महाशयांशी सहमत आहात का?

तो मालाबायशी बोलतांना वळला.

"हो, अर्थात."

"तुम्ही इटालीयन विनोदी प्रहसनातील सहा पात्रे बघितलीत?"

'का? नक्कीच बघितली."

“मिस्टर डेव्हिडसन, तुम्ही बघितली?”

“हो.”

“बाईसाहेब, तुम्ही?”

“हो.”

“हेस्टींग्ज? जाप? हो? तुमचेही तसेच म्हणणे आहे?

त्याने गोल वळून आमच्याकडे पाहिले. त्याचा चेहरा पडला. त्याचे डोळे मांजरासारखे हिरवे दिसू लागले.




“आणि तरीही --- तुम्ही सगळे चूक आहात. विजयाच्या नाचाच्या रात्री, तुमच्या डोळ्यांनी तुम्हाला फसवले आहे. ते दाखवतात, ते नेहमी सत्य असतेच असे नाही. प्रत्येकाने मनाच्या डोळ्यांनी बघितले पाहिजे. मेंदूच्या करड्या पेशींचा वापर केला पाहिजे. मग आज व त्या नाचाच्या रात्री तुम्ही सहा नव्हे तर पाच आकृती पाहिल्यात.”

परत दिवे गेले. पडद्यावर एक आकृती दृषायमान झाली. पायरॉट!

पायरोने विचारले, “ही आकृती कोण होती? पायरॉट?”

आम्ही सगळे ओरडलो, “हो.”

“परत बघा.”

चपळ हालचाल करून त्या माणसाने पायरॉटच्या कपड्यांमधून सुटका करून घेतली. तिथे झगमगाटात हर्लेक्विन उभा होता. त्याच क्षणी तिथे किंकाळी उमटली व एक खुर्ची उलटी पालटी झाली.

डेव्हिडसनचा आवाज उमटला, “मी तुला शाप देतो. शाप देतो. तू असा तर्क कसा काय करू शकतोस?”

नंतर हातकड्यांचा खणखणाट झाला. जापचा त्याच्या कामाचा शांत आवाज आला, “ख्रिस्तोफर डेव्हिडसन, मी तुला उमराव क्रोनशॉचा खून केल्याबद्दल, अटक करतो --- तू जे काही बोलशील, ते तुझ्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरले जाईल.”

## पाच

नंतर पाऊण तासाने, अनोखे लहानसे खाणे लावले गेले. पायरो त्याचा चेहरा चमकवत आग्रह करत होता व आमच्या उत्सुक प्रश्नांना उत्तरे देत होता.

“हे सर्व अगदी साधे होते. ज्या परिस्थितीत हिरवा गोंडा सापडला, तो ताबडतोब असे सुचवत होता, की तो खुन्याने त्याच्या अंगावरील कपड्यातून फाडून काढला आहे. [ झटापटीत तो ओरबाडला जाऊन, तुटला आहे. ] मी माझ्या मनातील संशयातून पायेरेटला वगळले. [कारण टेबलावरील सुरा घरी न्यायला चांगलीच ताकद लागते.] आणि पायरॉटकडे त्या दृष्टीने बघू लागलो. पण त्याने तर नाचाची जागा खून होण्यापूर्वीच दोन तास सोडली होती. त्यामुळे तो एक तर तिथे उमराव क्रोनशॉला मारण्यासाठी परत आला असला पाहिजे. किंवा --- असेही असेल, की तो तेथून निघण्यापूर्वीच त्याने क्रोनशॉला मारले असेल. ते अशक्य होते का? त्या दिवशी खाण्यानंतर क्रोनशॉला कुणी पाहिले? फक्त मिसेस डेव्हिडसनने. तिच्या बोलण्यावर मी संशय घेतला होता. हरवलेल्या गोंड्यासाठी ती जाणून बुजून खोटे बोलली होती. तो तिने अर्थात तिच्या नवऱ्याच्या कपड्यातून नाहीसा झालेल्या ठिकाणी लावण्यासाठी, तिच्या कपड्यामधून कापून काढला. पण मग रात्री दीड वाजता हर्लेक्विन बॉक्समध्ये बसलेला दिसला होता, तो नक्कीच त्याचे सोंग घेतलेला कुणी असणार! क्षणभर आधी मी अशी शक्यता गृहीत धरत होतो, की मिस्टर बेल्टाने हा गुन्हेगार असणार. पण त्याच्या काळजीपूर्वक केलेल्या पोषाखामुळे त्याने कपडे बदलून, पंचीनेलो व हर्लेक्विन

या दोन भूमिका केल्या असतील, असे समजणे अशक्य होते. तर दुसरीकडे, बेल्टानेच्याच उंचीच्या असणाऱ्या डेव्हिडसनसारख्या कसलेल्या तरुण नटानेच खून केला असणे, सहज शक्य वाटत होते.

पण मला एका गोष्टीचे वाईट वाटत होते. एखाद्या डॉक्टरला दोन तासांपूर्वी मेलेल्या व दहा मिनिटांपूर्वी मेलेल्या माणसाच्या प्रेतातील फरक कळू नये! पण त्याला प्रेत दाखवून विचारण्यात आले नव्हते, की हा माणूस मरून किती वेळ झाला आहे? उलट त्याला असे सांगण्यात आले होते की दहा मिनिटांपूर्वी हा माणूस जिवंत असलेला, अमुक तमुक याने पाहिलेला आहे. त्याला तो बॉक्समध्ये जिवंत बसलेला दिसला होता. त्यामुळे त्याने प्रेत पाहिल्यावर, प्रेताच्या हातांच्या वेगळ्याच काठीण्याच्या अंदाजावरून तो दीड तासापूर्वी मेला असल्याचे मत दिले. डॉक्टरला नीट  कळत नव्हते की दहा मिनिटापूर्वी तो बॉक्समध्ये बसलेला कसा काय दिसला होता?

“सर्व काही आता माझ्या प्रसिद्ध उपपत्तीकडे चालले होते. डेव्हिडसनने खाण्यानंतर लगेच उमराव क्रोनशॉचा खून केला. तुम्हाला आठवत असेल, तर त्याने उमराव क्रोनशॉला परत खायच्या खोलीत नेलेले बघण्यात आलेले होते. मग तो मिस कोर्टेनेबरोबर जातो. तिला तिच्या सदनिकेच्या दाराशी सोडतो.

[त्याने सांगितल्याप्रमाणे, आत जाऊन तिला शांत करण्याऐवजी ] आणि घाईने कोलोससला परततो --- पण हर्लेक्विन म्हणून, पायरॉट म्हणून नव्हे --- फक्त बाहेरचे कपडे व  मुखवटा बदलून, साधा कायापालट घडवून आणून!”

**सहा**

मेलेल्या माणसाचा काका पुढे वाकला. त्याचे डोळे गोंधळलेले होते.

“पण असे असले तर तो त्याच्या बळीला मारायच्या उद्देशाने, आला असणार. पण असे करायचा हेतू काय ते मला उमगत नव्हते.”

“ओहो, तिथे आपण दुसऱ्या शोकांतिकेकडे आलो. मिस कोर्टेने कोकेनच्या विषबाधेने मेली --- एनॅमलच्या डबीत तिचे ते मादक द्रव्य होते व ती डबी क्रोनशॉच्या प्रेतावर सापडली होती. मग तिने मरण्यापूर्वी घेतलेला डोस तिला कुठे मिळाला? एकाच व्यक्तीने तिला तो पुरवला असणार --- डेव्हिडसन. आणि हे सर्व गोष्टी स्पष्ट करते. यावरून तिची डेव्हिडसनशी असलेली मैत्री समजते आणि तिने तिला घरी पोचवायचा डेव्हिडसनकडे केलेला हट्टदेखील लक्षात येतो. उमराव क्रोनशॉ ठामपणे मादक पदार्थांच्या

विरुद्ध होता. त्याला समजले, की ही बाई कोकेनच्या आहारी गेली आहे आणि त्याला संशय आला की डेव्हिडसन तिला ते पुरवतो. डेव्हिडसनने ते अर्थातच नाकारले. पण क्रोनशॉने नाचाच्या वेळी कोर्टेनेकडून खरे काय ते काढून घ्यायचे ठरवले. तो त्या बिचाऱ्या मुलीला माफ करू शकला, पण ते पुरवणाऱ्या व त्यावर उपजिविका करणाऱ्या माणसाला तो नक्कीच क्षमा करणार नव्हता. डेव्हिडसनची ही चोरटी बाब उघड होऊन, तो नाशाप्रत जाणे हे अटळ दिसू लागले. त्यामुळे तो काही हेतू मनात ठेवून नाचाच्या ठिकाणी गेला, की काही झाले तरी क्रोनशॉला कायमचे झोपवायचे.”

“कोकोचा मृत्यू हा अपघात होता का?”

“मला संशय आहे की तो अपघात होता, असे डेव्हिडसनने मोठ्या हुशारीने भासवले. ती क्रोनशॉवर फार चिडली होती. प्रथम म्हणजे त्याच्या मादक पदार्थांच्या संबंधीच्या टोकाचा नापसंतीबद्दल आणि तिच्यापासून ते ओढून घेतल्याबद्दल! डेव्हिडसनने तिला अजून मादक पदार्थ पुरवले आणि बहुधा तिला त्याचा डोस अजून वाढवण्याबद्दल सुचवले. अशा तऱ्हेने क्रोनशॉला धीटपणे उघड विरोध करायला त्याने तिला उद्युक्त केले.

मी म्हणालो, “अजून एक गोष्ट! मध्यंतर आणि पडदा? तुला त्याबद्दल कसे काय माहिती झाले?”

“अरे मित्रा, कसे काय म्हणजे, ते तर सर्वात सोपे होते. त्या खाण्याच्या लहानशा खोलीतून वेटर्स सारखे आतबाहेर करत होते. त्यामुळे प्रेत जमिनीवर पडलेले कुणी न बघता रहाणे शक्य नव्हते. त्यामुळे खोलीत अशी जागा असली पाहिजे, जिथे ते प्रेत दडवून ठेवता येईल. यात पडदा व मध्यंतर या गोष्टींचा हात असावा, असा निष्कर्ष मी काढला. डेव्हिडसनने पडद्यामागे प्रेत ओढत आणले आणि नंतर तो पटकन कपडे बदलून, हॉल सोडण्यापूर्वी बॉक्समध्ये हर्लेक्विन म्हणून जाऊन बसला. तिथे त्याला काहीजणांनी पाहिले. त्याना तिथे हर्लेक्विन बसला आहे, असेच वाटले. ती मिस्टर डेव्हिडसनची सर्वोत्कृष्ट खेळी होती. तो हुशार माणूस आहे.”

पण पायरोच्या हिरव्या डोळ्यात, तो न बोललेला शेरा मी वाचलाः

‘पण हर्क्युल पायरोइतका नाही.’

THE DISAPPEARANCE OF MR. DAVENHEIM

# मिस्टर दवेनहेम गायब



स्कॉटलँड यार्डचा इन्स्पेक्टर असलेला आमचा मित्र, जाप हा चहाला येण्याची पायरो आणि मी अपेक्षा करत होतो. आम्ही चहाच्या टेबलाभोवती त्याची वाट बघत बसलो होतो. आमच्या घरमालकीणीला कपबशा कशाही वेड्यावाकड्या मांडायची सवय होती. पायरो त्या नीट  करत होता. चहाच्या धातूच्या किटलीवर त्याने जोराने श्वास सोडून रेशमी रुमालाने ती चकचकीत केली. किटलीतील चहा उकळत होता. त्याशेजारील एनॅमलच्या बशीत,

जास्त करून पायरोच्या तोंडातील टाळूला चिकटणारी, जाड, गोड चॉकलेटे होती. त्याचे वर्णन तो 'तुझे इंग्लिश विष' असे करत असे.

खालून बुटांचा आवाज आला. काही मिनिटात इन्स्पेक्टर जाप घाईघाईने आत शिरला.

आम्हाला अभिवादन करून तो बोलला, "मी अशी आशा करतो, की मला उशीर झाला नाही. दवेनहेम केस बघणाऱ्या माणसाशी, मिलरशी मी चर्चा करत होतो.

"मी कान देऊन ऐकू लागलो. कारण गेले तीन दिवस वर्तमानपत्रे मिस्टर दवेनहेम यांच्या विचित्र प्रकारे नाहीसे होण्याच्या बातम्यांनी भरलेली होती. ते दवेनहेम आणि साल्मन या प्रसिद्ध आर्थिक कंपनीचे वरिष्ठ भागीदार होते. गेल्या शनिवारी, ते घरातून बाहेर पडले आणि तेव्हापासून ते कुणालाच दिसले नाहीत. मला जापकडून काही रुचीपूर्ण माहिती मिळेल, अशी अपेक्षा मी करत होतो.

मी शेरा मारला, "मी असा विचार करत होतो, की हल्लीच्या दिवसात कुणाला असे नाहीसे होणे, जवळजवळ अशक्य आहे."

पायरोने पाव आणि लोण्याची बशी एक अष्टमांश इंचाने सरकवली व टोकदारपणे म्हणाला,

“नाहीसा झाला म्हणजे काय झाले? नेमके काय ते सांग. कशा प्रकारे नाहीसा झाला?”

मी हसून बोललो, “नाहीसे होण्याचे काही प्रकार असतात का?”

जापदेखील हसला. पायरोने आम्हाला दोघांना बघून भुवया चढवल्या.

“पण नक्कीच ते तसे होते. त्याचे तीन प्रकार होते. पहिला, अगदी सर्वसामान्य असा म्हणजे, स्वतःहून नाहीसे होणे. दुसरा फार वाईट असा म्हणजे, गोष्टी लक्षात न राहिल्याने हरवणे. फारसा न आढळणारा, पण शक्य असलेला. आणि तिसरा म्हणजे खून होऊन, प्रेताची विल्हेवाट लागणे. या तिन्ही शक्यता तू धुडकावून लावतो आहेस का?”

“मला वाटते, जवळजवळ हो. तुम्ही स्वतःची स्मृती हरवून बसलात, तरी कुणीतरी तुम्हाला ओळखत असते --- विशेषतः दवेनहेमसारख्या प्रसिद्ध माणसाच्या बाबतीत तरी नक्कीच! आणि प्रेत काही हवेत विरुन जात नाही. लवकर किंवा उशीरा, ते सुनसान जागी पुरलेले अथवा बॅगेत कोंबलेले सापडतेच. खुनाचा सुगावा लागतोच. त्याचप्रमाणे, घाईने पळ काढणारा कारकून वा घरगुती नोकर या विनावायर टेलीग्राफीच्या दिवसात नक्कीच सापडू

शकतात. परदेशातून, बंदरातून किंवा रेल्वे स्टेशनमधून नजर ठेवूनही डोके उडवले जाऊ शकते. या देशात त्याला लपविले असले तरी, त्याचा ठावाठिकाणा वर्तमानपत्र वाचणाऱ्या प्रत्येकाला माहिती होऊ शकतो. संस्कृतीमधून तो डोकावतोच.''

पायरो म्हणाला, ''अरे मित्रा, तू एक चूक करतो आहेस. तू हे लक्षात घेत नाही आहेस, की माणूस एखाद्या दुसऱ्या माणसाबरोबर पळून जाऊ शकतो --- किंवा स्वतःच्या छायेबरोबर एखाद्या यंत्रासारखा असलेला --- विशिष्ट पद्धतीचा माणूस. तो बुद्धिमत्ता, कसब वापरू शकतो. काळजीपूर्वक आकडेमोड करू शकतो. आणि मग त्याने पोलिसांना गोंधळवून टाकल्यास, काही नवल नाही.''

जाप विनोदाने माझ्याकडे बघून डोळे मिचकावत बोलला, ''पण मला वाटते, तुला नाही! मिस्टर पायरो, तो तुला चकवू शकणार नाही, नाही का?''

पायरोने नम्र दिसण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण तो जमला नाही.

''मला का नाही चकवू शकणार? हे खरे आहे, की मी असल्या समस्या नेमक्या शास्त्रीय पद्धतीने व गणिती अचूकपणे सोडवतो.

पण अरेरे! ही पद्धत हल्लीच्या गुप्तहेरांच्या बाबतीत क़्वचितच वापरलेली आढळते.”

जाप ओठ रानटीपणे फाकवत हसला.

तो म्हणाला, “मला माहिती नाही. ही केस बघणारा मिलर हा चटपटीत माणूस आहे. तो पाऊलांच्या ठशांकडे, सिगरेटच्या राखेकडे वा एखाद्या तुकड्याकडेदेखील दुर्लक्ष करणार नाही, याची खात्री बाळग. त्याचे डोळे सगळीकडे लक्ष ठेऊन असतात.”

पायरो बोलला, “तर मग मित्रा, तो लंडनची चिमणी असणार. मी छोट्या तपकिरी पक्ष्याला तर मिस्टर दवेनहेमची समस्या सोडवायला सांगू शकणार नाही.”

“चला आता, मिस्टर तू पुराव्यांचे महत्व कमी करू शकत नाहीस, नाही का?”

“अर्थातच नाही. सर्व गोष्टी चांगल्या चालल्या आहेत. पण ते त्यात धोका दाखवून, त्याला नको इतके महत्व द्यायच्या मागे दिसतात. बहुतेक सर्व बारीकसारीक गोष्टी या दुर्लक्ष करण्यासारख्या आहेत. फक्त एकदोन महत्वाच्या असू शकतील. त्या मेंदूतील करड्या पेशी आहेत.” त्याने त्याचे कपाळ टिचक्या मारून दाखवले. “आपण यावर अवलंबून राहिले पाहिजे. भावना

चुकीच्या मार्गाने नेऊ शकतात. प्रत्येकाने आतील सत्य जाणून घेतले पाहिजे. त्याशिवाय काही खरे नाही.”

मिस्टर पायरो, तुम्हाला असे तर म्हणायचे नाही ना, की तू तुझ्या खुर्चीतून न हलता ही केस सोडवणार आहेस?”

“जर माझ्यासमोर सगळ्या गोष्टी ठेवल्या गेल्या, तर मला तसेच म्हणायचे आहे --- मी मला विशेष सल्ला देणारा समजतो.”

जापने त्याच्या गुडघ्यावर फटका मारला व बोलला, “मी तुला शब्दात पकडले नाही, तर मला फाशी दे. तू हे रहस्य खोलू शकणार नाहीस --- किंवा काय करायचे हे मला सांगू शकणार नाहीस. यावर मी पाच पौंडाची पैज लावतो. मिस्टर दवेनहेम, जिवंत किंवा मेलेला, एका आठवड्यात समजेल.”

पायरो म्हणाला, “ठीक आहे, माझ्या मित्रा, मी ही पैज स्वीकारतो. तुझी ही इंग्लिश इच्छा आहे. आता --- काय काय झाले बघू या.”

मागील शनिवारी, नेहमीच्या सवयीप्रमाणे मिस्टर दवेनहेम यांनी व्हिक्टोरियापासून, जिथे गावाकडे सेदारच्या झाडीत त्यांचे राजवाड्यासारखे घर आहे तिथे जाणारी १२-४० ची चिंगसाईडची गाडी घेतली. दुपारच्या जेवणानंतर ते जमिनीवर लवंडले होते आणि माळ्याला वेगवेगळ्या सूचना देत होते. सर्वांनी मान्य केले,

की त्यांचे वागणे अगदी नेहमीसारखेच होते. चहानंतर गावामधून फेरफटका मारायला जात असल्याचे व काही पत्रे पोस्टपेटीत टाकायला जात असल्याचे सांगायला, त्यांनी त्यांच्या बायकोच्या खासगी खोलीत डोके घातले. पुढे ते म्हणाले की काही कामासाठी मिस्टर लोवेन घरी येण्याची शक्यता आहे. जर ते मी परतण्यापूर्वी ते आले तर त्याना अभ्यासिकेत बसवून थांबायला सांगावे.

मिस्टर दवेनहेम यांनी पुढील दाराने घर सोडले. ते रमतगमत चालले होते. गेटमधून बाहेर पडले आणि --- परत कधीच दिसले नाहीत. त्या वेळेपासून, ते पूर्णपणे गायब झाले.''

पायरो म्हणाला, ''सुंदर --- अती सुंदर --- फार सुंदर, लहानशी समस्या! माझ्या मित्रा, पुढे चालू ठेव.''

नंतर सुमारे पाऊण तासाने, काळ्या मिशा असलेल्या काळ्या माणसाने पुढील दाराची घंटी वाजवली आणि त्याचे मिस्टर दवेनहेम यांना भेटायचे ठरलेले असल्याचे सांगितले. त्याने त्याचे नाव लोवेन असल्याचे सांगितले. ठरल्याप्रमाणे त्याला अभ्यासिकेत बसवण्यात आले. एक तास गेला. मिस्टर दवेनहेम परतले नाहीत. शेवटी घंटी वाजवून, त्यांनी त्यांना अजून थांबणे शक्य नसल्याचे सांगितले. कारण त्यांना परत घरी जाण्यासाठी गाडी पकडायची होती.

मिसेस दवेनहेमने मिस्टर दवेनहेम अजून न परतल्याबद्दल क्षमा मागितली. तिला खात्री वाटत होती, की मिस्टर दवेनहेम याना भेटायला मिस्टर लोवेन येणार असल्याचे त्यांना माहिती असल्याने ते नक्की वेळेवर घरी येतील.

तर सगळ्यांना माहिती आहे त्याप्रमाणे, मिस्टर दवेनहेम परतले नाही. रविवारी सकाळी लवकर पोलिसांना कळवण्यात आले. पण काही पत्ता लागला नाही. मिस्टर दवेनहेम जसे काही हवेत विरून गेले. ते पोस्ट कार्यालयात पण गेले नव्हते. किंवा कोणी त्याना गावातून चालताना देखील पाहिले नव्हते. स्टेशनवरुन त्यांनी कुठली गाडी पकडल्याचेही दिसत नव्हते. त्यांची मोटार त्यांच्या गॅरेजमध्येच होती. जर त्यांनी कुणाला सुनसान जागी भेटायला भाड्याची गाडी केली असेल, तर निदान बक्षिसाच्या आमिषाने तरी चालकाने पुढे येऊन काही माहिती दिली असती. खरे तर पाच मैल लांब असणाऱ्या एनटीफिल्डला संपणारी एक छोटीशी शर्यत होती. पण जर ते तिथपर्यंत चालत गेले असतील, तर ते गर्दीतून कुणी त्याना न ओळखता गेले असले तरी पण, त्यांचा फोटो आणि वर्णन प्रत्येक वर्तमानपत्रात दिले गेले असल्यावर, तरी कोणी त्यांची काही खबरबात दिली असती. अर्थात आम्हाला पूर्ण इंग्लंडमधून बरीच पत्रे आली. पण प्रत्येक पुरावा निराश करणाराच ठरला.

सोमवारी सकाळी, अजून काही शोध लागला. मिस्टर दवेनहेमच्या अभ्यासिकेत पडद्यामागे तिजोरी होती आणि ती फोडलेली होती. त्यावर रायफल चालवली गेली होती. खिडक्या आतून मजबूत रीत्या बंद होत्या. त्यामुळे ही भुरटी चोरी वाटत नव्हती. अर्थात घरातील कुणीतरी चोरांना मदत केली असेल, तर गोष्ट वेगळी होती. तर दुसऱ्या बाजूला, रविवार आल्यामुळे आणि घरात गडबड चालू असल्याने, असे शक्य आहे की शनिवारी चोरी झाली असेल व सोमवारपर्यंत ती झालेली समजलेच नसेल. पायरो कोरडेपणे बोलला, “ठीक आहे, मिस्टर लोवेलला चौकशीसाठी ताब्यात घेतले का?”

जाप जिवणी रुंदावत बोलला, “अजून नाही. पण त्याच्यावर लक्ष ठेवले जात आहे.”

पायरोने मान हलवली. “तिजोरीतून काय चोरले गेले? तुला काही कल्पना आहे का?”

आम्ही कंपनीच्या कनिष्ठ भागीदाराबरोबर व मिसेस दवेनहेमबरोबर  त्याचा शोध घेत आहोत. आतापर्यंत नोटांमध्ये बदलता येणारे बऱेच रोखे व अलीकडेच झालेल्या मोठ्या व्यवहारातील बऱ्याच किमतीच्या नोटा चोरीला गेल्या आहेत. मिसेस दवेनहेमचे सगळे हिरे व काही दागिनेही त्यात होते.

अलीकडेच ते दागिने तिच्या नवऱ्याने तिच्या इच्छेप्रमाणे केले होते व तिजोरीत ठेवलेले होते. त्याने तिला काही महाग रत्ने भेट दिल्याला जेमतेम एक महिना झाला होता.''

पायरो विचारपूर्वक बोलला, ''म्हणजे एकंदरीत, तिजोरीत चांगले घबाड होते. आता लोवेनचे काय? त्या संध्याकाळी त्याचे मिस्टर दवेनहेमकडे काय काम होते?

''तसे तर ती दोन माणसे फार सलोखा असलेली नव्हती. लोवेन एक छोटा शेअर दलाल होता. तथापि एकदोनदा त्याने कठीण प्रसंगी बाजारातील व्यवहारात दवेनहेमला मदत केली होती. पण ते कधी प्रत्यक्ष भेटले नव्हते. काही शेअर्सच्या बाबतीत, बँकेतील माणसाने त्यांची ही भेट ठरवली होती.''

दवेनहेमला दक्षिण अमेरिकेत काही स्वारस्य होते का?''

''मला वाटते तसे होते. मिसेस दवेनहेमच्या बोलण्यात असे आले होते, की मिस्टर दवेनहेमने हिवाळ्याचा पूर्ण ऋतू आर्जेन्टिनामधील ब्युनोस एअर्स येथे काढला होता.''

''घरातील त्याच्या आयुष्यात काही त्रास होता का? नवराबायकोचे पटत होते का?''

''मी म्हणेन की त्याचे घरगुती आयुष्य शांततापूर्ण होते व फारसे गडबडीचे नव्हते होते. मिसेस दवेनहेम आल्हादक पण थोडी

कमी बुद्धी असलेली बाई होती. मला वाटते, ती साधीसुधी बाई होती.”

“मग आपण तिथे रहस्य शोधायला नको. त्याला कुणी शत्रू होते का?”

“पैशाच्या बाबतीत त्याला भरपूर शत्रू होते. आणि त्याचे भले न इच्छिणाऱ्या खूप लोकांना त्याने मदत केली होती. पण त्यातील कोणी त्याच्यापासून दूर जाऊ बघणारे नव्हते --- पण तसे जर होते, तर प्रेत कुठे गेले?”

“तेच तर. हेस्टीग्ज म्हणतो, त्याप्रमाणे प्रेत केव्हा ना केव्हा उजेडात येणे अपरिहार्य असते,”

तसेही माळी म्हणाला, की त्याने घराभोवती असलेल्या गुलाबाच्या बागेतून एक आकृती चक्कर मारतांना पाहिली. अभ्यासिकेची मोठी फ्रेंच खिडकी [ दारासारखी असलेली ] गुलाबाच्या बागेत उघडते. मिस्टर दवेनहेम खूप वेळा त्यामार्गाने घाराबाहेर पडत असत किंवा आत जात असत. पण तो मनुष्य लांब काकडीच्या वेलाचे काही काम करत होता. तो घराचा मालक होता की अजून कोणी ते कळले नाही. शिवाय तो तथाकथित साक्षीदार सांगत असलेली वेळदेखील नीट जुळत नव्हती. ती वेळ

सहापूर्वीची असली पाहिजे. कारण सहानंतर माळी काम करत नाहीत.

“आणि मिस्टर दवेनहेमने कधी घर सोडले?

“साधारण साडेपाचला किंवा त्या सुमारास.”

“गुलाबाच्या बागेनंतर काय आहे?”

“एक तळे.”

“त्यात बोटी आहेत का?”

“हो. त्यात बोटघर आहे. मिस्टर पायरो, तुम्ही आत्महत्येबद्दल विचार करत आहात का? तर मला तुम्हाला हे सांगायला हरकत नाही, की मिलर उद्या त्या पाण्याच्या तळाशी जाऊन बघणार आहे. मिलर असा दक्ष माणूस आहे.”

पायरो किंचित हसला व माझ्याकडे वळून बोलला, “हेस्टींग्ज, कृपया मला ते वर्तमानपत्र दे. मला बरोबर आठवत असेल, तर त्यात हरवलेल्या माणसाचा ठळक फोटो आहे.”

मी उठून वर्तमानपत्राचे ते पान शोधले. पायरोने त्या फोटोचे निरीक्षण केले.

तो पुटपुटला, “हं! त्याचे केस लांब आणि कुरळे दिसत आहेत. भरघोस मिशा आणि टोकदार दाढी, दाट भुवया आणि काळेभोर डोळे आहेत, नाही का?”

“हो.”

“दाढी आणि केस करडे होऊ लागले आहेत.”

त्या गुप्तहेराने मान डोलावली. “तर मग मिस्टर पायरो, याबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे? मी तुम्हाला सर्व काही स्वच्छ सांगितले आहे.”

“उलट सगळे गूढच आहे.”

स्कॉटलंडचा माणूस खूष झालेला दिसला.

पायरो शांतपणे बोलला, “त्यामुळे मला ती केस सोडवायची मोठी आशा निर्माण झाली आहे.”

“काय?”

“जेव्हा केस धूसर असते, तेव्हा मला ते चांगले लक्षण वाटते. जर गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छ असत्या, तर मी त्यावर अविश्वास दाखवला असता. मी म्हटले असते, की कोणीतरी त्या तशा केल्या आहेत.

जापने दया येईल अशी मान हलवली.”ठीक आहे प्रत्येकाला आपापला तर्क करायची मोकळीक आहे. पण समोर स्वच्छ रस्ता दिसणे, हे काही वाईट नाही.”

पायरो पुटपुटला, “मला नाही दिसत. मला वाटते, मी डोळे बंद केले आहेत.”

जापने सुस्कारा टाकला. “ठीक आहे तुला विचार करायला सबंध आठवडा पडलेला आहे.”

“आणि नवीन काही कळले, तर तू ते माझ्या कानावर घालशीलच --- उदाहरणार्थ, ससाण्याच्या नजरेच्या मिलरच्या कामाच्या झपाट्याचे काय झाले?”

“नक्कीच. ते तसेच ठरले आहे.”

मी जापबरोबर दारापर्यंत गेलो, तेव्हा तो बोलला, “हे लाजीरवाणे आहे, नाही का? एखादे मूल पळवल्यासारखे!”

मी हसण्याशिवाय काही करू शकत नव्हतो. मी खोलीत परत शिरलो, तर हसत होतो.

पायरो ताबडतोब बोलला, “ठीक आहे. तुम्ही माझी टर उडवत आहात, नाही का?” त्याने माझ्याकडे बोट रोखून म्हटले, “तुम्ही त्याच्या मेंदूतील करड्या पेशींवर विश्वास ठेवत नाही? गोंधळून जाऊ नका. आपण या लहानशा समस्येवर चर्चा करू ---

मी हे कबूल करतो की अजून तरी ती अपूर्ण आहे. पण आधीच मला एकदोन रुचीपूर्ण मुद्दे सापडले आहेत.”

मी विशेष स्वरात ओरडलो, “तळे.”

“आणि तळयापेक्षाही महत्वाचे बोटघर.”

मी कडेने पायरोकडे पाहिले. तो त्याच्या नेहमीच्या न समजणाऱ्या पद्धतीने हसला. मला क्षणभर वाटले, की त्याला काही प्रश्न विचारणे व्यर्थ आहे.

कालच्या संध्याकाळशिवाय तो आज नऊ वाजता येईपर्यंत, आम्ही जापकडून काहीही ऐकले नाही. त्याच्या चेहऱ्यावरून मी ताडले, की त्याला काही बातमी सांगायची घाई झाली आहे.

पायरो बोलला, “कसे काय मित्रा, सर्व काही ठीक? पण तू मला असे सांगू नकोस, की मिस्टर दवेनहेमचे प्रेत तळयात सापडले. कारण मी त्यावर विश्वास ठेवणार नाही.”

‘नाही. आम्हाला तिथे प्रेत मिळाले नाही. पण त्याचे कपडे मिळाले --- त्या दिवशी त्याने तसेच कपडे घातले होते. यावर तू काय म्हणशील?”

“घरातून अजून काही कपडे हरवल्याचे लक्षात आले होते का?”

“नाही. त्याचे कपड्यांचे कपाट भरलेले होते. त्यातून काही हरवल्याचे दिसत नव्हते. अजून सांगायचे म्हणजे, आम्ही लोवेनला अटक केली आहे. खिडक्या लावायचे काम करणाऱ्या नोकराणीने सांगितले की तिने साधारण सव्वासहा वाजता लोवेनला गुलाबाच्या बागेकडून अभ्यासिकेत येतांना पाहिले. म्हणजे तो बाहेर पडण्यापूर्वी दहा मिनिटे.”

“तो स्वतः त्याबद्दल काय म्हणतो?”

सर्वप्रथम हे मनातून काढून टाका, की तो अभ्यासिकेतून बाहेर पडला. पण नोकराणी तर तसे सांगते आहे. तो असे ढोंग करतो आहे, की बाहेर गुलाबाच्या वेगळया जातीचे निरीक्षण करण्यासाठी तो खिडकीतून बाहेर पडायचे विसरून गेला. ही अर्धीकच्ची गोष्ट वाटते आहे! त्याच्या विरुद्धचा नवीन पुरावा सापडला आहे. मिस्टर दवेनहेम नेहमी एक खडा बसवलेली जाड सोन्याची अंगठी उजव्या हातात घालत असत. ती अंगठी बिली केलेट नावाच्या माणसाने लंडन इथे शनिवारी रात्री गहाण ठेवली होती. त्याने तीन महिन्यांपूर्वी एका सभ्य गृहस्थाचे घड्याळ चोरल्याने, तो पोलिसांना आधीच माहिती आहे. त्याने पाच निरनिराळ्या ठिकाणी ती अंगठी गहाण ठेवायचा प्रयत्न केला होता. पण शेवटच्या ठिकाणी तो फलद्रूप झाला. नंतर त्याने खूप दारू पिऊन

एका पोलिसाचा खून केला. आणि मग त्याला पकडण्यात आले. मी बो रस्त्याला मिलरबरोबर जाऊन त्याला बघून आलो. आता तो जरा निवळला आहे. आम्ही त्याला चांगला फैलावर घेतला आहे. त्याला खुनाच्या आरोपाखाली अटक होण्याची शक्यता आहे. हे एकमेकात गुंतवलेल्या धाग्यांचे रीळ आहे. ते फार विचित्र आहे.”

शनिवारी तो बिली केलेट एन्टफिल्ड [ लंडनमधील मोठे शहर ] मधील शर्यतीत होता. तरी मी असे सांगायचे धाडस करू शकतो, की रुमालाला लावायच्या पिनांचा त्याचा व्यवसाय होता. तसेही तो त्याच्यासाठी वाईट दिवस होता. त्याचे नशीब वाईट होते. चिंगसाईडकडे जायच्या वाटेवर, तो रस्त्यावरून भटकताना, गावात शिरण्यापूर्वी एका खड्ड्यात विश्रांती घेत बसला होता काही मिनिटाने त्याला रस्त्याने गावाकडे चाललेला एक काळाकभिन्न, लांब मिशांचा बऱ्यापैकी श्रीमंत सभ्य माणूस दिसला.

केलेटच्या व रस्त्याच्या मध्ये एक दगडांचा ढीग पडलेला होता. त्यामुळे तो रस्त्यावरून दिसत नव्हता. काळा माणूस केलेटच्या जवळ आला, तेव्हा त्याने रस्त्याच्या आजूबाजूला पाहिले आणि आसपास कुणी नाही, असे पाहून त्याच्या खिशातून एक वस्तू काढून त्या दगडांचा ढीगावर फेकली. मग तो स्टेशनच्या

दिशेने निघून गेला. ती वस्तू हलकासा आवाज करत पडली. त्यामुळे खड्ड्यात बसलेल्या त्या बेकार माणसाचे कुतूहल चाळवले गेले. त्याने थोडी शोधाशोध केल्यावर त्याला ती अंगठी सापडली. अशी केलेटची गोष्ट आहे. लोवेन ती खरी नसल्याचे सांगतो. पण ते काही बरोबर वाटत नाही. शिवाय केलेटसारख्या बेकार माणसावर आपण थोडाही विश्वास ठेऊ शकत नाही. असे घडले असणे शक्य वाटते, की त्याला दवेनहेम भेटला आणि त्याने त्याचा खून करून अंगठी लंपास केली.''

पायरोने मान हलवली.

''अरे मित्रा, हे सर्व अशक्य वाटते. त्याला प्रेताची विल्हेवाट लावायचे काही साधन नव्हते. त्यामुळे आतापर्यंत प्रेत मिळायला हवे होते. दुसरे म्हणजे, तो ज्या मोकळेपणे ती अंगठी गहाण ठेवतो आहे, त्यावरून त्याने त्यासाठी खून केला असेल असे वाटत नाही. तिसरे म्हणजे, तुम्ही पकडलेला चोर खून करणारा नाही. चौथे म्हणजे, तो शनिवारपासून तुरुंगात आहे. त्याने लोवेनचे एवढे तंतोतंत जुळणारे वर्णन द्यावे, हे फारच अशक्य वाटते.

जापने मान हलवली. ''तुझे बरोबर आहे, असे मी म्हणणार नाही. पण तरीही तू तुरुंगातील माणसाच्या शब्दांवर ज्युरीला

विश्वास ठेवायला लाऊ शकत नाहीस. लोवेनला अंगठी नाहीशी करायचा यापेक्षा बरा मार्ग सापडला नसेल, हे चमत्करीक वाटते.”

पायरो त्याचे खांदे घुसळत बोलला, “ठीक आहे. शेवटी जर ती प्रेताशेजारी सापडली असती, तर असा वाद घालता आला असता, की दवेनहेमने स्वतःच ती टाकली.”

मी ओरडलो, “पण प्रेतावरुन ती काढावीच का?”

जाप बोलला, “त्याचे काही कारण असेल. तुम्हाला माहिती आहे का, की तळ्यापासून पलीकडील लहानशा गेटने टेकडीवर जाता येते. आणि तीन मिनिटाचा रस्ता तुम्हाला काय वाटते, कुठे जात असेल? --- चुन्यापासून चुनखडी करायच्या कारखान्यात.”

मी ओरडलो, “अरे बापरे! म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का, की जो चुना प्रेताची विल्हेवाट लावू शकतो, तो अंगठीच्या धातूला काही करू शकणार नाही?”

“बरोबर.”

मी म्हणालो, “मला वाटते, हे सर्व काही स्पष्ट करते आहे. काय भयंकर गुन्हा आहे!”

संगनमत केल्यासारखे आम्ही दोघांनी पायरोकडे बघितले. तो विचारात हरवून गेला होता. काही अतिशय निकराच्या मानसिक त्रासाने त्याच्या भुवया आक्रसल्या होत्या. तो त्याची बुद्धी पणाला

लावायचा आटोकाट प्रयत्न करत होता. तो केव्हा बोलेल? आम्हाला त्याने फार वेळ संशयात ठेवले नाही. एक सुस्कारा टाकून, त्याच्या दृष्टीचा ताण थोडा कमी करून त्याने जापला विचारले,

“माझ्या मित्रा, तुला काही कल्पना आहे का, की मिस्टर आणि मिसेस दवेनहेम हे दोघे एकाच खोलीत झोपत असत का?”

तो प्रश्न इतका मूर्खासारखा वाटत होता, की क्षणभर आम्ही शांतपणे त्याच्याकडे बघू लागलो. मग जाप जोराने हसू लागला. “अरे देवा! मिस्टर पायरो, आम्हाला वाटले, तू काही खळबळजनक बोलशील. तुझा प्रश्न म्हणशील, तर मला माहिती नाही.”

पायरो त्याचे म्हणणे लावून धरत बोलला, “तू ते शोधून काढू शकशील का?”

“ओहो, नक्कीच --- ते तुला खरेच ते हवे असेल, तर.”

“तर मग माझ्यावर दया कर. तू मला ते सांगितलेस, तर मी उपकृत होईन.”

जाप त्याच्याकडे मिनिटभर रोखून बघत राहिला. पण पायरो आम्हा दोघांना विसरून गेला होता. त्या गुप्तहेराने माझ्याकडे बघून त्याचे डोके उदासीनतेने हलवले व पुटपुटला, “बिचारा! बायकोशी

भांडण व वेगळे झोपणे, त्याच्यासाठी फार मोठा शाप ठरला.” तो हळूच खोलीबाहेर निघून गेला.

तो दिवास्वप्नात हरवून गेला. मी एक कागद घेऊन, काहीतरी लिहून माझे मनोरंजन करू लागलो. माझ्या मित्राचा चढलेला आवाज माझ्या कानावर पडला. तो त्याच्या चिंतनातून बाहेर पडला. आता तो हुशार दिसत होता.

“अरे मित्रा, तू इथे काय करतो आहेस?”

“मी काय काय झाले, ते या प्रकरणातील महत्वाचे मुद्दे लिहून काढत होतो.”

पायरो पसंती दर्शवत बोलला, “शेवटी --- तू फारच पद्धतशीर झालास.”

मी माझा आनंद लपवत होतो. “मी तुम्हाला ते वाचून दाखवू का?”

“अवश्य.”

मी माझा घसा खाकरला.

“एकः सर्व पुराव्यांवरून असे दिसते की तिजोरी फोडणारा लोवेन होता.

दोनः त्याच्या मनात दवेनहेमविषयी आकस होता.

तीनः त्याने अभ्यासिका सोडल्याचे नाकारले, ते विधान खोटे होते.

चारः जर तुम्ही बिली केलेटच्या गोष्टीवर विश्वास ठेवला, तर अगदी खात्रीने लोवेन गुन्हेगार आहे.”

मी थांबलो. मी विचारले, “काय? कसे वाटले?” कारण मला वाटत होते की सर्व महत्वाच्या बाबींवर मी बोट ठेवले आहे.

पायरोने त्याचे डोके हलवत, माझ्याकडे दया येऊन पाहिले. “माझ्या बिचाऱ्या मित्रा, त्याचे असे आहे की तुला रहस्य उकलायची देणगी मिळालेली नाही. महत्वाचे असे जे आहे, ते तू वाखाणलेच नाहीस. शिवाय तू चुकीचा तर्क केलास.”

‘कसे काय?”

“मला तुझे चार मुद्दे घेऊ दे.”

“एकः आपल्याला तिजोरी उघडायची संधी साहे, हे मिस्टर लोवेनला माहिती नव्हते. तो व्यावसायिक कामासाठी आला होता. मिस्टर दवेनहेम पत्र टाकायला बाहेर गेले आहेत व तो अभ्यासिकेत एकटाच असेल, हे त्याला आधी माहिती नव्हते.”

मी सुचवले, “पण त्याने संधी मिळताच झडप घातली असेल.”

“आणि हत्यारे? सभ्य माणसे त्यांच्याबरोबर तिजोऱ्या फोडायची हत्यारे ठेवत नाहीत. आणि मिटवता येणाऱ्या चाकूने, खरे तर कोणाला तिजोरी फोडता येत नाही.”

“ठीक आहे दोन नंबरचे काय?”

“तू म्हणतोस, लोवेनला दवेनहेमबद्दल आकस होता. म्हणजे तुला म्हणायचे आहे की त्याला एकदोन वेळा त्याने मदत केली होती. पण त्याने ते व्यवहार कुठल्याही प्रकारे, त्याच्या स्वतःच्या फायद्यासाठी केले. हे बरोबर उलटे होते आहे. आकस असेल तर तो लोवेनबद्दल मिस्टर दवेनहेमच्या बाजूने होता.”

“ठीक आहे. त्याने कधीच अभ्यासिका सोडली नाही, असे त्याने खोटे सांगितले, हे तर तुम्ही नाकारू शकत नाही?”

“नाही. पण तो कदाचित घाबरला असेल. लक्षात ठेव, हरवलेल्या माणसाचे कपडे आताच तळ्यात सापडले आहेत. अर्थात नेहमीप्रमाणे, त्याने खरे बोललेले चांगले ठरले असते.”

“आणि चौथा मुद्दा?”

“तो बरोबर आहे. जर केलेटची गोष्ट खरी असेल, तर लोवेन वादातीतपणे खुनी ठरतो. त्यामुळे हे प्रकरण स्वारस्य असलेले ठरते.”

“म्हणजे मी एका महत्वाच्या बाबीसाठी कौतुकास पात्र ठरलो आहे, नाही का?”

“कदाचित --- पण सर्व प्रकरणात संशयातीतपणे दिसणाऱ्या दोन महत्वाच्या पुराव्यांकडे तू दुर्लक्ष केले आहेस.”

“ते कुठले आहेत?”

“पहिली म्हणजे मिस्टर दवेनहेम गेल्या काही वर्षांमध्ये दागदागिन्यांची खरेदी करत होता. आणि नंबर दोन म्हणजे त्याची गेल्या हिवाळयातील ब्युनोस एअर्स येथील सहल.”

“पायरो, तू विनोद करतो आहेस का?”

“नाही. मी गंभीर आहे. ओहो, पण मला आशा आहे, की जाप माझे छोटेसे कमिशन विसरला नसेल.”

पण तो गुप्तहेर जरी विनोद करत असला, तरी त्याला हे नक्की आठवत होते, की आपल्या विनंतीप्रमाणे जापने कारवाई केली असेल. दुसऱ्या दिवशी सकाळी साधारण अकरा वाजता, पायरोला जापकडून एक तार आली. त्याच्या विनंतीनुसार मी ती उघडून वाचलीः

“नवरा व बायको गेल्या हिवाळयापासून वेगळया खोलीत झोपत असत.”

पायरो ओरडला, “ओहो, आणि आता जूनचा मध्य चालू आहे. सर्व रहस्य सुटले.”

मी त्याच्याकडे बघू लागलो.

“अरे मित्रा, ‘दवेनहेम आणि साल्मन’ बँकेत तुझे पैसे नाहीत ना?”

मी नवल करत बोललो, “नाही. का?”

“कारण फार उशीर होण्यापूर्वी, ते काढून घे.”

“का, तुला काय होईल असे वाटते आहे?”

“काही दिवसात मोठा घोटाळा होणार आहे --- लवकरच. मला आता आठवण झाली, की आपण जापला निरोप पाठवायला हवा. एक पेन्सील आणि कागद आण बघू. ‘प्रश्नचिन्हांकित बँकेतून पैसे काढून घे.’ त्यामुळे तो काही कृती करण्यासाठी उद्युक्त होईल. त्याचे डोळे पूर्ण उघडतील. नाहीतर त्याला उद्यापर्यंत किंवा त्यापुढील दिवसापर्यंत थोडेही समजणार नाही.”

मलाही धड काही समजले नाही. पण माझ्या मित्राच्या उल्लेखनीय शक्तीला मी प्रणाम केला. दुसऱ्या दिवशी प्रत्येक वर्तमानपत्रात मोठी ठळक बातमी होती, की ‘दवेनहेम आणि साल्मन बँक’ बुडाली. बँकेतील आर्थिक व्यवहार खुले करण्याच्या

संदर्भात प्रसिद्ध बँकर दवेनहेमच्या नाहीसे होण्याशी, वेगवेगळ्या प्रकारे संबंध जोडला जाऊ लागला.

आमची अर्धवट न्याहारी करून होते आहे, तोच धाडकन दार उघडून जाप आत शिरला. त्याच्या डाव्या हातात एक कागद होता व उजव्या हातात पायरोची तार होती. ती त्याने माझ्या मित्रासमोर टेबलावर आपटली.

“मिस्टर पायरो, तुला हे कसे समजले? ही प्रक्षोभक बातमी तुला कशी समजली?”

पायरो त्याच्याकडे बघून शांतपणे हसला. “अरे मित्रा, तुझ्या तारेनंतर ती खात्रीच झाली. असे बघ, सुरवातीपासून मला वाटत होते की तिजोरी फोडली जाणे, हे काहीसे उल्लेखनीय आहे. रत्ने, तयार नोटा, ज्याचे पैसे करता येतील असे रोखे --- सर्व इतके सोयीस्करपणे ठेवलेले होते. कुणासाठी? आणि मिस्टर दवेनहेम तर एक नंबरचे काळजी घेणारे होते, असे तू म्हणाला होतास. त्यामुळे माझी खात्री झाली, की हे सर्व त्याने स्वतः रचले होते. आता त्याचा अलीकडील रत्ने विकत घेण्याचा सपाटा! किती साधे! बँकेतील पैसे लंपास करून तो रत्ने घेत होता. नक्कीच असे असावे, की तो ती बायकोच्या नावाने तिजोरीत ठेवत होता.  म्हणजेच तो ती रत्ने वेगळ्या नावाने सुरक्षित जागी तिजोरीत ठेवत होता. जेव्हा इतरांचे

बारा वाजतील तेव्हासाठी स्वतःचा भविष्यकाळ चांगला असेल, असे तो बघत होता. त्याचे हे काळे धंदे करून झाले. मग त्याने लोवेनला [जो भूतकाळात महान दवेनहेमला एकदोन वेळा छेडण्याइतका पुरेसा बेदरकार होता ] बोलावले. दवेनहेमने तिजोरीला भोक पाडून, लोवेन येईल तेव्हा बायकोला त्याला अभ्यासिकेत बसवायला सांगून ठेवले व स्वतःघराबाहेर पडला --- कुठे? पायरो थांबला. आणि अजून गुपिते फोडायला त्याचे हात ताणले. तो हसला. तो पुटपुटला, "याला खरे तर आधार असा काही नाही. प्रत्येक कोंबडी वेगळ्या आकाराचे अंडे घालते. न्याहारीच्या टेबलावर काय साधर्म्य दिसेल? निदान दुकानात ते ती अंडी डझनात विभागून ठेवतात.

जाप अधीरपणे बोलला, "अंड्यांचे जाऊ दे. त्याना कसेही रचले जाऊ दे. आम्हाला सांग की आपले गिऱ्हाईक कुठे गेले? --- म्हणजे तुला माहिती असेल तर!"

"अरे मित्रा, तो त्याच्या लपायच्या जागी गेला. ओहो, या मिस्टर दवेनहेमच्या मेंदूतील करड्या पेशींमध्ये काही गडबड झाली असेल. पण त्या गुणांनी नंबर एकच्या आहेत."

"तो कुठे लपला आहे, ते तुला माहिती आहे का?"

"खात्रीपूर्वक! ती फार हुशारीची जागा आहे."

“कृपया ती जागा आम्हाला सांग.”

पायरोने त्याच्या ताटलीतील सर्व तुकडे एकत्र केले. ते अंड्याच्या टरफलात ठेवले आणि रिकामे अंड्याचे कवच त्यावर ठेवले. हे छोटेसे काम परिणामकारक रीतीने करून झाल्यावर तो हसला. मग त्याने प्रेमाने आमच्या दोघांकडे बघितले.

“या, माझ्या मित्रानो, तुम्ही बुद्धिमान आहात. मी स्वतःला जो प्रश्न विचारला, तो तुम्हीदेखील स्वतःला विचारा. मी जर हा माणूस असतो, तर मी कुठे लपलो असतो? हेस्टीग्ज, तू काय सांगशील?”

मी म्हणालो, “मला वाटते, मी लंडनमध्येच राहीन --- सर्व गोष्टींपासून जवळ --- ट्यूबने व बसने प्रवास करेन. दहा ते एक मी कुणालाही ओळखू येणार नाही. गर्दीमध्ये सुरक्षितता असते.”

पायरो प्रश्नार्थक नजरेने जापकडे वळला. “मला हे पटत नाही. ताबडतोब कुठेतरी लांब निघून जाणे --- तेवढेच करणे शक्य आहे. तयारीसाठी माझ्याकडे भरपूर वेळ आहे. माझ्यासाठी वाफेची बोट तयार आहे. गडबड गोंधळ सुरु होण्यापूर्वी, मी जगाच्या सुनसान कोपऱ्यात जाऊन पोचलेला असेन.”

आम्ही दोघांनी पायरोकडे बघितले. “मिस्टर पायरो, तू काय म्हणतोस?”

क्षणभर तो गप्प राहिला. मग त्याच्या चेहऱ्यावर चौकस हास्य उमटले.

"माझ्या मित्रानो, जर तुम्हाला पोलीसांपासून स्वतःला वाचवायचे असेल, तर मी कुठे लपेन? तुरुंगात!"

"काय?"

"तुम्ही मिस्टर दवेनहेमला तुरुंगात टाकण्यासाठी त्याला शोधत आहात, त्यामुळे तुमच्या असे डोक्यात येतच नाही, की तो तुरुंगातच आहे."

"म्हणजे तुला काय म्हणायचे आहे तरी काय?"

"तुम्ही मला सांगत आहात, की मिसेस दवेनहेम ही फारशी हुशार बाई नाही. तथापि मला वाटते, जर तुम्ही तिला बो रस्त्यावर नेलेत आणि बिली केलेटबरोबर तिची भेट घडवून आणलीत, तर ती त्याला ओळखेल. फक्त त्याने दाढी मिशा व दाट भुवया काढून टाकल्या आहेत व केस कमी केले आहेत. सारे जग फसले, तरी बाई जवळजवळ नेहमी तिच्या नवऱ्याला ओळखते."

"बिली केलेट? पण तो तर पोलिसांना माहिती आहे."

"मी तुम्हाला सांगितले नाही का, की दवेनहेम हुशार माणूस आहे म्हणून? त्याने त्याची त्याच्या बेमालूम वेषांतराची तयारी आधीपासूनच करून ठेवली होती. गेल्या हिवाळ्यात तो ब्युनोस

एअर्सला गेलाच नव्हता. तो तीन महिने बिली केलेटचे पात्र उभे करण्याची तयारी करत होता. म्हणजे मग आयत्या वेळी पोलिसांना काही संशय आला नसता. तो स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी व उज्वल भवितव्यासाठी हे करत होता. हे सर्व बेमालूमपणे करणे ठीक होते. फक्त --- “

‘काय?’

अरे मित्रा, नंतर त्याला खोटी दाढी व खोटा केसांचा टोप घालावा लागत असे व स्वतःला परत मिस्टर दवेनहेम बनवावे लागे. आणि खोटी दाढी लावून झोपणे सोपे नव्हते --- ते चाचपणीला आवाहन करते. तो त्याच्या बायकोच्या खोलीत झोपायचा धोका घेऊ शकत नाही. तू माझ्याकरता हे शोधून काढलेस, की गेले सहा महिने किंवा तो ब्युनोस एअर्सहून परत आल्यापासून, तो आणि मिसेस दवेनहेम वेगळ्या खोलीत झोपत आहेत. मग माझी खात्री पटली. मी सापळा रचला. माळ्याने त्याच्या मालकाला घराभोवती चक्कर मारताना पाहिले होते, ते बरोबर होते. तो बोटघरात गेला. त्याच्या नोकरापासून सुरक्षितपणे लपवलेले फसवे कपडे घातले. इतर कपडे तळ्यात फेकून दिले आणि त्याच्या बेताप्रमाणे अंगठी गहाण ठेवायच्या मोहिमेवर निघाला. मग पोलिसावर हल्ला करायचा बेतही ठरलेला होता. मग

तो जिथे तो असण्याची कुणी अपेक्षा करणार नाही, अशा बो रस्त्यावरील तुरुंगात उर्फ त्याच्या स्वर्गात जाऊन पोचला.”

जाप पुटपुटला, “हे अशक्य आहे.”

माझा मित्र हसत म्हणाला. “बाईसाहेबांना विचार.”

दुसऱ्या दिवशी पायरोच्या न्याहारीच्या ताटलीजवळ एक रजिस्टर्ड पत्र पडले होते. त्याने ते उघडल्यावर त्यातून पाच पौंडाची नोट बाहेर पडली. माझ्या मित्राची भुवई चढली. तो बोलला, “अरे माझ्या राजा, पण मी याचे काय करू?” “

पत्रात असे होते, “मला मी चुकल्याचा पश्चात्ताप होतो आहे.” बिचारा जाप? ओहो, एक कल्पना आहे. आपण एक छोटे जेवण ठेऊ. आपण तिघे! त्यामुळे मला समाधान मिळेल. हे खरेच अगदी सोपे आहे. मला लाज वाटते. हजारो टाळ्या वाजल्या तरी --- मी एखाद्या मुलालाही लुबाडत नाही. माझ्या मित्रा, तू आता मनापासून का हसतो आहेस?

THE KING OF CLUBS

# किल्वरचा राजा



## एक

वर्तमानपत्र बाजूला टाकत, मी म्हणालो, “सत्य हे कल्पनेपेक्षा विचित्र असते.”

हा शेरा कदाचित मूळचा नव्हता. पण त्याने माझ्या मित्राला विचार करायला प्रवृत्त केले. त्याचे अंड्याच्या आकाराचे डोके एका बाजूला झुकवत, त्या छोट्या माणसाने त्याच्या पँटवरील

काल्पनिक धूळ काळजीपूर्वक झाडली व बोलला, “किती मस्त! माझा मित्र हेस्टींग्ज किती विचारवंत आहे!”

हा चांगलाच फसवा असलेला शेरा ऐकूनही जरादेखील न चिडता, मी टिचक्या मारून माझ्या हातातील वर्तमानपत्र बाजूला टाकले.

“तू हे सकाळचे वर्तमानपत्र वाचलेस का?”

“हो. आणि वाचून झाल्यावर ते पद्धतशीरपणे दुमडून ठेवले. नीटनेटकेपणा नसलेल्या तुझ्या वाईट सवयीसारखे, मी ते जमिनीवर फेकून दिले नाही.”

[ ही पायरोची सर्वात वाईट सवय होती आणि तो सवयीचा गुलाम होता. तो ही गोष्ट टोकाची ताणून त्याच्या यशाचे कारण सर्वस्वाने तेच असल्याचे सांगे. ]

नंतर तुम्ही गाण्याच्या, नाचाच्या वा नाटकाच्या खेळांचा व्यवस्थापक असलेल्या, हेन्री रीडबर्नच्या खुनाची बातमी बघता, नाही का? ही बातमी वाचून मी वरील शेरा मारलेला असतो. ‘सत्य हे कल्पनेपेक्षा विचित्र असते’, एवढेच नव्हे तर --- ते जास्त नाटकी असते. ओगलँडर्स हे मध्यमवर्गीय बळकट इंग्लिश कुटुंब बघा. आईवडील, मुलगामुलगी --- देशामधील कुठल्याही हजारो ठराविक कुटुंबासारखेच एक कुटुंब. त्यातील माणसे रोज शहरात

जातात. स्त्रिया घर सांभाळतात. त्यांचे आयुष्य पूर्णपणे शांततामय असते. अगदी एकसुरी असते. काल रात्री ते डैसिमिड कुटुंब त्यांच्या उपनगरातील, स्ट्रीथॅम येथील हॉलमध्ये ब्रिज खेळत बसलेले असतात. अचानक काही पूर्वसूचनेशिवाय, फ्रेंच खिडकी उघडते आणि एक बाई आत घुसते. तिच्या सॅटीनच्या करड्या झग्यावर कोनफळी डाग पडलेले असतात. ती एकच शब्द उच्चारते, “खून!” आणि बेशुद्ध होऊन जमिनीवर पडते. असे शक्य आहे, की ते तिला तिच्या फोटोवरून ती व्हॅलेरी सेंटक्लेअर नावाची प्रसिद्ध नर्तिका असल्याचे ओळखत असतील. अलीकडे तिचे कार्यक्रम लंडनमध्ये फार गाजत होते.

पायरोने विचारले, “ही तुमच्या परिचयाची आहे का, की फक्त वर्तमानपत्रात तिला पाहिले आहे?

वर्तमानपत्राचा वार्ताहर छापखान्यात जायच्या घाईत होता. आणि ठळक बाबींवर त्याने समाधान मानले. पण गोष्टीतील नाटकीपणाने मला ताबडतोब धक्का बसला.

पायरोने विचारपूर्वक मान हलवली. “जिथे जिथे मानवी स्वभाव आहे, तिथे तिथे नाटक आलेच. पण --- तुम्हाला ते जिथे आहे, असे वाटते, तिथेच ते असते. हे लक्षात ठेवा. तरीही

मलासुद्धा या केसमध्ये स्वारस्य आहे. त्यामुळे मी यात लक्ष घालेन, असा माझा अंदाज आहे.”

“खरच?”

“हो. एका सभ्य गृहस्थाने सकाळी माझा दरवाजा खटखटवून, माझी मॉरानीयाचा राजपुत्र पॉल याच्याबरोबर भेटीची वेळ ठरवली.”

“पण त्याचा या गोष्टीशी काय संबंध?”

“तू वर्तमानपत्रातील बातमी नीट वाचत नाहीस. मजेशीर गोष्टी असलेली स्फुटे, ‘छोट्या उंदराने ऐकले’ किंवा ‘लहानशा पक्ष्याला माहिती करून घ्यायला आवडेल’ --- ही बघ.

मी त्याचे परिच्छेदावर फिरणारे छोटेसे जाड बोट बघत गेलो. --- ‘परदेशी राजपुत्र आणि प्रसिद्ध नर्तिका खरेच एकमेकांच्या प्रेमात पडले आहेत का? आणि तिला भेट मिळालेली नवीन हिऱ्याची अंगठी आवडली का?’

पायरो म्हणाला, “आणि आता तुझ्या नाटकी गोष्टीकडे!”

“मिस सेंटक्लेअर डैसिमिड कुटुंबाच्या हॉलमधील गालीच्यावर चक्कर येऊन पडलेली बातमी तुला आठवत असेल.”

मी शहारलो. मिसचे पहिले गुणगुणणारे शब्द बाहेर पडले, तेव्हा ओगलँडर्समधील दोन माणसांपैकी एक डॉक्टरांना आणण्यासाठी धावला. तर दुसरा पोलीस स्टेशनकडे धावला. तिला फारच धक्का बसला होता. गोष्ट सांगितल्यावर, पोलीस त्याच्याबरोबर ‘माझी इच्छा’ या मिस्टर रीडबर्न यांच्या मोठ्या घराशी आला. ते घर डैसिमिड कुटुंबाच्या घरापासून जवळच होते. तिथे त्यांनी काहीशी दुष्कीर्ती पसरलेल्या मोठ्या माणसाला, वाचनालयात पडलेले पाहिले. त्याचे डोके मागील बाजूने अंड्यासारखे फुटले होते.

पायरो दयाळूपणे म्हणाला, “मी तुझ्या लकबी उचलल्या. मला माफ कर. ओहो, मिस्टर राजपुत्र इथे आला आहे.”.

आमचा विशेष पाहुणा उमराव फेडोर म्हणून पुकारला गेला. तो दिसायला विचित्र तरुण होता. उंच, उत्सुक, कमकुवत हनुवटी असलेला, प्रसिद्ध न्युरेमबर्ग या जर्मनीतील गावातील वैशिष्ट्यपूर्ण तोंड असलेला व गडद भीतीदायक, बोलके डोळे असलेला होता.

“मिस्टर पायरो?”

माझा मित्र पुढे झुकला.

“मिस्टर, मी फार त्रासात आहे. किती ते मला सांगता येत नाही आहे –-- “

पायरोने त्याचा हात हलवला. “मला तुमची काळजी समजू शकते. मिस सेंटक्लेअर तुमची खास मैत्रीण आहे ना?”

राजपुत्र बोलला, “मी तिच्याशी लग्न करणार आहे.”

पायरो डोळे पूर्ण उघडून, त्याच्या खुर्चीत बसला.

राजपुत्राने पुढे चालू ठेवले, “खालच्या जातीच्या मुलीशी लग्न करणारा मी, आमच्या कुटुंबातील पहिला नाही. माझा भाऊ अलेक्झांडरने सुद्धा सम्राटाला विरोध केला. आम्ही आता जुन्या राजवाड्यातील पूर्वग्रहांपासून दूर रहात आहोत. शिवाय, मिस सेंटक्लेअर, खरे तर माझ्या बरोबरीच्या घराण्यातील आहे. तुम्ही तिच्या इतिहासाबद्दल ऐकले आहे का?”

तिच्या कुलाविषयी अद्भुतरम्य कथा आहेत ---प्रसिद्ध नर्तकीसाठी हे काही नवीन नाही. मी असे ऐकले आहे, की ती आयरिश मोलकरणीची मुलगी आहे. तिची आई रशियन खानदानी घराण्यातील असल्याचेही मी ऐकले आहे.”

तो तरुण बोलला, “पहिली गोष्ट अर्थात थाप आहे. पण दुसरी खरी आहे. जरी आमची लग्नाची बातमी गुप्त असली, तरी व्हॅलेरीने मला चांगलाच तर्क करायला लावले होते. तिने नकळत ते हजार प्रकारे सिद्ध केले होते.”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “मी वंशपरंपरा मानतो. त्या बाबतीत मला काही विचित्र अनुभव आलेले आहेत --- मी सांगतो --- पण राजपुत्रा, फक्त कामापुरते. तुमची माझ्याकडून काय अपेक्षा आहे? तुम्हाला कसली भीती वाटते? मी मोकळेपणे बोलतो, नाही का? मिस सेंटक्लेअर, काही गुन्ह्याशी संबंधित आहे का? अर्थात तिला रीडबर्न माहिती असेल ना?”

“हो. त्याचे तिच्यावर प्रेम होते.”

“आणि तिचे?”

“तिला त्याला काहीच सांगायचे नसावे.”

पायरोने त्याच्याकडे रोखून पाहिले. “त्याला घाबरायचे तिला काही कारण होते का?”

तो तरुण मनुष्य का कू करू लागला. “एक प्रसंग घडला होता. तुम्हाला भविष्यातील गोष्ट जाणणारी झारा माहिती आहे का?”

“नाही.”

“ती आश्चर्यकारक आहे. तुम्ही तिचा सल्ला कधीतरी मागितला पाहिजे. व्हॅलेरी व मी तिला मागील आठवड्यात भेटलो. तिने आमची भविष्याची कार्डे वाचली. ती व्हॅलेरीला त्रासाबद्दल म्हणाली, संकटाचे मळभ दाटून येण्याबद्दल बोलली. मग तिने शेवटचे कार्ड पाहिले --- त्याला ते आवाका ठरवणारे कार्ड

म्हणतात --- ती व्हॅलेरीला म्हणाली, “दक्ष रहा. एक मनुष्य तुला कब्जात घ्यायला बघतो आहे. तू त्याला घाबरतेस. त्याच्याकडून तुला धोका आहे. मी कोणाबद्दल बोलते आहे, ते कळले का?” व्हॅलेरी घाबरून पांढरी पडली. मान हलवून, ती बोलली,” हो, हो, मला माहिती आहे.” त्यानंतर आम्ही तेथून निघालो. व्हॅलेरीशी बोललेले झाराचे शेवटचे शब्द होते, ‘किल्वरच्या राजापासून सावध रहा. त्याच्यापासून तुला धोका दिसतो आहे.’ मी व्हॅलेरीला विचारले. पण ती काही बोलली नाही --- मी समजून चाललो, की सर्व काही ठीक आहे. आता गेल्या रात्रीनंतर, माझी जास्तच खात्री पटत चालली आहे की व्हॅलेरीने रीडबर्नमध्ये किल्वरच्या राजाला पाहिले आहे आणि त्याला ती घाबरते.”

राजपुत्र मध्येच थांबला. “आता तुम्हाला मी सकाळी वर्तमानपत्र उघडल्यावरची माझी काळजी समजली असेल. मला वाटते, व्हॅलेरीने वेडाच्या भरात --- ओहो, पण हे अशक्य आहे!”

पायरो त्याच्या जागेवरून उठला आणि त्या तरुण माणसाच्या खांद्यावर दयाळूपणे थोपटले. “मी तुला विनवणी करतो, फार दुःख करू नकोस. सगळे काही माझ्यावर सोड.”

तुम्ही स्ट्रीथॅमला जाल? मला वाटते, धक्का बसून आडवी झालेली ती अजून डैसिमिड कुटुंबाच्या घरी आहे.”

“मी लगेच जातो.”

“मी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधून सर्व व्यवस्था केली आहे. तुम्हाला कुठेही प्रवेश मिळेल.”

“मग आपण निरोप घेऊ. हेस्टींग्ज, तू माझ्याबरोबर येतो आहेस? तर मग राजपुत्रा, अच्छा.”

## दोन

‘माझी इच्छा’ हे बरेच मोठे, सुंदर, आधुनिक व आरामशीर घर होते. ते लहानशा वाहने नेण्याच्या वाटेने रस्त्याला जोडलेले होते व देखणी काही एकराची बाग त्यामागे पसरलेली होती.

राजपुत्र पॉलचे नाव सांगितल्यावर दार उघडणाऱ्या स्वयंपाक्याने मला ती दुःखद घटना घडलेल्या ठिकाणी नेले. वाचनालय म्हणजे घराच्या मागेपासून पुढेपर्यंत पसरलेली खूप मोठी खोली होती. त्याच्या दोन्ही शेवटाकडे एकेक खिडकी होती. पुढची वाहने नेण्याच्या वाटेवर उघडत होती. आणि दुसरी मागील बाजूस बागेत उघडत होती. या दुसऱ्या खिडकीशी प्रेत पडलेले होते. ते थोड्या वेळापूर्वी हलवले होते. पोलिसांनी त्यांची कारवाई पूर्ण केली होती.

मी पायरोजवळ पुटपुटलो, “काय काय पुरावे त्यांनी नष्ट केले असतील, कुणास ठाऊक?”

माझा छोटासा मित्र हसला. “अरे मित्रा, मी तुला किती वेळा सांगितले आहे, की पुरावे आतून येतात. मेंदूच्या करड्या भागात प्रत्येक समस्येचे उत्तर सापडते.”

तो स्वयंपाक्याकडे वळला. “मी अशी आशा करतो की फक्त हलवलेले प्रेत सोडून खोलीतील काहीही हलवले नसेल, बरोबर?”

‘नाही सर, आदल्या रात्री पोलीस आले तेव्हा जसे होते, तसेच सर्व काही आहे.”

“आता मला हे पडदे, खिडकीवर पूर्णपणे ओढलेले दिसत आहेत. दुसऱ्या खिडकीतदेखील तसेच आहे. आदल्या रात्री ते तसेच होते का?”

“हो सर, मी ते रोज रात्री ओढून ठेवतो.”

“मग मला वाटते, रीडबर्नने ते स्वतःच उघडले असावे.”

“सर, मलाही असेच वाटते.”

“तुझ्या मालकाने काल कुणा पाहुण्याला बोलावल्याचे तुला माहिती होते का?”

“तसे ते काही बोलले नव्हते. पण जेवणानंतर त्यांना त्रास देऊ नये, अशी आज्ञा त्यांनी दिली होती. असे पहा सर, वाचनालयातून घराच्या बाजूला असणाऱ्या गच्चीकडे जाणारे दार आहे. घराच्या बाजूला असलेली गच्ची! ते कुणालाही तेथून घरात घेऊ शकत होते.”

“तो तसे करत असे का?”

स्वयंपाकी काहीतरी हातचे राखून ठेवत असल्यासारखा खोकला. “माझा असा विश्वास आहे, सर.”

पायरो प्रश्नचिन्हांकित नजरेने दारापर्यंत चालत गेला. ते कुलुपबंद होते. कुलूप उघडल्यावर, तो तेथून गच्चीवर गेला. तिथून उजवीकडून वाहने नेण्याच्या वाटेवर जाता येत होते. तर डावीकडून विटांची लाल भिंत लागत होती.

“सर, फळबागेत उघडणारे दार तिथे आहे. पण ते संध्याकाही सहाला बंद होते.”

पायरोने मान हलवली व परत वाचनालयात आला. त्याच्या मागोमाग स्वयंपाकीही आला.”

“कालच्या घटनेमध्ये तू काही आवाज ऐकलेस का?”

“कसे आहे सर, आम्ही नऊपूर्वी वाचनालयात आवाज ऐकले, पण बाईचा आवाज ऐकू येण्यात वेगळे असे काही नव्हते.

पण अर्थात, एकदा आम्ही घराच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या नोकरांच्या जागी गेलो, की मग त्यानंतर आम्ही काही आवाज ऐकले नाहीत. आणि नंतर साधारण अकरा वाजता पोलीस आले.''

''तुम्ही किती आवाज ऐकले?''

''सर, मला नक्की सांगता येणार नाही. मला बाईचा आवाज आला, एवढे मी सांगू शकतो.''

''अस्स!''

''सर, तुम्हाला भेटायचे असेल, तर डॉक्टर रायन अजून इथे आहेत.''

ते ऐकून आम्ही आनंदित झालो. थोड्याच वेळात एक आनंदी, मध्यमवयीन डॉक्टर तिथे हजर झाला. त्याने पायरोला हवी असलेली माहिती दिली. रीडबर्न खिडकीजवळ पडला होता. त्याचे डोके खिडकीच्या संगमरवरी भागावर पडले होते. त्याला दोन जखमा झालेल्या दिसत होत्या. एक डोळयांच्या मध्ये आणि दुसरी डोक्याच्या मागच्या बाजूला.

''तो पाठीवर पडला होता का?''

'हो. तिथे खूण उमटली आहे.'' त्याने जमिनीवरील एका गडद डागाकडे लक्ष वेधले.

“त्याच्या पाठीवर खाली पडण्याने, त्याच्या डोक्याला मार बसला असावा, नाही का?”

“अशक्य. काही अंतरावरून एक शस्त्र त्याच्या कवटीत घुसवले गेले.”

पायरोने विचारपूर्वक समोर पाहिले. प्रत्येक खिडकीला संगमरवरी भाग होता. त्याच्या कडा नक्षीदारपणे सिंहाच्या डोक्यासारख्या केलेल्या होत्या. पायरोचे डोळे चकाकले. समजा, तो मागील बाजूने या सिंहाच्या डोके बाहेर आलेल्या भागावर पडला असला तर! आणि तेथून घसरून जमिनीवर पडला असला तर! मग त्याला तू वर्णन केल्याप्रमाणे जखमा होतील, नाही का?

‘बरोबर आहे. पण ज्या कोनात तो जमिनीवर पडला होता, ते बघता, ते अशक्य वाटते. शिवाय खिडकीच्या संगमरवरी भागावर रक्ताचे डाग दिसले असते.”

“जर ते धुतले गेले नसतील, तर!”

डॉक्टरने त्याचे खांदे शहारवले. “असे झाले असण्याची फारशी शक्यता वाटत नाही. अपघाताला खुनाचे स्वरूप देणे कुणाच्याच फायद्याचे नव्हते.”

पायरोने म्हटले, “बरोबर आहे. कुठ्लाही धक्का एखाद्या बाईकडून बसला असावा का? तुम्हाला असे वाटते का?”

“नाही. तशी काही शक्यता वाटत नाही. मला वाटते, तुम्ही मिस सेंटक्लेअरबद्दल बोलत आहात?”

पायरो सभ्यपणे म्हणाला, “माझी खात्री होत नाही, तोपर्यंत मी कुणाबद्दल ठामपणे बोलत नाही.

त्याने त्याचे लक्ष उघड्या फ्रेंच खिडकीकडे वळवले. डॉक्टरांनी पुढे चालू ठेवले,

“मिस सेंटक्लेअर इथून पळाली. तुम्हाला झाडांमधून, डैसिमिड कुटुंबाचे घर दुरून दिसू शकते. अर्थात रस्त्यावर या घरासमोर खूप घरे आहेत. पण या बाजूला दिसणारे फक्त डैसिमिड कुटुंबाचे घर असल्याने, हे घडले असावे.”

पायरो म्हणाला, “मित्रत्वाने व सुखकारक रीतीने वागल्याबद्दल धन्यवाद. चल हेस्टींग्ज, आपण मिस सेंटक्लेअर गेली त्या वाटेने जाऊन बघू.”

## तीन

पायरो बागेमधून चालत गेला. लोखंडी दारातून बाहेर पडला. लहानशा हिरवळीतून व नंतर डैसिमिड कुटुंबाच्या बागेतील गेटमधून अर्ध्या एकरावर वसलेल्या व वरवरची भूल न पाडणाऱ्या

त्या छोट्याशा घराकडे गेला. एका फ्रेंच खिडकीकडे जाणाऱ्या काही उंच पायऱ्या होत्या. त्या दिशेने पायरो चालू लागला.

याच वाटेने मिस सेंटक्लेअर गेली होती. तिच्याइतकी आम्हाला घाई नसल्याने, आम्ही वळून पुढील दाराकडे जाणे पसंत केले.”

एका नोकराणीने आम्हाला आत घेऊन हॉलमध्ये नेले. मग ती मिसेस ओगलँडरच्या शोधात गेली. काल रात्रीपासून येथील कुठल्याही वस्तूला हात लावला गेला नव्हता. हॉलच्या मध्यभागी ब्रिजचे टेबल होते आणि शेकोटीत अजून राख पडलेली होती. ब्रिजच्या खेळातील डमीचे पान सगळ्यांना दिसेल, असे ठेवलेले होते. त्या जागेत, स्वस्त पण प्रदर्शनीय वस्तुंची गर्दी झालेली होती. भिंतींवर कुटुंबातील लोकांचे मोठमोठे फोटो  भिंत कुरूप दिसेल, अशा तऱ्हेने टांगलेले होते.

पायरोने त्यांच्याकडे माझ्यापेक्षा जास्त टक लावून पाहिले. त्यातील एकदोन वाकडे झालेले, त्याने सरळ केले. “कुटुंबातील बंध घट्ट दिसत आहेत, नाही का? पण या भावनांनी जागेचे सौदर्य घालवले आहे.”

मी सहमत होतो. एका कौटुंबिक फोटोवर माझी नजर स्थिर झाली. त्यात एक मिशावाला माणूस, केस उंच बांधलेली एक बाई,

एक गब्दुल मुलगा आणि गरजेपेक्षा जास्त रिबिनींचे बो बांधलेल्या दोन लहान मुली एवढे लोक त्यात दिसत होते. मी तो ओगलँडर कुटुंबाचा आधीच्या दिवसांमधील फोटो असल्याचे समजलो. आम्ही त्यात रस घेऊन तो बघितला.

दार उघडून एक तरुण स्त्री आत आली. तिचे काळेभोर केस व्यवस्थित बांधलेले होते. तिने फिकट तपकीरी रंगाचा कोट घातला होता आणि ट्वीडचा स्कर्ट घातला होता.

तिने आमच्याकडे प्रश्नार्थक नजरेने बघितले. पायरो पुढे झाला. “मिस ओगलँडर, तसदीबद्दल क्षमस्व --- विशेषतः या मोठ्या धक्क्यानंतर! हे सर्व प्रकरण तुम्हाला खूपच त्रासदायक ठरले असणार.”

“आम्ही सगळे थोडे उदास झालो आहोत.” त्या तरुणीने काळजी घेत कबूल केले. मला वाटले, की हे नाटकी क्षण मिस ओगलँडरवर फुकट चालले आहेत. कुठल्याही शोकांतिकेपेक्षा तिचे कल्पनादारिद्र्य फार होते. मी मनाशी अशी खात्री बाळगत असतांना ती बोलली, “मी या खोलीच्या दशेबद्दल क्षमा मागते. नोकर इतके मूर्खासारखे उद्दीपित झाले होते.”

“काल रात्री तुम्ही सगळे इथे बसला होतात, नाही का?”

“हो, आम्ही जेवणानंतर ब्रिज खेळत होतो. जेव्हा --- “

“माफ करा, पण तुम्ही किती वेळ खेळत होता?”

मिस ओगलँडर म्हणाली, “खरे तर मी नेमकेपणे सांगू शकणार नाही. मला वाटते रात्रीचे दहा वाजले असावेत. आम्ही दोन दोन खेळ जिंकत गेल्याने आमच्याकडे खूप रबर होते.”

“तुम्ही कुठे बसला होतात?”

“मी खिडकीकडे तोंड करून बसले होते. मी माझ्या आईबरोबर खेळत होते आणि अचानक, काही पूर्वसूचनेशिवाय, खिडकी सताड उघडून मिस सेंटक्लेअर आत घुसली.”

“तुम्ही तिला ओळखले?”

“तिचा चेहरा ओळखीचा असल्याने, मला थोडी कल्पना आली.”

“ती अजून इथे आहे, नाही का?”

“पण तिला कुणाला भेटायचे नाही. ती अजून जमिनीवर उपडी पडलेली आहे.”

“मला वाटते, ती मला भेटेल. तिला सांगाल का, की मॉरानीयाच्या राजपुत्र पॉलच्या तातडीच्या विनवणीवरुन मी इथे आलो आहे?”

मला वाटते राजपुत्राच्या उल्लेखामुळे, मिस ओगलँडर शांत झाली आणि काही न बोलता तिच्या कामगिरीवर गेली. ती लगेच सांगत आली की मिस सेंटक्लेअर तिच्या खोलीत तुम्हाला भेटेल.

आम्ही तिच्यामागोमाग वरती एका मध्यम आकाराच्या झोपायच्या खोलीत गेलो. खिडकीजवळील कोचावर एक स्त्री पहुडली होती. आम्ही खोलीत शिरल्यावर तिने वळून आमच्याकडे पाहिले. दोन स्त्रियांमधील फरकाने मला चक्रावून टाकले. दिसण्यात व रंगात तर फरक होताच, पण मिस सेंटक्लेअरचे दिसणे व हालचाली यात नाटक भरलेले होते. ती जणू अद्भुतरम्यतेच्या वातावरणात श्वास घेत होती. तिने घरगुती कपडे, म्हणजे पायापर्यंत पोचणारा, शेंदरी जाड कापडाचा गाऊन घातला होता. पण तिच्या व्यक्तिमत्वातील गोडवा बहारदार रंग आणत होता. तो पूर्वेकडील झळाळणाऱ्या रंगाचा पेहराव होता.

तिचे गडद मोठे डोळे पायरोवर खिळले.

“तुम्ही पॉलकडून आलात? तिचा आवाज तिच्या दिसण्याशी सुसंगत होता --- तो मोठा पण दमल्यासारखा होता.

“हो मिस, मी इथे त्याना व तुम्हाला मदत करण्यासाठी आलो आहे.”

“तुम्हाला काय माहिती करून घ्यायचे आहे?

“काल रात्री घडले ते सर्व, एकूण एक बाबी.”

ती क्षीणपणे हसली.

“तुम्हाला असे वाटते का, की मी खोटे बोलेन? मी मूर्ख नाही. मी असे बघेन, की काहीही लपवले जाणार नाही. जो मनुष्य मेला, त्याच्याकडे माझे एक गुपित होते. त्यायोगे तो मला धमकावत होता. पॉलसाठी मी त्याच्याबरोबर काही अटी मान्य केल्या. मला पॉलला गमवायचा धोका घ्यायचा नव्हता --- आता तो मेल्यामुळे, मी सुरक्षित झाले आहे. पण मी त्याला मारले नाही.”

पायरोने त्याचे डोके हलवले व तो हसला. “मिस मला ते सांगायची जरुरी नाही. आता मला त्या रात्री काय झाले, ते सविस्तर सांगा.”

मी त्याला पैसे द्यायची तयारी दाखवली. त्यामुळे तो माझ्याशी करार करायला तयार झाला. काल रात्री नऊ वाजता आम्ही भेटलो. मला ‘माझी इच्छा’ या घरी जायचे होते. मला ती जागा माहिती होती. मी तिथे पूर्वी गेले होते. मी गोल चक्कर मारून कडेच्या दाराकडे वाचनालयात गेले, जेणेकरून नोकरांनी मला बघू नये.”

“मिस, मला माफ करा. पण तुम्हाला एकटीला रात्रीच्या वेळी तिथे जायला भीती वाटली नाही?

ती बोलण्यापूर्वी तिथे काही वेळ शांतता पसरली, की मला तसा भास झाला?

कदाचित तसेच झाले असावे. पण माझ्याबरोबर येईल, असे कुणीच नव्हते. मी हवालदिल झाले होते. रीडबर्नने मला वाचनालयात घेतले. ओहो, तो माणूस! तो मेल्याने मला आनंद झाला आहे. मांजर उंदराशी खेळते, तसे तो मला खेळवत होता. त्याने मला टोमणे मारले. मी गुडघ्यांवर बसून त्याची विनवणी केली. मी माझ्याकडची सर्व रत्ने त्याला द्यायची तयारी दाखवली. पण व्यर्थ! मग त्याने त्याच्या अटी सांगितल्या. त्या काय होत्या, त्याची तुम्ही कदाचित कल्पना करू शकाल. मी नकार दिला. मला त्याच्याबद्दल काय वाटते, ते मी त्याला सांगितले. तो माझ्याशी वेड्यासारखे बोलायला लागला. तो शांतपणे हसत राहिला. मी पण शांत राहिल्यावर, शेवटी खिडकीजवळील पडद्यातून एकदम मोठा आवाज आला --- त्यानेही तो ऐकला. तो खिडकीशी धावला व पडदे दूर सारले. तिथे एक भटक्या, भयानक दिसणारा मनुष्य लपलेला होता. त्याने रीडबर्नवर हल्ला केला. परत हल्ला केला. त्याच्या रक्ताळलेल्या हातांनी तो माझ्यावर चालून आला. मी कशीबशी माझी सुटका करून घेतली. खिडकीतून निसटले आणि जीव घेऊन पळत सुटले. शेजारच्या घरातील खिडकीचे प्लॅस्टीक पडदे वर केलेले होते आणि लोक पत्ते खेळत बसले होते.

मी त्या खोलीत जाऊन पडले. मी जेमतेम ओरडू शकले, 'खून' आणि माझ्या डोळयांपुढे अंधारी आली --- "

"मिस, आभारी आहे. तुमच्या मेंदूला चांगलाच धक्का बसला असणार. त्या भटक्या माणसाचे तुम्ही वर्णन करू शकाल का? त्याने काय कपडे घातले होते, ते तुम्हाला आठवते आहे का?

"नाही. हे सर्व इतक्या घाईने झाले. पण मी कुठूनही त्या माणसाला ओळखून काढू शकेन. माझ्या डोक्यात त्याचा ठसा उमटलेला आहे."

"मिस, अजून एक प्रश्न. वाहने नेण्याच्या वाटेवर उघडत असलेल्या खिडकीचे पडदेदेखील बाजूला केलेले होते का?"

त्या नर्तिकेच्या चेहऱ्यावर प्रथमच गोंधळल्यासारखे भाव आले. ती आठवायचा प्रयत्न करत होती.

"मिस, तुम्ही ठीक आहात ना?

"मला वाटते, माझी खात्री आहे --- हो, चांगलीच खात्री आहे.ते ओढलेले नव्हते."

"हे जरा वेगळे वाटते आहे. कारण बाकीचे ओढलेले होते. ठीक आहे. मी सांगायचे धाडस करतो, की हे महत्वाचे आहे. मिस, तुमचा इथे किती दिवस रहायचा विचार आहे?"

“डॉक्टराना असे वाटते आहे, की उद्यापर्यंत मी माझ्या घरी परत जाऊ शकेन.” तिने इकडे तिकडे पाहिले व बोलली, “मिस ओगलँडर बाहेर गेली आहे. हे लोक खूप दयाळू आहेत --- पण ते माझ्या जगातले नाहीत. मला बघून त्यांना धक्का बसतो आणि त्यांना बघून मलाही. मला मध्यमवर्गीयांचे दृष्टीकोन व मूल्ये आवडत नाहीत.”

तिच्या शब्दांना कटूपणाची झालर होती.

पायरोने मान हलवली. “मला समजते. मला अशी आशा आहे, की मी तुम्हाला नको ते प्रश्न विचारून, दमवले नसेल?

“मुळीच नाही. फक्त माझी इच्छा आहे की पॉलला हे सर्व लवकरात लवकर कळावे.”

“तर मग मिस, मी तुम्हाला शुभ दिवस म्हणून निघतो.”

पायरो निघाला. पण त्याने थांबून चामडी चप्पलजोडीवर उडी मारली

“मिस या तुमच्या आहेत?”

“हो. त्या आताच स्वच्छ करून आणल्या आहेत.”

आम्ही जिना उतरल्यावर, पायरो म्हणाला, “ओहो, मला वाटते घरचे लोक स्वच्छतेच्या बाबतीत फारसे काटेकोर नाहीत. ते घरातील तुकड्यांचा किरकोळ कचरा टाकायला विसरले आहेत.

ठीक आहे. माझ्या मित्रा, पहिल्यांदा मला रुची वाटलेले एकदोन मुद्दे सांगतो. पण मला फार भीती वाटते, की आपण ही केस संपल्यातच जमा करायला हवी. सर्व काही सरळसरळ दिसते आहे.''

''आणि खुनी?''

''हर्क्युल पायरोने त्या भटक्याला पकडले नाही.'' माझा मित्र दिखाऊपणे बोलला.

## चार

आम्हाला हॉलमध्ये मिस ओरलँडर भेटली. ''जर तुम्ही इथे थांबलात, तर ममाला तुमच्याशी काही बोलायचे आहे.''

त्या घटनेपासून येथे कोणी काही हलवले नव्हते. पायरोने आळशीपणे पत्ते गोळा केले व त्याच्या छोट्याशा, सवयीच्या हातांनी ते चपखलपणे पिसले.

''माझ्या मित्रा, मला काय वाटते माहिती आहे का?''

मी म्हणालो, ''नाही.''

''मला वाटते, मिस ओगलँडरने पत्ते खेळतांना चूक केली. तिने तिचा बेत बदलायला हवा होता.''

“पायरो, तू अती करतोस.”

“अरे मित्रा, मी काही नेहमी रागावलेला नसतो.”

अचानक तो पुतळ्यासारखा झाला. “हेस्टींग्ज, हेस्टींग्ज, बघ. या पत्त्यांच्या गठ्ठ्यातून किल्वर राजा गायब आहे.

“झारा!” मी ओरडलो.

“काय?” माझे कोड्यात बोलणे त्याला समजले नाही. आपसूकपणे त्याने पत्त्यांचा गठ्ठा खोक्यात ठेऊन दिला. त्याचा चेहरा थंड होता.

शेवटी तो बोलला, “हेस्टींग्ज, मी हर्क्युल पायरो मोठी चूक करणार होतो --- फार मोठी चूक.”

मी त्याच्याकडे बघू लागलो. मी प्रभावित झालो. पण मला काही कळले नाही.

“आपण परत सुरवात करायला हवी. पण यावेळी आपण चूक करणार नाही.”

एका सुंदर मध्यमवयीन स्त्रीने केलेल्या प्रवेशामुळे तो बोलायचा थांबला. तिच्या हातात काही घरगुती पुस्तके होती. पायरोने तिला अभिवादन केले.

“सर, मला असे कळले आहे की तुम्ही मिस सेंटक्लेअरचे मित्र आहात, खरे का?”

“बाईसाहेब, मी तिच्या मित्राकडून आलो आहे.”

“अस्स! मला वाटले कदाचित --- “

पायरोने अचानक खिडकीत बघून मोकळेपणे हाताने निर्देश केला.

“तुमच्या खिडकीचे प्लॅस्टीकचे पडदे काल रात्री खाली केलेले नव्हते का?”

“नव्हते. मला वाटते, त्यामुळेच मिस सेंटक्लेअरला आतील उजेड स्पष्टपणे दिसला.”

“काल रात्री चंद्रप्रकाश होता. तुम्ही इथे खिडकीकडे तोंड करून बसलेल्या होतात, तरी तुम्हाला मिस सेंटक्लेअर दिसली कशी नाही?”

“मला वाटते, आम्ही खेळात पूर्णपणे बुडून गेलो होतो. असे पूर्वी आमच्या बाबतीत कधीच झाले नव्हते.”

“मी विश्वास ठेवू शकतो. आणि मी तुमचे मन शांत करू शकतो. मिस सेंटक्लेअर उद्या परत जाते आहे.”

“ओहो!” त्या चांगल्या बाईचा चेहऱ्यावर सुटकेचे भाव आले.

“बाईसाहेब, मी तुम्हाला शुभ प्रभात म्हणतो.”

आम्ही पुढच्या दाराने बाहेर पडलो, तेव्हा नोकराणी पायऱ्या साफ करत होती. पायरो तिला म्हणाला,

“वरील तरूण स्त्रीचे बूट तुम्ही साफ केले का?

त्या नोकराणीने मान हलवली. नाही, सर. ते साफ केले गेले, असे मला वाटत नाही.”

आम्ही रस्त्यावर उतरतांना पायरोच्या वतीने मी विचारले, “मग कुणी केले?”

“कुणी नाही. ते साफ करायची गरज नव्हती.”

“रस्त्याने किंवा माती असलेल्या वाटेने काल रात्री चालतांना, त्याना माती लागली नसेल, असे मी समजतो. पण बागेतील वाढलेल्या गवतातून चालतांना, त्याना नक्कीच माती लागून डाग पडले असतील.”

पायरो चौकसपणे हसत बोलला, “त्यावेळी त्यांना नक्की डाग पडले असणार.”

‘पण --- “

“माझ्या मित्रा, अजून अर्धा तास कळ काढ. आपण परत ‘माझी इच्छा’ कडे जाणार आहोत.

## पाच

स्वयंपाकी आमच्या परत येण्याने चक्रावलेला दिसला. पण आमच्या परत वाचनालयात शिरण्याला, त्याने हरकत घेतली नाही.

वाहने नेण्याच्या वाटेवर उघडत असलेल्या खिडकीकडे त्याचे दुर्लक्ष होत असल्याचे पाहून मी ओरडलो, “अरे पायरो, ती चुकीची खिडकी आहे.”

“अरे मित्रा, मला तसे वाटत नाही. त्याने सिंहाच्या संगमरवरी डोक्याकडे निर्देश केला. तिथे एक पुसट डाग होता. त्याने चकचकीत फरशीवरदेखील तसाच डाग असलेला दाखवला.

कोणीतरी रीडबर्नला बंद मुठीने दोन डोळयांच्या मध्ये ठोसा मारला होता. तो या खिडकीच्या थोड्याशा बाहेर आलेल्या संगमरवरी भागावर पाठीवर आपटला व नंतर घसरून जमिनीवर पडला असावा. नंतर दुसऱ्या खिडकीपर्यंत त्याला फरफटत नेले गेले. आणि तिथे पाडून ठेवले. पण डॉक्टराने पुराव्यादाखल आपल्याला सांगितलेल्या कोनात नव्हे.”

“पण का? हे पूर्णपणे बिनगरजेचे वाटते.”

“उलट, ते महत्वाचे आहे. शिवाय ती गोष्ट खुन्याची ओळख पटवायला मदत करते आहे --- पण, तसे बघितले तर, त्याचा रीडबर्नला मारायचा इरादा नसावा. त्यामुळे त्याला खुनी म्हणणे धाडसाचे ठरेल. तो फार बळकट मनुष्य असला पाहिजे.”

“त्याने जमिनीवरून रीडबर्नला फरफटत नेले म्हणून?”

“सर्वस्वी त्यामुळे नव्हे. ही रुचीपूर्ण केस दिसते. तरी मी स्वतःला मूर्ख बनवले आहे.”

“तुला असे म्हणायचे आहे का, की ही केस संपली व तू सर्व काही जाणतोस?”

“हो.”

मला एका आठवणींने चपराक बसली. मी ओरडलो, “नाही. एक गोष्ट अशी आहे, जी तुला माहिती नाही.”

“आणि ती कुठली?”

“तुला हे माहिती नाही, की पत्त्यांमधील हरवलेला किल्वर राजा कुठे आहे?”

“कुठे आहे?”

“कुठे? माझ्या मित्रा, ओहो, तीच तर चक्रावणारी गंमत आहे.”

“कशी काय?”

“कारण तो माझ्या खिशात आहे.” मोठ्या थाटात त्याने तो काढून दाखवला.

मी निराशेने म्हणालो, “तुला हा कुठे मिळाला? इथे?”

“त्यात मोठे जाणीवपूर्वक असे काही नाही. फक्त इतर पत्त्यांबरोबर तो घेतला गेला नाही, इतकेच. तो खोक्यात होता.”

“हं! पण त्यामुळे मला एक कल्पना सुचली, नाही का?”

“हो, माझ्या मित्रा. मी त्याबद्दल आपणाला मान देतो.”

“आणि मॅडम झारांना!”

“का?”

“अरे, हो. त्यांनाही. कारण त्यांनी मिस सेंटक्लेअरला सांगितले होते, की तू किल्वरच्या राजापासून सावध रहा. त्याच्यापासून तुला धोका दिसतो आहे.”

“ठीक आहे. आता आपण काय करणार आहोत?”

‘आपण आता शहरात परत जाणार आहोत. पण तत्पूर्वी मला डैसिमिड कुटुंबातील एका बाईबरोबर बोलायला हवे.”

“त्याच लहानशा नोकराणीने दार उघडले.

“ते सगळेजण दुपारचे जेवण घेत आहेत. पण तुम्हाला मिस सेंटक्लेअर यांना भेटायचे असेल, तर त्या विश्रांती घेत आहेत.”

“मला काही मिनिटे मिसेस ओगलँडरना भेटायचे आहे. तुम्ही त्यांना तसे सांगाल का?”

आम्हाला हॉलमध्ये थांबायला सांगण्यात आले. आम्ही जातांना आम्हाला जेवणघरात जेवणारे कुटुंब दिसले. आता तिथे दोन जाड, बळकट माणसे होती. त्यातील एक मिशावाला व दुसरा दाढीमिशावाला दिसत होता.

तिथे काही मिनिटात पायरोकडे प्रश्नार्थक नजरेने बघत, मिसेस ओगलँडर आली. पायरोने वाकून, अभिवादन केले.

“बाईसाहेब, आमच्या देशात आईला खूप मान देण्याची व कोवळीकेची भावना असते. आदर्श विवाहित स्त्रीसाठी तिचे कुटुंब तिचे सर्वस्व असते.

हे ऐकून मिसेस ओगलँडर थोडी आश्चर्यचकित झाली.

“या कारणासाठी मी आलो आहे --- एका आईची काळजी घालवण्यासाठी! मिस्टर रीडबर्नचा खुनी सापडणार नाही. भीती बाळगू नका. मी हर्क्युल पायरो, तुम्हाला हे सांगतो आहे. माझे बरोबर आहे, नाही का? की अशी कुणी बाई आहे, जिला मला परत परत खात्री द्यावी लागेल?”

क्षणभर शांतता पसरली. मिसेस ओगलँडर पायरोच्या डोळ्यात बघून त्याचा अंदाज घेत राहिली. शेवटी ती शांतपणे बोलली, “मला माहिती नाही, की तुम्हाला कसे कळले --- पण हो, तुमचे बरोबर आहे.”

पायरोने थंडपणे मान हलवली. “बाईसाहेब, मला एवढेच सांगायचे होते. पण तुम्ही अस्वस्थ होऊ नका. तुमच्या इंग्लिश पोलिसांकडे हर्क्युल पायरोची नजर नाही. त्याना भटक्या माणसाला शोधत बसू दे.” त्याने भिंतीवरील कुटुंबाच्या चित्रावर बोटाच्या नखाने टकटक केली.

“बाईसाहेब, तुम्हाला अजून एक मुलगी होती का, जी वारली?”

परत शांतता पसरली. परत ती त्याच्या डोळ्यात बघू लागली. मग ती बोलली, “हो, ती वारली.”

पायरो थोडक्यात बोलला, “आता आम्हाला शहरात परतले पाहिजे. तुम्ही मला पत्त्यांच्या गठ्ठ्यातील किल्वरच्या राजाला परत गठ्ठ्यात ठेवायची परवानगी द्या. ही एवढीच तुमची चूक होती. तुम्हाला समजले का, की तुम्ही जवळजवळ तासभर फक्त एकावन्न पत्त्यांनी खेळलात --- म्हणजे खरे तर तुम्ही खेळत नव्हतात. ठीक

आहे. ज्याला खेळातील काही समजते, त्याला हे मिनिटाभरात कळेल, की एक पत्ता कमी आहे.  शुभ दिवस!"

आम्ही स्टेशनकडे निघाल्यावर पायरो म्हणाला, "माझ्या मित्रा, आता तू सगळे पाहिले आहेस."

"मी काहीही पाहिले नाही. रीडबर्नला कुणी मारले?"

"जॉन ओगलँडर. मला खात्री नव्हती, की मुलगा खुनी आहे की वडील? पण मुलगा जास्त बळकट व तरुण असल्याने मी तोच खुनी असेल, असे समजलो. त्या दोघांपैकीच कुणीतरी होते, कारण खिडकी."

'का?"

"वाचनालयातून बाहेर पडायचे चार मार्ग होते --- दोन दारे व दोन खिडक्या. पण आपल्यासाठी खरे तर एकच पुरेशी आहे. तीन मार्ग उघडपणे किंवा छुपेपणे पुढील बाजूने होते. पण ही दुर्घटना मागील खिडकीशी झाली. हे असे दाखवण्यासाठी झाले, की व्हॅलेरी सेंटक्लेअर डैसिमिड कुटुंबाच्या घरी केवळ अपघाताने आली. खरे तर अर्थात, तिला चक्कर आली आणि जॉन ओगलँडरने तिला स्वतःच्या खांद्यावरून वाहून नेले. त्यामुळे तो दणकट माणूस होता, असे मी म्हणतो."

“म्हणजे ते दोघे एकदम ‘माझी इच्छा’ या मिस्टर रीडबर्नच्या घरी गेले?”

“हो. मी जेव्हा व्हॅलेरीला विचारले, की तिला एकटीला तिथे जायला भीती वाटली नाही का, तेव्हा ती कां कू करत असल्याचे, तुला आठवत असेल. ‘माझी इच्छा’ इथे जातांना, तिच्याबरोबर जॉन ओगलँडर होता. त्यामुळे मला वाटते, रीडबर्नचे चढलेले डोके शांत झाले नाही. ते भांडले. आणि रीडबर्नने बहुधा व्हॅलेरीचा काही अपमान केला असावा. त्यामुळे जॉन ओगलँडरने त्याला ठार मारले. बाकीचे तुला माहिती आहे.”

“पण ब्रिजचा खेळ कशासाठी?”

“ब्रिजसाठी चार भिडू लागतात. अशी साधी गोष्ट गुन्हेगार शोधण्यासाठी खूप काही सांगून जाते. सबंध संध्याकाळभर तिथे फक्त तीनच लोक होते, याची कुणाला कल्पना होती?”

मी अजून गोंधळलेलाच होतो.

“पण एक गोष्ट मला समजत नाही. नर्तिका व्हॅलेरी सेंटक्लेअरचा व डैसिमिड कुटुंबाचा काय संबंध होता?”

“ओहो, मला नवल वाटते, तुला ते दिसले कसे नाही? तरी तू भिंतीवरील फोटोंकडे खूप वेळ बघत होतास --- माझ्यापेक्षाही जास्त वेळ! मिसेस ओगलँडरची दुसरी मुलगी तिच्या कुटुंबासाठी

मेली असली, तरी जगाला ती व्हॅलेरी सेंटक्लेअर असल्याचे माहिती होते.”

“काय?’

“तू दोघी बहिणींना एकत्र बघितल्यावर तुला त्यांच्यातील साम्य दिसले नाही?”

“मी कबूल केले, “नाही. उलट मला वाटले की या दोघी किती असामान्यपणे वेगळ्या दिसतात!”

“माझ्या प्रिय हेस्टींग्ज, याचे कारण तुझे मन बाहेरील अद्भुतरम्यतेसाठी खूप स्वागतोत्सुक आहे. नाक डोळे इत्यादी अगदी सारखे आहेत. तसाच रंगही. परंतु रुचीपूर्ण गोष्ट अशी आहे, की व्हॅलेरीला तिच्या कुटुंबाची लाज वाटे व कुटुंबाला तिची लाज वाटे. तथापि संकटाच्या प्रसंगी, ती तिच्या भावाकडे मदतीसाठी वळली. आणि जेव्हा सर्व गोष्टी काही वेगळ्याच घडू लागल्या, तेव्हा उल्लेखनीय रित्या सगळे कुटुंब एकत्र आले. कुटुंबाची एकत्र शक्ती ही मोठी सामर्थ्यवान गोष्ट आहे. व्हॅलेरीला तिची ऐतिहासिक हुशारी इथूनच मिळाली. मी राजपुत्र पॉलसारखा वंशपरंपरेवर विश्वास ठेवतो. त्यांनी मला फसवले. पण एका नशीबवान अपघातामुळे, ते कसे बसले होते, याबद्दल मिसेस ओगलँडरचे तिच्या मुलीशी मतभेद झाल्यामुळे, तो तिच्यासाठी कसोटीचा प्रश्न

ठरला. मिसेस ओगलँडरने ती पत्ते खेळायला कशी बसली होती, ते मिस ओगलँडरपेक्षा वेगळे सांगितले. त्यामुळे पायरोला संशय आला. असे घडले नसते, तर ओगलँडर कुटुंबाने हर्क्युल पायरोला पराभूत केले असते.''

''तू राजपुत्राला काय सांगणार?''

''बहुधा व्हॅलेरीने गुन्हा केला नसावा. आणि मला शंका आहे की तो भटक्या कधी पकडला जाईल की नाही? शिवाय झाराला माझ्याकडून धन्यवाद. एक चौकस योगायोग. मी याला किल्वरच्या राजाचे साहस म्हणेन. माझ्या मित्रा, तुला काय वाटते?''

# THE ADVENTURE OF JOHNNIE WAVERLY
# जॉनी वॅव्हर्लीचे साहस



मिसेस वॅव्हर्ली कदाचित सहाव्यांदा म्हणाली, "तुम्हाला एका आईच्या भावना समजतील."

ती विनवणी करत असल्यासारखी पायरोकडे बघत होती. माझा मित्र दुःखी आईच्या बाबतीत नेहमी सहानुभूतीपूर्वक दिलासा देणारे हावभाव करत असे.

"पण हो, पण हो, मला पूर्णपणे समजले. पपा पायरोवर विश्वास असू द्या."

मिस्टर वॅव्हर्लींनी सुरवात केली, "पोलीस --- " त्याच्या बायकोने त्याचे बोलणे मध्येच तोडत म्हटले, "मला पोलीसांशी

अजून काही करायचे नाही. आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि काय झाले, बघा! पण मी मिस्टर पायरोबद्दल इतके ऐकले आहे आणि त्याने इतक्या आश्चर्यकारक गोष्टी केल्या आहेत, की मला वाटते तो आपल्याला मदत करू शकेल. एका आईच्या भावना --- “

पायरोने घाईने पुन्हा हावभावासकट तेच शब्द उच्चारले. मिसेस वॅव्हर्लीच्या भावना खरोखर मनापासूनच्या होत्या. पण त्या तिच्या गर्विष्ठ व कठोर अशा चेहऱ्यावरील हावभावांनी विचित्रपणे विखुरल्या गेल्या होत्या. जेव्हा मी ऐकले, की कार्यालयातील पोऱ्यापासून आताच्या महत्वाचा पदाला पोचलेल्या प्रसिद्ध स्टीलच्या कारखानदाराची ती मुलगी आहे, तेव्हा मला जाणवले, की वंशपरंपरेने तिच्यात बरेच गुण उतरले आहेत.

मिस्टर वॅव्हर्ली हा मोठा, लालसर रंगाचा आनंदी दिसणारा मनुष्य होता. तो त्याचे पाय फाकवून उभा रहात असे आणि जमीनदारासारखा दिसत असे.

मिस्टर पायरो, मला वाटते, त्याच्या व्यवसायासंबंधी तुम्हाला माहिती आहे, नाही का?”

तो प्रश्न काही गरज नसलेला होता. गेले काही दिवस छोट्या जॉनी वॅव्हर्लीच्या पळवण्याच्या बातम्यांनी वर्तमानपत्रे भरलेली

होती. इंग्लंडमधील जुन्या कुटुंबांपैकी वॅव्हर्ली कुटुंब होते. मार्कस वॅव्हर्ली या सरे कोर्टातील माननीय वकीलाचा तीन वर्षाचा नातू जॉनी याला पळवण्यात आले होते.

अर्थात त्यातील महत्वाच्या बाबी मला माहिती आहेत पण मिस्टर वॅव्हर्ली, मी तुम्हाला विनंती करतो की शक्य असेल, तर तुम्ही सगळी गोष्ट मला सविस्तरपणे एकदा परत सांगा.”

“ठीक आहे. या गोष्टीला साधारणपणे दहा दिवसांपूर्वी मला एक निनावी पत्र येण्यापासून सुरवात झाली. काही झाले तरी त्या पशुतुल्य गोष्टी होत्या. मला त्यांची काही सांगड घालता येत नाही. पत्रलेखकाने मानहानीकारक शब्दात असे लिहिले होते, की मी त्याला पंचवीस हजार पौंड खंडणी म्हणून द्यावेत. नाहीतर जॉनीला पळवायची धमकी त्याने दिली होती. मी अर्थात ते पत्र त्याला जास्त महत्व न देता, केराच्या टोपलीत भिरकावून दिले. ती काही मूर्खपणाची धमकी असल्याचे, मी समजून चाललो. पाच दिवसांनी मला अजून दुसरे पत्र आले. ‘तुम्ही पैसे न दिल्यास एकोणतीस तारखेला तुमच्या मुलाला पळवून नेण्यात येईल.’

त्या दिवशी सत्तावीस तारीख होती. माझ्या बायकोला काळजी वाटली पण मला ते पत्र काही गंभीर वाटेना. मी म्हटले,

“जाऊ दे. आम्ही इंग्लंडमध्ये आहोत. इथे कोणी मुले पळवून नेत नाही व खंडणी मागत नाही.”

पायरो म्हणाला, “बरोबर, असे काही इथे राजरोस चालत नाही. पुढे सांगा.”

“तर बायको काही मला सुखाने बसू देईना. मग मी स्कॉटलंड यार्डसमोर माझी तक्रार मांडली. त्यांनी त्याची फारशी दखल घेतली नाही. त्यांचा दृष्टीकोन माझ्यासारखाच होता. अठ्ठावीस तारखेला मला तिसरे पत्र आले. त्यात लिहिले होते, ‘तुम्ही पैसे भरले नाहीत, तर उद्या दुपारी बारा वाजता तुमच्या मुलाला पळवून नेण्यात येईल. त्याला सोडवण्यासाठी तुम्हाला पन्नास हजार पौंड भरावे लागतील.’ असे वाटत होते, की ती पत्रे कुण्या वेड्याने लिहिली आहेत आणि त्यात वेळही नमूद केली आहे. पोलीसांनी मला असे सांगून आश्वस्त केले, की ते काय ते बघून घेतील. इन्स्पेक्टर मॅकनील पुरेशी फौज घेऊन, वॅव्हर्लीला येतील व सर्व ताबा घेतील.

मग मी सुटकेचा निःश्वास टाकत घरी गेलो. परंतु आम्हाला आधीच वेढा पडल्यासारखे वाटत होते. मी सक्त सूचना दिल्या की कुणाही परक्या माणसाला घरात घ्यायचे नाही. काही अनुचित न होता संध्याकाळ गेली. पण दुसऱ्या दिवशी सकाळी माझी बायकोला एकाएकी गंभीर रीत्या बरे नाहीसे झाले. तिच्या

काळजीने मी डॉक्टर डकर्सला निरोप पाठवला. त्याला तिची लक्षणे गोंधळवणारी वाटली. तिला विषबाधा झाली असावी, असे सांगायला का कू करत शेवटी मला त्याच्या मनात ते असल्याचे कळले. त्यात काही धोका नव्हता, असा दिलासा त्याने मला दिला. पण तिला बरे व्हायला एक दोन दिवस लागतील, असे तो म्हणाला. घरी आल्यावर माझ्या उशीला एक चिठ्ठी लावलेली पाहून, मी चक्रावून गेलो. त्यावरील हस्ताक्षर इतर चिठ्ठ्यांवर होते तसेच होते. फक्त तीन शब्द, ‘आज बारा वाजता’

मिस्टर पायरो, मी हे कबूल करतो, की मग मी फारच चिडलो. कुणीतरी घरातलेच यामागे असावे --- कुणीतरी नोकर. मी त्या सगळ्यांना बोलावून चांगले खडसावले. त्यांनी कुणीच एकमेकांवर आरोप केले नाहीत. माझ्या बायकोच्या बरोबर रहाणाऱ्या मिस कॉलिन्सचे हे कृत्य होते. तिने सांगितले की तिने जॉनीच्या दाईला सकाळी घरात गाड्या आणायच्या वाटेवर रेंगाळतांना पाहिले. मी तिला त्याबद्दल शिक्षा केली, तेव्हा ती गयावया करू लागली. तिने जॉनीला त्याच्या बालवर्गाच्या नोकराणीकडे ठेवले होते. आणि स्वतः एका मैत्रिणीला भेटायला गेली होती --- खरे तर एका मित्राला! चांगले थेर चालले होते. माझ्या उशीला चिठ्ठी टाचून ठेवल्याचे तिने नाकारले. ती कदाचित खरेही सांगत असेल. मला माहिती नाही. मुलाची दाई अशा गैरव्यवहारात सामील असलेले,

धोकादायक होते. तिने एका निकराने गुन्हा कबूल केला --- आणि त्याबद्दल मला खात्री होती. शेवटी माझा रागाचा पारा चढला आणि मी सर्व नोकर मंडळींना डच्चू दिला. मी त्याना त्यांचे सामान बांधायला एक तास दिला आणि घराबाहेर हाकलले."

मिस्टर वॅव्हर्लीचा चेहरा स्वतःचा राग आठवून, चांगलाच लाल झाला होता.

पायरोने सुचवले, "मिस्टर हे जरा अन्यायकारक झाले, नाही का? तुम्हाला सगळे माहिती असूनही, तेव्हा तुम्ही शत्रूच्या हातातले बाहुले झाला होतात."

मिस्टर वॅव्हर्लीनी माझ्याकडे रोखून बघितले. "मला असे वाटत नाही. सगळ्यांना काढून टाकायची कल्पना माझी होती. मी लंडनला फोन करून पोलिसांची नवीन कुमक पाठवण्याची विनंती केली. मधल्या वेळात, माझा ज्यांच्यावर विश्वास आहे, तेवढेच लोक घरात होते. मिस कॉलिन्स माझ्या बायकोची सहकारी आहे. स्वयंपाकी, ट्रेडवेल. हा या घरात मी लहान असल्यापासून आहे."

"ही मिस कॉलिन्स तुमच्याकडे कधीपासून होती?"

मिसेस वॅव्हर्ली बोलल्या, "सुमारे एक वर्ष. ती माझ्यासाठी सचिव व सहकारी म्हणून अमूल्य आहे. शिवाय ती घरही उत्तम सांभाळते."

“आणि दाई?”

“ती इथे सहा महिन्यांपासून आहे. ती माझ्याकडे एका चांगल्या ओळखीच्या लोकांकडून आली होती. पण तसेही मला ती विशेष पसंत नव्हती. पण जॉनीला ती आवडत असे.”

“तरीही मला असे वाटते, की तिने काम या संकटाच्या आधीच सोडले होते. कदाचित मिस्टर वॅव्हर्ली तिला परत कामावर ठेवण्याइतके दयाळू होते.”

मिस्टर वॅव्हर्ली पुढे सांगू लागले, “इन्स्पेक्टर मॅकनील साधारण साडेदहाला आला. तोपर्यंत नोकर निघून गेले होते. त्याने त्या व्यवस्थेबद्दल समाधान वाटल्याचे सांगितले. बाहेरील बागेत त्याने घराकडे येणाऱ्या सर्व वाटांवर पहाऱ्यासाठी, त्याची माणसे विखरून ठेवली होती. त्याने मला असे म्हणून आश्वस्त केले, की सर्व गोष्टी सुरळीत असतील, तर आपण निश्चितपणे गूढ गोष्ट शोधून काढू.

“माझ्याबरोबर जॉनी होता. तो, मी व इन्स्पेक्टर आम्ही एकत्र ज्या खोलीला परिषद खोली म्हणतो, तिथे गेलो. इन्स्पेक्टरने खोलीला कुलूप लावले. तिथे मोठे आजोबांचे घड्याळ आहे. जसजसे बारा वाजता दोन्ही काटे एकमेकांवर येत चालले, तसतसे मला कबूल करायला काही वाटत नाही, की मी एखाद्या

मांजराइतका उदास झालो. तिथे काही खळबळजनक आवाज आले व टोले पडू लागले. मी जॉनीला घट्ट धरले. शेवटचा टोला पडला आणि तो पडताच, बाहेर मोठा गोंधळ झाला --- आरडाओरडा आणि पळापळी झाली. इन्स्पेक्टरने खिडकी उघडली. कॉन्स्टेबल धावत आला.

त्याने धापा टाकत सांगितले, "सर, आम्ही त्याला पकडले. तो झुडूपांमधून, खुरडत चालला होता. तो पूर्णपणे मादक द्रव्याच्या नशेत होता."

आम्ही घाईने गच्चीत गेलो. तिथे गबाळया कपड्यातील एका रांगड्या  माणसाला दोन कॉन्स्टेबलनी धरून ठेवले होते. तो सुटण्यासाठी व्यर्थ धडपड करत होता. त्याच्याकडून पोलीसांनी न उघडलेले गाठोडे घेऊन त्यांच्या हातात धरले होते. त्यात कापसाचा एक गठ्ठा होता आणि क्लोरोफॉर्मची बाटली होती.  ते बघून माझे रक्त उसळू लागले. त्यात पण मला उद्देशून एक चिठ्ठी होती. मी ती उघडली. 'तू पैसे भरायला हवे होतेस. तुझ्या मुलाला सोडवण्यासाठी आता पन्नास हजार पौंड भरावे लागतील. तू सर्व काळजी घेतलीस, तरी मी एकोणतीस तारखेला ठरल्याप्रमाणे डल्ला मारलाच."

मी मोठ्याने हसलो. सुटकेचे हास्य! पण मी असे करताच, मला मोटारीचे व किंचाळण्याचे आवाज येऊ लागले. मी माझे डोके हलवले. दक्षिण लॉजकडे मोठ्या वेगाने एक विशाल करडी मोटार निघाली होती. ती चालवणारा मनुष्य किंचाळत होता. पण त्यामुळे मला घाबरून धक्का बसला नाही, तर जॉनीच्या सोनेरी कुरळ्या केसांनी बसला. मोटारीत जॉनी त्याच्या शेजारी होता.

इन्स्पेक्टरने जोराने एक शपथ घेतली. तो ओरडला, "एक मिनिटापूर्वी तर मुलगा तिथे नव्हता." त्याचे डोळे आमच्यावरून फिरले. आम्ही सगळे तिथे होतो. मी, ट्रेडवेल आणि कॉलिन्स. "मिस्टर वॅव्हर्ली, तुम्ही त्याला शेवटचे केव्हा बघितलेत?

"मी मागचा विचार करू लागलो. आठवू लागलो. जेव्हा कॉन्स्टेबलनी आम्हाला बोलावले, तेव्हा मी जॉनीला विसरून, इन्स्पेक्टरबरोबर धावलो. मग एक आवाज आला व त्याने आम्हाला घाबरवले. गावातील चर्चच्या घड्याळाचे ठोके पडत होते. मोठ्या आश्चर्याने इन्स्पेक्टरने त्याचे घड्याळ बाहेर काढले. बरोबर बारा वाजले होते. ठरवल्यासारखे आम्ही परिषद खोलीकडे धावलो. तिथले घड्याळ बारा वाजून दहा मिनिटे झाल्याचे दाखवत होते. कोणीतरी ते मुद्दाम पुढे केलेले दिसत होते. कारण मला तर ते कधी मागे वा पुढे गेलेले आठवत नव्हते. ते अचूक वेळ दाखवे."

मिस्टर वॅव्हर्ली थांबले. पायरो स्वतःशीच हसला. बावरलेल्या वडिलांनी विस्कटलेला लहानसा गालीचा, पायरोने नीट केला.

पायरो पुटपुटला, "खूष करणारी, गोड, धूसर व लहानशी समस्या! मी तुमच्यासाठी ती आनंदाने सोडवेन. खरोखर ती मोठ्या नवलपूर्ण रीतीने आखली आहे."

मिसेस वॅव्हर्लींनी त्याच्याकडे रागाने बघितले व किंचाळली, "पण अरे बाळा --- "

पायरोने परत त्याचा चेहरा गंभीर व सहानुभूतीपूर्ण केला. "बाईसाहेब, तो सुखरूप आहे. त्याला काही त्रास दिला जाणार नाही. हे पळवणारे लोक त्याची चांगली काळजी घेतील. त्यामुळे हवालदील होऊ नका. तो त्यांच्यासाठी सोन्याची अंडी देणारा टर्की --- नव्हे बदक --- आहे, नाही का?"

मिस्टर पायरो, माझी खात्री आहे, की एकच गोष्ट करावी लागेल --- पैसे भरा. मला पहिल्यापासून तेच तर करायचे नव्हते. पण आता! एका आईच्या भावना --- "

पायरो घाईने किंचाळला, "पण आम्ही यापूर्वी --- "

मिस्टर वॅव्हर्ली मध्येच बोलले, "बाकी सगळे तुम्हाला कागदपत्रांवरून नीट कळेल. अर्थात इन्स्पेक्टर मॅकनील लगेच फोन करू लागला. मोटार चालवणाऱ्या माणसाचे व मोटारीचे वर्णन

सगळीकडे कळवण्यात आले. असे भासवण्यात आले, की सर्व काही ठीकठाक होणार आहे. एक माणूस व एक लहान मुलगा असलेल्या मोटारीचे वर्णन लंडनमधील गावोगावी पोचले. एका ठिकाणी ते थांबले. मुलगा रडत होता व अर्थात त्या माणसाला घाबरलेला होता. जेव्हा इन्स्पेक्टर मॅकनीलने सांगितले की मोटार थांबली असून, त्या दोघांना पकडले आहे. मी सुटकेचा निःश्वास टाकून जवळजवळ आजारीच पडलो. पण पुढे काय झाले? तो मुलगा जॉनी नव्हताच. मोटार चालवणारा चांगला हसताखेळता व मुले आवडणारा होता. आमच्यापासून पंधरा मैल असणाऱ्या इडेन्सवेल नावाच्या गावातून त्याने रस्त्यात खेळणाऱ्या एका मुलाला उचलून, प्रेमाने त्याला गाडीतून एक चक्कर मारली होती. पोलिसांच्या खात्रीलायक मूर्ख चुकीचे आभार! त्यांनी सतत त्या चुकीच्या गाडीचा पाठलाग केला नसता, तर त्याना एव्हाना जॉनी मिळाला असता."

"मिस्टर, शांत व्हा. पोलीस हे शूर आणि बुद्धिमान लोक असतात. त्यांची चूक होणे सहज होते. आणि हा पूर्ण बेत फार हुशारीने आखलेला आहे. आताचा त्यांचा माणूस पकडले जाण्याचा खेळ हा मला वाटते, त्यांना आपण सतत दिलेल्या नकाराचाच एक भाग होता. मला वाटते वॅव्हर्ली यांच्या घरात चिठ्ठी व गाठोडे नेऊन देणे हे कामदेखील त्यानेच केले असावे.

आपल्याला बाराला दहा मिनिटे असतांना जर ते दोन्ही मिळाले असते, तर त्याला आधी दिलेल्या दहा शिलिंगच्या नोटेव्यतिरिक्त अजून दहा शिलिंग मिळाले असणार. त्याने घराकडे बाजूच्या दाराने टकटक करायचे, हे देखील ठरलेले होते.''

मिसेस वॅव्हर्ली रागाने म्हणाली, ''मी यातील एकाही शब्दावर विश्वास ठेवत नाही. हे सर्व खोटे आहे.''

पायरो विचारपूर्वक म्हणाला, ''खरे तर ही अंदाजे गोष्ट आहे. पण जोपर्यंत ते ती फिरवत नाहीत, तोपर्यंत मला वाटते, त्याने बेकायदेशीरपणे काही विशिष्ट चूक केली असावी, नाही का?''

तो मिसेस वॅव्हर्लीला विचारत होता. ती चिडून लाल झाली.

त्या मनुष्याने उद्धटपणे असे ढोंग केले होते, की ट्रेडवेलने त्याला गाठोडे दिले, तेव्हा त्याने ट्रेडवेलला ओळखले. 'फक्त त्या माणसाने मिशा उडवल्या आहेत.' असे तो म्हणाला. इस्टेटीवर जन्मलेला प्रामाणिक ट्रेडवेल!

गावठी माणसाने अपमान केल्याने पायरो थोडा हसला. ''तू घरातीलच एकजण असलास, तरी अपहरणाला मदत केल्याबद्दल तुझा तुलाच संशय आहे.''

''हो, पण ट्रेडवेल नाही.''

पायरोने अचानक तिच्याकडे वळून विचारले, “आणि बाईसाहेब, आपण?”

“ज्याने या भटक्याला पत्र आणि गाठोडे दिले, तो ट्रेडवेल असणे शक्य नाही --- कदाचित इतर कुणीही असेल. तो म्हणतो, त्याला ते दहा वाजता दिले गेले. दहा वाजता ट्रेडवेल तर माझ्या नवऱ्याबरोबर सिगरेट ओढायच्या खोलीत होता.”

“मिस्टर, तुम्हाला मोटारीतील माणसाचा चेहरा बघणे, शक्य झाले का? तो थोडा तरी ट्रेडवेलसारखा होता का?”

“मला तो बघण्यासाठी फारच लांब होता.”

“ट्रेडवेलला कुणी भाऊ असल्याचे तुम्हाला माहिती आहे का?”

“त्याला खूप भाऊ होते पण ते मेले. शेवटचा लढाईत मारला गेला.”

“मी अजून वॅव्हर्ली यांच्या घराशी परिचित नाही. मोटार दक्षिण लॉजकडे चालली होती. इथे दुसरे प्रवेशद्वार आहे का?”

“हो, त्याला आम्ही पूर्व लॉज म्हणतो. घराच्या दुसऱ्या बाजूने ते दिसते.”

मला हे विचित्र वाटले, की तिथे मोटार शिरतांना कुणीच पाहिले नाही.”

तिथे लहान चर्चकडे जाणारी अजून एक वाट आहे. तिथून बऱ्याच मोटारी जातात. त्या माणसाने सोयीस्कर जागी मोटार थांबवली असणार आणि तो घरात धावत गेला असणार. दुसरीकडे लक्ष वेधून, त्याने तसे केले असणार.''

पायरो विचारपूर्वक बोलला, ''तो आधीपासूनच घरात असल्याशिवाय, हे कसे काय शक्य आहे? त्याला लपायला दुसरी कुठली जागा आहे का?''

''खरे तर आम्ही आधी घरभर नीट पाहिले नाही. तशी गरज वाटली नाही. मला वाटते तो घरातच कुठेतरी लपून बसला असावा. पण त्याला घरात घेतले कुणी?''

''त्याकडे आपण नंतर येऊ. एका वेळी एकच गोष्ट --- आपण योग्य पद्धतीने जाऊ. घरात अशी कुठली विशेष अशी लपण्याची जागा नाही का? वॅव्हर्लींचे घर जुने आहे. त्यात कधीकधी भगदाडे असतात.''

''हो. हो. एक भगदाड आहे. ते हॉलच्या एका भिंतीपासून सुरु होते.''

''परिषद खोलीजवळ का?''

''त्याच्या दाराबाहेर पण दाराला लागून.''

''वा! वा!''

“पण मी व माझी बायको सोडून, कुणालाच ते माहिती नाही.”

“ट्रेडवेल?

“कदाचित त्याने त्याबद्दल ऐकले असेल.”

“मिस कॉलिन्स?”

“मी तर तिच्याजवळ हे कधीच बोललो नाही.”

पायरोने क्षणभर विचार केला.

“मिस्टर, ठीक आहे. पुढची गोष्ट म्हणजे वॅव्हर्लींचे घर! मी तिथे आज दुपारी आलो तर ठीक राहिल का?”

मिसेस वॅव्हर्लीं ओरडली, “ओहो, मिस्टर पायरो, तुम्ही लवकरात लवकर या.”

ज्यामुळे ती घाईघाईने पायरोकडे गेली, ते तिच्या शत्रूकडून सकाळी आलेले वजनदार गाठोडे तिने त्याच्या हातात दिले. त्यात पैसे भरण्यासंबंधी हुशारीने स्पष्ट सूचना दिलेल्या होत्या व शेवटी अशी धमकी दिली होती की तसे न केल्यास, मुलाच्या जीवाला धोका आहे. हे स्पष्ट होते की मिसेस वॅव्हर्लींचे अपत्यप्रेम व पैशांची लालसा यांचे जणू युद्ध जुंपले होते. ते प्रेम दिवस वर येत होता, तसे वाढत होते.

पायरोने मिसेस वॅव्हलींला तिच्या नवऱ्याच्या मागे उभे करून विचारले,

“बाईसाहेब, शक्य असेल तर खरे सांगा. तुम्ही तुमच्या नवऱ्याच्या बरोबरीने स्वयंपाकी ट्रेडवेलवर विश्वास ठेवता का?”

“माझे त्याच्याविरुद्ध असे काही मत नाही. पण त्याचा या प्रकरणाशी काही संबंध असल्याचे मला दिसत नाही. पण ठीक आहे. पण मला तो कधीच आवडत नव्हता --- कधीच नाही.”

“अजून एक गोष्ट. तुम्ही मला मुलाच्या दाईचा पत्ता देऊ शकाल का?”

“१४९, नेथेराल रस्ता, हॅमरस्मिथ. तुम्ही अशी कल्पना करू नका --- “

“मी कधीच कल्पना करत नाही --- मी मेंदूच्या करड्या पेशींना कामाला लावतो. कधीकधी, फक्त कधीकधी मी थोडीफार कल्पना करतो.”

दार लागल्यावर पायरो परत माझ्याकडे आला. “हेस्टींग्ज म्हणजे बाईसाहेबांना स्वयंपाकी कधीच आवडला नाही. हे रुचीपूर्ण आहे. नाही का?”

मी होकार दिला नाही. पायरोने मला नेहमी फसवले आहे. त्यामुळे, मी आता काळजी घेतो. नेहमी काहीतरी गोम असते.

बाहेर आमचे आन्हिक उरकल्यावर आम्ही नेथेराल रस्त्याकडे निघालो. आमचे नशीब जोरावर असल्याने, आम्हाला मिस जेसी विदर्स घरी भेटली. ती पस्तिशीची, आल्हादक चेहरा असलेली चाणाक्ष स्त्री होती. ती या प्रकरणात गुंतलेली असेल, यावर माझा विश्वास बसत नव्हता. तिला काढून टाकल्याबद्दल तिच्या मनात कटूपणाची व पश्चात्तापाची भावना होती. मात्र तिचे चुकले, हे तिने कबूल केले. एका शेजारीच रंगारी काम व सुशोभन काम करणाऱ्याशी तिचे लग्न ठरले होते. त्याला भेटण्यासाठी ती पळून गेली होती. हे तिचे वागणे साहजिक होते. मला पायरोचे काही कळत नव्हते. त्याचे सगळे प्रश्न मला चुकीचे वाटत होते. ते प्रश्न तिच्या वॅव्हर्ली घरातील रोजच्या कामासंबधी होते. मला खरे तर कंटाळा आला होता. त्यामुळे पायरो गेल्यावर मला आनंद झाला.

हॅमरस्मिथ रस्त्यावर वॉटरलूला जाणारी टॅक्सी करून, त्यात बसत तो म्हणाला, "माझ्या मित्रा, मुलाचे अपहरण ही सोपी गोष्ट आहे. त्या मुलाला गेल्या तीन वर्षातील कुठल्याही दिवशी पळवून नेणे सोपे होते."

मी थंडपणे उत्तरलो, "याचा आपल्याला तपासकामात काही उपयोग होईल, असे मला वाटत नाही."

“विरोधाभासात्मक रीत्या, ते आपल्यावर जोराने चालून येते आहे.  हेस्टींग्ज, जर तुला टायपिन लावायचीच असेल, तर निदान ती टायच्या मध्यभागी हवी. आता ती निदान इंचाच्या एक सोळांश भाग उजवीकडे सरकलेली आहे.”

वॅव्हर्लींचे घर ही एक मोठी जुनी जागा होती. अलीकडेच ती मोठ्या निगुतीने व कलात्मकतेने दुरुस्त केले गेली होती. मिस्टर वॅव्हर्लींनी आम्हाला परिषद खोली दाखवली. गच्ची आणि घराचे विविध भाग जोडलेले होते. शेवटी पायरोने विनंती केल्यामुळे, त्याने भिंतीतील कळ दाबली. भिंत बाजूला सरकून, आम्ही एका बोळकांडीतून भगदाडाशी आलो.

मिस्टर वॅव्हर्लीं म्हणाले, “बघा, इथे काही नाही.”

ती छोटीशी खोली पूर्णपणे रिकामी होती. जमिनीवर काहीही पाऊलखुणा नव्हत्या. कोपऱ्यातील एका खुणेजवळ पायरो वाकला होता, तिथे मी गेलो.

“माझ्या मित्रा, तू याचे काय करशील?”

तिथे चार खुणा एकत्र होत्या.

मी ओरडलो, “कुत्रा.”

“हेस्टींग्ज, अगदी लहान कुत्रा.”

“पॉमेरियन.”

“त्याहूनही लहान.”

मी संशयाने बोललो, “बहुधा ग्रिफॉन.”

“ग्रिफॉनपेक्षाही लहान. कुत्र्यांच्या क्लबला माहिती नसलेली जात.”

मी त्याच्याकडे बघितले. त्याचा चेहरा उद्दीपित होऊन उजळला होता व त्यावर समाधान पसरले होते.

तो पुटपुटला, “माझे बरोबर होते. मला माहिती होते, की माझे बरोबर आहे. हेस्टींग्ज, इकडे ये.”

आम्ही हॉलमध्ये आल्यावर, आमच्या मागे त्या भगदाडाचा मार्ग बंद झाला. पॅसेजच्या पलीकडील पुढील दारातून एक तरुण स्त्री आली. मिस्टर वॅव्हर्लींनी आमची तिच्याशी ओळख करून दिली.

“मिस कॉलिन्स”

“मिस कॉलिन्स साधारण तिशीची असून, चटपटीत होती. तिचे केस फिके पण चांगले होते. तिने नाकावर क्लिप असलेला चष्मा घातला होता.

पायरोने केलेल्या विनंतीला अनुसरून, आम्ही एका लहानशा सकाळच्या खोलीत गेलो. तिथे त्याने तिला नोकरांविषयी व

विशेषतः ट्रेडवेलविषयी प्रश्न विचारले. तिने कबूल केले की तिला तो स्वयंपाकी आवडत नव्हता.

तिने स्पष्टीकरण दिले, “तो फार हवेत असायचा.”

मग २८ तारखेच्या रात्री मिसेस वॅव्हर्लींनी खाल्लेल्या खाण्याकडे ते आले. मिस कॉलिन्स म्हणाली की तिने तेच खाणे वरती तिच्या खोलीत नेऊन खाल्ले. त्याचे काही दुष्परिणाम जाणवले नाहीत. ती निघाल्यावर, मी पायरोला कोपराने ढोसले.

मी कुजबुजलो, “कुत्रा.”

तो जिवणी फाकवत बोलला, “हो. हो. कुत्रा. मिस, इथे कुत्रा होता का?”

“बाहेर कुत्राघरात दोन लॅब्रॅडोर आहेत.”

“नाही. मला लहान कुत्रा असे म्हणायचे आहे. किंवा खेळण्यातला कुत्रा.”

“नाही. तसा कोणी नाही.”

पायरोने तिला जाण्याची परवानगी दिली. नंतर घंटी वाजवून, तो मला म्हणाला, “ती खोटे बोलते आहे. मिस कॉलिन्स. मी तिच्या जागी असतो तरी खोटे बोललो असतो. आता स्वयंपाकी.”

ट्रेडवेल हा खानदानी माणूस होता. त्याने त्याची गोष्ट पूर्ण आत्मविश्वासाने सांगितली आणि ती मिसेस वॅव्हर्लींनी सांगितली, तशीच होती. त्याने सांगितले की त्याला त्या भगदाडाचे गुपित माहिती आहे. खरेखुरे सत्य सांगून शेवटी जेव्हा तो गेला, तेव्हा मी पायरोचे गोंधळलेले डोळे पाहिले.

"हेस्टींग्ज, या सर्वावरून तू काय निष्कर्ष काढशील?"

मी प्रत्युत्तर केले, "तू काय काढशील?"

"तू किती सावधान होतोस. मेंदूतील करड्या पेशी त्याना उत्तेजन दिल्याशिवाय कार्यप्रवण होत नाहीत. अरेच्च्या, पण मी तुला चिडवत नाही. आपण दोघे एकदम निष्कर्ष काढू. कुठले मुद्दे आपल्याला कठीण वाटले?"

मी म्हणालो, "मला एकच गोष्ट धक्कादायक वाटते आहे. अपहरण करणारा माणूस त्याला कुणी बघणार नाही, असे पूर्वेकडील लॉज सोडून, दक्षिणेकडील लॉजला का गेला?"

"हेस्टींग्ज, हा खूप चांगला मुद्दा तू उपस्थित केला आहेस. मी त्याची दुसऱ्या एका गोष्टीबरोबरे सांगड घालतो. त्याने वॅव्हर्लींना आधीच सावध का केले? नुसते मुलाला पळवून नेऊन, मग पैशांची मागणी का केली नाही?"

“कारण त्यांना असे वाटत होते, की मुलाचे अपहरण करण्याची कृती न करता पैसे मिळतील.”

“नुसतीच धमकी देऊन सहजपणे पैसे मिळणे शक्य नव्हते.”

शिवाय त्यांना बाराच्या वेळेवर लक्ष केंद्रित करायचे होते. म्हणजे जेव्हा भटक्या माणसाला पकडले जाईल, तेव्हा इतरजणांना त्यांच्या लपायच्या जागेमधून बाहेर पडून कुणाला न दिसता मुलापासून दूर जाता येईल.”

पण सोपी गोष्ट ते कठीण करत होते, हे तर नाकारता येत नाही. जर त्यांनी वेळ किंवा दिवस सांगितला नसता, तर ते जास्त सोपे झाले असते. मुलगा जेव्हा त्याच्या दाईबरोबर बाहेर असतो, तेव्हा त्याला मोटारीतून पळवून नेणे सोपे होते.”

“मी संशय घेत कबूल केले. “हं –-- ओ --- हो.”

“खरे तर हा बनाव मुद्दामून घडवून आणला गेला. आता आपण या मुद्द्याकडे दुसऱ्या दृष्टीकोनातून पाहू. सर्व बाबींवरून असे दिसते, की गुन्हेगार घरातीलच होता. मुद्दा नंबर एक, मिसेस वॅव्हर्लींना झालेली विषबाधा. मुद्दा नंबर दोन, उशीला टोचलेले पत्र. मुद्दा नंबर तीन, घड्याळाची वेळ दहा मिनिटे बदलणे. या सगळ्या गोष्टी घरातच घडल्या आहेत. आणि अजून एक बहुधा

तुझ्या लक्षात न आलेली बाब म्हणजे, भगदाडात धूळ नव्हती. ती झाडून काढलेली होती.”

आता घरात चार माणसे होती. आपण दाईला वगळू, कारण तिने भगदाड झाडले नसेल. पण इतर तीन मुद्दे तिच्या बाबतीत उपस्थित होतात. चार लोक म्हणजे मिस्टर आणि मिसेस वॅव्हर्ली, स्वयंपाकी ट्रेडवेल आणि मिस कॉलिन्स. आपण प्रथम मिस कॉलिन्सचा विचार करू. आपल्याकडे तिच्याविरुद्ध फारसे काही नाही. कारण आपल्याला तिच्याविषयी फार थोडेच माहिती आहे, की ती अर्थातच एक बुद्धिमान तरुण स्त्री आहे व ती इथे गेले एक वर्षच आहे.”

त्याला आठवण करत मी म्हटले, “तू म्हणालास की कुत्र्याचा बाबतीत ती खोटे बोलली.

पायरोने विशिष्ट हास्य दाखवत म्हटले, “अरे, हो. कुत्रा. आता आपण ट्रेडवेलकडे वळू. त्याच्याविरुद्ध अनेक संशयास्पद गोष्टी आहेत. त्यातील एक गोष्ट म्हणजे भटक्याने सांगितले, की त्याला गावात गाठोडे देणारा ट्रेडवेल होता.”

“पण ट्रेडवेल त्याविरुद्ध पुरावा देऊ शकतो.”

“तरीही, त्याने मिसेस वॅव्हर्लीला विष दिले असावे. उशीला चिठ्ठी टाचली असावी. घड्याळात दहा मिनिटे फरक करून ठेवला

असावा आणि भगदाड झाडले असावे, असे धरले तरी याविरुद्ध, तो या वॅव्हर्लींच्या घरात जन्मला व पोसला गेला. त्यामुळे हे पूर्णपणे अशक्य वाटते, की त्याने या घरच्या मुलाचे अपहरण होण्यास मदत केली असेल. असे चित्र दिसत नाही!

“ठीक आहे, मग?”

“कितीही विचित्र दिसले तरी, आपल्याला तर्कशास्त्रानुसार जायला हवे. मिसेस वॅव्हर्लीबद्दल थोडा विचार करू. पण ती श्रीमंत आहे. तिच्याकडे पैसा आहे. तिच्या पैशांमुळे हे ढासळणारे घर दिमाखात उभे आहे. तिला स्वतःच्या मुलाचे अपहरण करण्याचे, व स्वतःचे पैसे स्वतःलाच पाठवायचे काही कारण नाही. नवरा मात्र वेगळ्या परिस्थितीत आहे. त्याची बायको श्रीमंत आहे. हे तो श्रीमंत असल्यासारखे नाही, तर वेगळे आहे. माझ्याकडे एक निराळी कल्पना आहे. त्या बाईला फक्त एक चांगले कारण सोडून, तिच्या पैशांपासून फारकत घ्यायची नाही. पण तुमच्या लगेच लक्षात येईल, की मिस्टर वॅव्हर्ली, चैनीची चटक असलेला आहे.”

मी मोठ्या आवाजात ओरडलो, “अशक्य.”

“मुळीच नाही. नोकरांना कुणी हाकलून दिले? मिस्टर वॅव्हर्लीने. तो चिठ्ठ्या लिहू शकतो, बायकोला विष देऊ शकतो. घड्याळाचे काटे फिरवू शकतो आणि विश्वासू ट्रेडवेलविरुद्ध

भक्कम पुरावा उभा करू शकतो. ट्रेडवेलला मिसेस वॅव्हर्ली कधीच आवडत नसते. तो त्याच्या मालकाशी प्रामाणिक आहे व त्याच्या आज्ञा पाळायला एका पायावर तयार असतो. त्यात तीनजण आहेत. मिस्टर वॅव्हर्ली, त्याचे काही मित्र आणि ट्रेडवेल. पोलीसांनी हीच चूक केली. त्यांनी करडी मोटार चालवणाऱ्याची पुढे चौकशी केलीच नाही. तो तिसरा मनुष्य होता. त्याने जवळपासच्या गावातील एक सोनेरी कुरळ्या केसांचे मूल पळवले. तो पूर्वेच्या लॉजकडे निघाला आणि दक्षिणेच्या लॉजवरून हात हलवत व किंचाळत, योग्य वेळी कूच केले. त्यांना मोटारीचा नंबर किंवा त्याचा चेहरा दिसला नाही. अर्थात मुलाचा चेहराही दिसला नाही. मग त्याने तो लंडनला जात असल्याचे भासवले. मध्यंतरीच्या काळात, ट्रेडवेलने त्याचे काम --- गाठोडे व चिठ्ठी एका रांगड्या माणसाकडे सुपूर्द करण्याचे काम --- चोख बजावले. खोट्या मिशा लावल्याने त्या रांगड्या माणसाला ट्रेडवेलला नंतर ओळखणे शक्य नव्हते. अशा तऱ्हेने मालकाने ट्रेडवेलविरुद्धचा पुरावा नष्ट करण्याचे काम केले. बाहेर गोंधळ गडबड सुरु झाल्यावर व इन्स्पेक्टर बाहेर धावल्यावर, मिस्टर वॅव्हर्लींने लगेच जॉनीला भगदाडात लपवले. नंतर दिवसा केव्हातरी इन्स्पेक्टर व मिस कॉलिन्स गेल्यावर, संधी साधून बाहेर

काढले. आता मुलाला स्वतःच्या मोटारीने एखाद्या सुरक्षित जागी नेऊन ठेवणे सोपे होते.”

मी विचारले, “पण कुत्र्याचे काय? आणि मिस कॉलिन्सच्या खोटारडेपणाचे काय?”

तो माझा लहानसा विनोद होता. मी तिला विचारले की घरात काही कुत्र्यासारखी खेळणी होती का आणि ती नाही म्हणाली --- पण नक्कीच तशी खेळणी मुलाच्या खोलीत असणार. असे बघ, मिस्टर वॅव्हर्लीने काही खेळणी जॉनीचे मन रिझवण्यासाठी भगदाडात ठेवली असणार.”

मिस्टर वॅव्हर्ली खोलीत शिरत म्हणाले, “मिस्टर पायरो, तुम्हाला काही सापडले का? मुलाला कुठे नेण्यात आले याचा काही पुरावा तुम्हाला मिळाला का?”

पायरोने त्याना एक कागदाचा तुकडा दिला. “हा बघा पत्ता.”

“पण हा तर कोरा कागद आहे.”

“कारण तुम्ही त्यावर तो पत्ता लिहिण्यासाठी मी थांबलो आहे.”

“काय?” मिस्टर वॅव्हर्लीचा चेहरा काळा ठिक्कर पडला.

“मिस्टर, मला सगळे माहिती आहे. मी तुम्हाला मुलगा परत करण्यासाठी चोवीस तासांची मुदत देतो. तुमची चाणाक्ष लबाडी,

त्याला परत आणण्याने सिद्ध होईल. नाहीतर मिसेस वॅव्हर्लीला सर्व घटनाक्रम सांगितला जाईल.”

मिस्टर वॅव्हर्ली मट्कन खुर्चीत बसले आणि चेहरा हातात लपवला. “तो त्याच्या जुन्या दाईबरोबर, दहा मैल दूर आहे. तो आनंदी असून, त्याची चांगली काळजी घेतली जात आहे.”

“मला त्याबद्दल काही शंका नाही.  जर मी तुम्हाला प्रेमळ पिता समजत नसतो, तर मी तुम्हाला ही संधी दिली नसती.”

“हे प्रकरण --- “

“तेच तर. तुमचे नाव इथे जुन्या आदराने घेतले जाते. ते परत घालवून बसू नका. शुभ संध्याकाळ, मिस्टर वॅव्हर्ली. अरे हो, एक उपदेशपर शब्द. नेहमी कोपरे स्वच्छ ठेवा!”

# THE PLYMOUTH EXPRESS
# प्लायमाऊथ एक्सप्रेस




## एक

अलेक सिम्पसन न्यूटॉन ॲबॉट स्टेशनच्या फलाटावरून, प्लायमाऊथ एक्सप्रेसच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात शिरला. एक हमाल त्याच्या मागून मोठी बॅग घेऊन आला. तो ती वरील फळीवर ठेवणार होता. पण त्या तरुण खलाशाने त्याला थांबवले.

“थांब. ती बसायच्या जागीच ठेव. मी ती नंतर वर टाकेन. इकडे ये.”

हमालाला उदारपणे पैसे मिळाल्याने तो बोलला, “सर, आभारी आहे.” व गेला.

दारे बंद झाली एक मोठा शक्तिवान आवाज ओरडलाः “फक्त प्लायमाऊथसाठी, टॉरक्वेला बदला. पुढचा थांबा प्लायमाऊथ आहे.” मग शिट्टी वाजली आणि हळूहळू गाडी स्टेशनबाहेर पडली.

लेफ्टनंट सिम्पसनचा पूर्ण डबा होता. डिसेंबरची हवा गार होती. त्याने खिडकी उघडली. मग तो जोरात शिंकरला व नापसंती दर्शवत, भुवया उंचावल्या. तिथे कसला वास येत होता!

त्या वासाने त्याला त्याचे पायाचे ऑपरेशन झाले होते, तेथील दवाखान्यातील वासाची आठवण झाली. हो, तो क्लोरोफॉर्मचा वास होता.

त्याने परत खिडकी लावून टाकली. त्याची बसायची जागा बदलून इंजिनकडे पाठ केलेली घेतली. त्याने खिशातून पाईप काढून तो पेटवला.

थोडा वेळ तो नुसताच बसला. बाहेर रात्रीकडे बघत, सिगरेट ओढत बसला.

शेवटी उठला व बॅग उघडून काही कागद व मासिके बाहेर काढली. बॅग परत लावली आणि बसायच्या विरुद्ध जागेखाली ती

ढकलण्याचा प्रयत्न केला --- पण तो असफल झाला. तिथे असलेल्या काही वस्तूमुळे ते अशक्य झाले. तो अधीरपणे जोर करू लागला. पण तरीही ती आत जाईना.

तो पुटपुटला, “ही आत का जात नाही?” त्याने ती पूर्ण बाहेर काढली व गुडघ्यांवर बसून त्या जागेखाली वाकून बघितले ---

क्षणभराने रात्रीच्या अंधारात एक किंकाळी उमटली. साखळी ओढली गेल्याचे महत्व जाणून, गाडी तिच्या इच्छेविरुद्ध थांबली.

## दोन

पायरो म्हणाला, ‘अरे मित्रा, मला माहिती आहे, तुला प्लायमाऊथ एक्सप्रेसच्या गूढ प्रकरणात खूप रस आहे. मग हे वाच.”

टेबलावरून त्याच्या हातात तो फडकवत असलेला कागद मी घेतला. तो लहानसा व मुद्देसूद होता.

प्रिय सर,

तुमच्या सोयीप्रमाणे तुम्ही मला लवकरात लवकर येऊन भेटलात, तर मी उपकृत होईन.

तुमचा विश्वासू,

एबेन्झर हॅलीडे

दोन्हीचा काय संबंध आहे, हे माझ्या लक्षात न येऊन, मी प्रश्नार्थकतेने पायरोकडे बघितले.

उत्तरासाठी त्याने वर्तमानपत्र हातात घेतले व मोठ्याने वाचू लागला,

"काल रात्री एक लोकांची उत्सुकता वाढवणारा जबरदस्त शोध लागला. एक तरुण नौसेनेतील ऑफिसर प्लायमाऊथला परततांना त्याच्या डब्यातील बसायच्या जागेखाली एका बाईचे हृदयात भोसकलेले प्रेत सापडले. ऑफिसरने ताबडतोब साखळी ओढून, गाडी थांबवली. साधारण तिशीच्या, महाग कपडे घातलेल्या त्या बाईची अजून ओळख पटलेली नाही."

नंतरच्या वर्तमानपत्रात असे होतेः

'प्लायमाऊथ एक्सप्रेसच्या डब्यात मृतावस्थेत सापडलेल्या बाईची ओळख पटली असून, ती माननीय मिसेस रुपर्ट कॅरिंग्टन होती.'

"माझ्या मित्रा, असे बघ. तुला कळले नसेल, तर मीच सांगतो, मिसेस रुपर्ट कॅरिंग्टन म्हणजे पूर्वाश्रमीची फ्लॉसी हॅलीडे आहे. तिचे वडील अमेरिकन स्टीलचा राजा होते."

"आणि त्यांनी तुला चिठ्ठी पाठवली आहे? मस्त!"

पैसे मिळणाऱ्या रोख्यांच्या प्रकरणात --- मी मागे त्याचे लहानसे काम केले होते. एकदा मी राजघराण्यातील भेटीसाठी

पॅरीसला होतो, तेव्हा माझी फ्लॉसी बाईसाहेबांशी ओळख झाली होती. ती छोटीशी, सुंदर पाहुणी होती. पण त्यामुळे तिला त्रास झाला. तिने एक वाईट प्रकरण केले."

"कसे काय?"

"उमराव डी ला रोचेफोर हा एक साधा पण साहसी असा वाईट माणूस होता. अद्भुतरम्य तरुण मुलींना कशी भुरळ पाडायची, हे त्याला चांगले ठाऊक होते. नशीबाने तिच्या वडिलांना याचा सुगावा लवकरच लागला. त्यांनी घाईने तिला परत अमेरिकेत आणले. नंतर काही वर्षांनी मी तिच्या लग्नाबद्दल ऐकले, पण तिच्या नवऱ्याबद्दल मला काही माहिती नव्हते.

मी बोललो, "हं, माननीय मिस्टर रुपर्ट कॅरिंग्टन, काही झाले तरी देखणा नाही. त्याने घोड्यांवर वाट्टेल तसे पैसे उधळले. वयस्क हॅलीडेचे पैसे त्याच्या मुलीने नवऱ्यावर उधळून, शेवटच्या क्षणी कसे संपत आणले, याची मी कल्पना करू शकतो. दिसायला, वागायला चांगला असलेल्या, पण अनीतिमान तरुण लबाड माणसाला बायको मिळवणे कठीण होते, असे मी म्हणू शकतो."

"बिचारी तरुण स्त्री! सुंदर व घर असलेली ती, किती नशीबवान होती!

"मला वाटते, की ती नव्हे, तर तिचे पैसे त्याला भुरळ पाडत होते. बहुतेक ते दोघे लगेचच वहावत गेले. मी अलीकडे अशा

अफवा ऐकल्या, की आता दोघे कायदेशीर रीत्या विभक्त होत आहेत.”

“वयस्क हॅलीडे काही मूर्ख नव्हता. त्याने तिचे सर्व पैसे मोकळे सोडलेले नव्हते.”

“काही झाले तरी मी असे म्हणायचे धाडस करू शकतो, की माननीय रुपर्ट चांगलाच अडचणीत आला होता.”

“ओहो, मला नवल वाटते.”

“तुला कसले नवल वाटते?”

“अरे माझ्या चांगल्या मित्रा, असा रागाऊ नकोस. मला दिसते आहे, की तुला या प्रकरणात रस निर्माण झाला आहे. मला वाटते, तू माझ्या बरोबर मिस्टर हॅलीडेला भेटायला येशील. कोपऱ्यावर टॅक्सीस्टँड आहे.”

## तीन

काही मिनिटात आम्ही पार्क गल्लीतील एका अमेरिकन श्रीमंत व प्रसिद्ध उद्योजकाच्या छान घरापुढे आलो. आम्हाला वाचनालयात बसवण्यात आले. आणि लगेचच एका भेदक डोळ्यांच्या, आक्रमक हनुवटी असलेल्या, बळकट मोठ्या माणसाचे आगमन झाले.

मिस्टर हॅलीडे बोलले, “मिस्टर पायरो? मला वाटते, मी तुम्हाला कशाला बोलावले असेल, ते सांगायची गरज नाही. तुम्ही वर्तमानपत्रे वाचली असतील. मी गोष्टी करण्यासाठी वेळ घेणारा नाही. मला तुम्ही लंडनमध्ये असल्याचे समजले आणि तुम्ही बॉम्बसंबंधी केलेले चांगले काम मला आठवले. मी कधीच एखादे नाव विसरत नाही. मी स्कॉटलंड यार्डला कळवले आहेच. पण माझा स्वतःचा एक माणूस पण यात असेल. पैशांचा काही प्रश्न नाही. माझ्या लहानशा मुलीसाठीच मी एवढे डॉलर कमावले होते. पण आता ती गेली. हे करणाऱ्या त्या लबाड माणसाला पकडण्यासाठी माझ्याकडे शेवटचा सेंट असेपर्यंत मी प्रयत्न करेन. समजले? तेव्हा आता तुम्ही कसे काम करता, एवढाच प्रश्न आहे.”

पायरो झुकून बोलला, “महाशय, मी हे काम अंगावर घेतो. मी तुमच्या मुलीला अनेक वेळा पॅरीसमध्ये पाहिले आहे. आता मी तुम्हाला अशी विनंती करतो की तुम्ही तिचा प्लायमाऊथपर्यंतचा प्रवास व या केसमधील तुम्हाला महत्वाच्या वाटणाऱ्या बाबी मला सांगाव्यात,.”

मिस्टर हॅलीडे सांगू लागले, “ठीक आहे. सुरवातीला ती प्लायमाऊथला जाणार नव्हती. ती ॲव्होनमिड येथील स्वान्सीच्या राणीसाहेबांकडे त्यांच्या घरच्या मेजवानीला जाणार होती. तिने बारा वाजून चौदा मिनिटांनी पॅडीग्टन सोडले व ब्रिस्टॉलला [तिथे तिला गाडी बदलायची होती.] ती दोन वाजून पन्नास मिनिटांनी

पोचली. मुख्य प्लायमाऊथ एक्सप्रेस अर्थात वेस्टबरीहून सुटते व ब्रिस्टॉलला जातच नाही. बारा वाजून चौदा मिनिटाची गाडी ब्रिस्टॉलला न थांबता जाते. नंतर ती वेस्टॉनला, टाउनटनला, एक्सेटरला व न्यूटॉन ॲबॉटला थांबते. माझ्या मुलीचा ब्रिस्टॉलपर्यंतचा स्वतंत्र वेगळा डबा होता. पुढच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात तिची नोकराणी होती.''

पायरोने मान डोलावली. मिस्टर हॅलीडे पुढे सांगू लागले, ''ॲव्होनमिड येथील मेजवानी फार मजेची होणार होती. खूप नाच असल्यामुळे माझ्या मुलीजवळ तिचे सर्व महागाईचे रत्नांचे दागिने होते. त्यांची किंमत कदाचित शंभर हजार डॉलर भरली असती.''

पायरो मध्येच विचारता झाला, ''एक मिनिट, दागिने कोणाकडे होते? तुमच्या मुलीकडे की नोकराणीकडे?''

''माझी मुलगी नेहमीच ते उच्च प्रतीच्या चामड्याच्या पेटीत, तिच्याजवळ ठेवते.''

''महाशय, चालू ठेवा.''

''ब्रिस्टॉलला जेन मेसन नावाची ती नोकराणी फ्लॉसीच्या डब्याच्या दाराशी आली व तिने तिच्या मालकिणीची कपड्यांची बॅग घेतली. नवल म्हणजे, माझ्या मुलीने तिला सांगितले, की ती ब्रिस्टॉलला उतरत नाही आहे, तर पुढे जाते आहे. तिने जेनला सामान उतरवून रेल्वेच्या कुलुपबंद खोलीत ठेवायला व चहा

घ्यायला सांगितले.. पण तिला नंतर दुपारी ब्रिस्टॉलला परतणाऱ्या तिच्या मालकीणीसाठी स्टेशनवर थांबायचे होते. आश्चर्यचकित झालेल्या जेनने तिला सांगितल्याप्रमाणे केले. तिने सामान योग्य ठिकाणी ठेऊन चहा घेतला. पण गाड्यांमागून गाड्या आल्या तरी, तिची मालकीण काही आली नाही. शेवटची गाडी आल्यावर, तिने सामान होते तिथेच ठेवले व ती रात्रीसाठी स्टेशनशेजारील एका हॉटेलमध्ये गेली. सकाळी तिने वर्तमानपत्रात दुःखद घटनेबद्दल वाचले व ती मिळेल त्या पहिल्या गाडीने ती घरी आली.''

''तुमच्या मुलीने अचानक बेत बदलायचे काही कारण समजले का?''

''हो. ते असे होते. जेनच्या म्हणण्याप्रमाणे, ब्रिस्टॉलला फ्लॉसी तिच्या डब्यात एकटी नव्हती. तिथे एक माणूस होता. तो पुढच्या खिडकीतून, बाहेर दूरवर बघत होता, जेणेकरून तिला त्याचा चेहरा दिसू नये.''

''गाडीला अर्थात पॅसेज होता ना?''

''हो.''

''पॅसेज कुठल्या बाजूला होता?''

''फलाटाच्या बाजूला. माझी मुलगी पॅसेजमध्ये उभी राहून जेनशी बोलत होती.''

तो उठला व तिरका झालेला शाईचा स्टँड सरळ करत व परत बसत  बोलला, “माफ करा. आणि तुमच्या मनात नक्कीच --- माफ करा. काहीही वाकडे दिसले की माझे डोके फिरते. हे विचित्र आहे, नाही का?” “तर मिस्टर, मी म्हणत होतो, की तुमच्या मनात असे असणार की या अचानक भेटीमुळे, तुमच्या मुलीचा बेत एकाएकी बदलला असणार, नाही का?”

“याहून दुसरे कुठले वेगळे कारण दिसत नाही.”

“हा माणूस कोण होता, याबद्दल तुम्हाला काही कल्पना आहे का?”

त्या लखपतीची क्षणभर चलबिचल झाली व मग तो म्हणाला, “मला काहीही माहिती नाही.”

“आता --- प्रेताच्या सापडण्याबद्दल काय?”

ते एका नौसेनेतील तरुण ऑफिसरला दिसले व त्याने ताबडतोब ते रेल्वेच्या अधिकाऱ्यांना कळवले. गाडीत एक डॉक्टर होता.

त्याने ते प्रेत तपासले. त्याने सांगितले, की तिला प्रथम क्लोरोफॉर्म दिला गेला व नंतर भोसकले गेले. तिला मृत होऊन चार तास झाले असावे असा अंदाज त्याने प्रगट केला. त्यामुळे हे ब्रिस्टॉल सोडण्याच्या फार आधी झाले नसावे --- बहुधा ब्रिस्टॉल व वेस्टॉन यामध्ये गाडी असताना झाले असावे.”

“आणि रत्नांची पेटी?”

“मिस्टर पायरो, रत्नांची पेटी नाहीशी झाली होती.”

“मिस्टर, अजून एक गोष्ट, तुमच्या मुलीच्या मरणानंतर  तिचे नशीब कुणाला फळफळवणार आहे?”

‘तिच्या लग्नानंतर लगेच फ्लॉसीने इच्छापत्र केले होते. त्यानुसार तिने सर्व काही तिच्या नवऱ्याला दिले होते.” तो मिनिटभर थोडा अडखळला व परत बोलू लागला, “मिस्टर पायरो, मी तुम्हाला हे देखील सांगू शकतो, की माझ्या उपदेशानुसार माझ्या मुलीला त्या संध्याकाळी त्या अनीतिमान लबाड नवऱ्यापासून कायदेशीर घटस्फोट मिळणार होता. --- त्यात काही अवघड नव्हते. मी तिच्या पैशांची अशी व्यवस्था लावली होती, की तो तिच्या आयुष्यभरात तिच्या पैशाला हात लावू शकला नसता. आधीच काही वर्षे ते वेगळे राहू लागले होते. त्याच्याशी भांडण करण्यापेक्षा, ती नेहमी त्याच्या पैशांच्या मागणीला मान देत आली होती.

पण मी हे थांबवायचे ठरवले होते. शेवटी यासाठी फ्लॉसीदेखील राजी झाली. माझ्या वकिलांना मी त्याप्रमाणे कारवाई करायला सांगितली.”

“मिस्टर कॅरिंगट्न कुठे आहेत?”

“शहरात. माझा विश्वास आहे की तो काल लांब गावाकडे गेलेला होता. पण काल रात्री परत आला.”

पायरोने थोडा वेळ विचार केला. मग तो म्हणाला, “मिस्टर, एवढी माहिती मला पुरेशी वाटते.”

“तुम्हाला नोकराणी जेन मेसनला भेटायचे आहे का?”

“हो. चालेल.”

हॅलीडेने घंटी वाजवली आणि तिला बोलवायला सांगितले.

काही मिनिटात सभ्य व कडक चेहरा असलेली जेन मेसन तिथे आली.

नुकत्याच घडलेल्या दुर्घटनेमुळे तिचा चेहरा एखाद्या चांगल्या नोकरासारखा भावनारहित झाला होता.

“तुम्ही मला काही प्रश्न विचारायची परवानगी द्याल? काल सकाळी निघण्यापूर्वी तुमच्या मालकीणबाई नेहमीसारख्या होत्या? खूप उद्दीपित झालेल्या किंवा त्रासलेल्या होत्या का?”

“ओहो, नाही, सर.”

“पण ब्रिस्टॉलला त्या खूप वेगळ्या वाटल्या का?”

“हो सर, पूर्णपणे नाराज वाटल्या --- इतक्या नाराज होत्या, की त्या काय बोलत आहेत, ते त्यांनादेखील कळत नव्हते.”

“त्या नक्की काय म्हणाल्या?”

“सर, मला आठवते आहे त्याप्रमाणे त्या म्हणाल्या, “जेन, मला माझा बेत बदलावा लागतो आहे. काहीतरी झाले आहे --- म्हणजे मी इथे उतरत नाही आहे. मला पुढे गेले पाहिजे. सामान बाहेर काढून ते रेल्वेच्या कुलुपबंद खोलीत ठेव. चहा घे व स्टेशनवर माझी वाट बघत थांब.”

“बाईसाहेब, वाट बघत इथे थांबू का?”

“हो. हो. स्टेशन सोडू नको. मी नंतरच्या गाडीने परत येते. कधी ते माहिती नाही. कदाचित खूप उशीर होईल.”

“ठीक आहे, बाईसाहेब, मी म्हटले. प्रश्न विचारायचा माझा स्वभाव नाही, पण मला ते विचित्र वाटले.”

“तुझ्या मालकीणबाई अशा वागत नसत का?”

“नाही सर, त्या फारच वेगळ्या वागत होत्या.”

“मग तुम्ही काय विचार केला?”

“सर, मला वाटले त्यांच्याबरोबर डब्यात असलेल्या गृहस्थाशी संबंधित असे हे काही असावे. त्या त्याच्याशी काही बोलत नव्हत्या, पण एकदोनदा त्याच्याकडे वळून त्या त्याला बहुतेक असे विचारत होत्या, की त्या करत आहेत ते ठीक आहे ना?”

“तुम्हाला त्या गृहस्थाचा चेहरा दिसत नव्हता का?”

“दिसत नव्हता. सर्व वेळ तो माझ्याकडे पाठ करून उभा होता.”

“तुम्ही त्याचे वर्णन करू शकाल का?”

“त्याने हलक्याशा तपकिरी रंगाचा मोठा कोट व प्रवासाची टोपी घातली  होती. तो उंच आणि बारीक होता. त्याचे मागील डोके काळेभोर होते.”

“तुम्हाला तो माहिती नव्हता?”

“नाही, सर.”

“तो मिस्टर कॅरिंगट्न नव्हता? नक्की?”

जेन थोडी बावरलेली वाटली.

‘नाही सर, मला असे वाटत नाही.”

“पण तुमची खात्री नाही?”

त्याची ठेवण माझ्या मालकांसारखी नव्हती. सर --- मला ते आहेत, असे कधीच वाटले नाही. मी त्यांना नेहमी बघितलेले आहे --- पण ते नव्हतेच, असेही मी म्हणू शकत नाही.”

पायरोने गालीच्यावरून एक पिन उचलून घेतली व भुवया उंचावून नापसंती दर्शवली. मग तो बोलला, “असे असेल का की ब्रिस्टॉलला तुम्ही तिच्या डब्याशी पोचण्यापूर्वी, तो तिथे हजर होता?”

जेन म्हणाली, “हो सर, असेच झाले. माझ्या डब्यात खूप गर्दी होती. त्यामुळे मला तिथून बाहेर पडायला वेळ लागला --- आणि नंतर फलाटावरदेखील खूप गर्दी होती. त्यामुळेही मला उशीर झाला. पण तसे पाहिले तर, तो माझ्या मालकीणबाईंशी एकदोन मिनिटेच बोलला असेल. मी असे गृहीत धरले, की तो पॅसेजमधून आला.”

पायरो बोलला, “जास्त करून ते शक्य वाटते.”

तो थांबला. तो अजूनही भुवया उंचावून नापसंती दर्शवत होता.

“सर, माझ्या मालकीणबाईंनी कसे कपडे घातले होते, सांगू का?”

“मी वर्तमानपत्रात वाचले आहे. पण तुम्ही सांगितलेत तर खात्री करता येईल.”

त्यांनी पांढरी कडा दुमडलेली टोपी, पांढऱ्यावर ठिपके असलेला रुमाल आणि निळा स्कर्ट व कोट घातला होता.”

“हं, जरा चमत्कारिकच दिसते आहे.”

मिस्टर हॅलीडेनी शेरा मारला, “इन्स्पेक्टर जापला आशा वाटते आहे, की त्यामुळे गुन्ह्याची जागा कळू शकेल. तिला ज्या कुणी बघितले असेल, ते तिला नक्कीच विसरणार नाहीत.”

“नक्कीच --- जेन, मी तुमचा आभारी आहे.”

ती नोकराणी निघून गेली.

पायरो उठून झटपट उभा रहात बोलला, “इथे जेवढे करणे शक्य होते, तेवढे मी केले आहे. मिस्टर, फक्त मी तुम्हाला सांगतो, की तुम्ही काही हातचे राखून न ठेवता सर्व काही सांगा. सर्व काही.”

“मी ते केले आहे.”

“तुमची खात्री आहे?”

“अगदी पूर्णपणे.”

“तर मग अजून बोलण्यासारखे काही राहिले नाही. मग केस संपलीच म्हणायचे.”

“का?”

“कारण तुम्ही माझ्याशी मोकळेपणे बोलला नाहीत.

“मी तुम्हाला खात्री देतो ---"

“नाही. तुम्ही काहीतरी लपवून ठेवत आहात.”

तिथे एक क्षण शांतता पसरली. नंतर मिस्टर हॅलीडेनी खिशातून एक कागद काढला व तो माझ्या मित्राकडे दिला.

‘मला वाटते मिस्टर पायरो, तुम्हाला हा हवा होता --- तरी पण तुम्हाला तो कसा काय माहिती? हे मला राग आणते आहे.”

पायरो हसला व कागद गुंडाळला. ते तिरप्या, बारीक अक्षरात लिहिलेले पत्र होते. पायरोने ते मोठ्याने वाचले.

*प्रिय बाईसाहेब,*

*तुझ्या मोठ्या मित्रत्वाने लिहिलेल्या उत्तरानंतर, मी मोठ्या आनंदाने परत होणाऱ्या आपल्या भेटीकडे डोळे लावून बसलो आहे. मी अगदी अधीर झालो आहे. मी पॅरीसमधील ते दिवस कधीच विसरलो नाही. तू उद्या लंडन सोडते आहेस, हे फार दुष्टपणाचे आहे. तरीही काही काळानेच, बहुधा तुला वाटते त्यापेक्षा लवकरच, माझ्या हृदयात सतत स्थान मिळवलेल्या तुला मिठीत घेण्याचे भाग्य मला लाभेल.*

*प्रिय फ्लॉसी, माझ्या तुजप्रती असलेल्या आश्वासक व एकनिष्ठ भावनांसकट ---*

*आर्मांड डी ला रोचेफोर*

पायरोने भुवई उंचावत, ते पत्र हॅलीडेला परत दिले.

“मिस्टर, मला वाटते, की तुमच्या मुलीला डी ला रोचेफोरशी ओळख वाढवायची इच्छा होती, हे तुम्हाला माहिती नाही, नाही का?”

“हे वादळासारखे माझ्यावर येऊन आदळते आहे. हे पत्र मला माझ्या मुलीच्या हातातील बॅगेत आढळले. मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती असेल की हा तथाकथित माणूस वाईट रीत्या साहसी म्हणून ओळखला जातो.”

पायरोने मान हलवली.

“पण मला जाणून घ्यायचे आहे, की या पत्राचा सुगावा तुम्हाला कसा लागला?”

माझा मित्र हसला. “मिस्टर, मला नाही लागला. पण एखाद्या गुप्तचरासाठी पाउलखुणा व सिगरेटची राख हे माग काढण्यासाठी पुरेसे नसतात. तो चांगला मानसशास्त्रज्ञही असावा लागतो. तुम्हाला तुमचा जावई आवडत नाही व तुमचा त्याच्यावर विश्वास नाही, हे मला माहिती होते. तुमच्या मुलीच्या मरणाने त्याचा फायदा होणार होता. नोकराणीने केलेले गूढ माणसाचे वर्णन हे त्याच्याशी जुळणारे होते. तुम्ही त्याच्या मागावर रहाण्याबद्दल जागरूक नव्हतात. का? नक्कीच तुमचा संशय दुसऱ्या दिशेने चालला होता. त्यामुळे तुम्ही काहीतरी दडवून ठेवत होतात.”

“मिस्टर पायरो, तुमचे बरोबर आहे. मला हे पत्र मिळेपर्यंत, रुपर्टने अपराध केल्याची मला खात्री होती. या पत्राने माझी भंबेरी उडवून दिली.”

मिस्टर हॅलीडे म्हणाले, “हो. ‘फार उशीर होण्यापूर्वी आणि तुम्हाला वाटते, त्यापेक्षा लवकर’ मला काही कारवाई करायची होती.”

पायरो बोलला, “अर्थात तो परत आल्याचा तुम्हाला सुगावा लागेपर्यंत तुम्हाला थांबायचे नव्हते. लंडनपासून बारा वाजून चौदा

मिनिटाच्या गाडीने प्रवास करणारा व तुमच्या मुलीच्या डब्याजवळील पॅसेजमध्ये येणारा तोच तो होता का? डी ला रोचेफरसुद्धा मला आठवते त्याप्रमाणे उंच आणि काळा होता!”

त्या लखपतीने मान डोलाविली.

“ठीक आहे, मिस्टर. तुम्हाला शुभ दिवस. स्कॉटलंड यार्डकडे मला वाटते, रत्नांची यादी असेल, नाही का?”

“हो, मला वाटते, इन्स्पेक्टर जाप आता इथेच येत असेल. तुम्हाला त्याला भेटायचे असेल.”

## चार

जाप आमचा जुना मित्र होता. त्याने प्रेमाने पायरोला प्रेमळ अभिवादन केले.

“मिस्टर पायरो, तू कसा आहेस? जरी काही गोष्टींकडे बघण्याच्या आपल्या दृष्टीकोनात फरक असला तरी, आपल्यामध्ये काही वाईट भावना नकोत. ‘मेंदूतील करड्या पेशी काय म्हणत आहेत? बळकट आहेत का?”

पायरोने त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकत म्हटले, “माझ्या मित्रा, त्या नक्कीच काम करत आहेत.”

“मग ठीक आहे. विचार कर. तो माननीय रुपर्ट होता की एक वेडा होता? आम्ही अर्थात सगळ्या नेहमीच्या जागांवर लक्ष ठेऊन आहोत. अती भाव मारणारे लोक उघडे पडले, की आम्हाला कळेलच. हे ज्यांनी केले आहे, ते जास्त चमकोगिरी केल्यामुळे, शेवटी आम्हाला सापडतीलच.

रुपर्ट कॅरिंग्टर्न काल कुठे होता, हे शोधून काढायचा प्रयत्न आम्ही करत आहोत. ते थोडे गूढ वाटते आहे. त्या बाबतीत एक माणूस लक्ष ठेवून आहे.”

पायरोने सुचवले, “चांगली काळजी घेत आहात, पण फक्त ती कदाचित एक दिवस उशीरा घेत आहात.”

“मिस्टर पायरो, तुझे विनोद नेहमीप्रमाणे चालू राहू देत. ठीक आहे. मी पॅडीग्टन, ब्रिस्टॉल, वेस्टॉन, टाउनटनला चाललो आहे. अशी माझी मोठी मोहीम आहे.”

“तू संध्याकाळी येऊन मला तुझ्या मोहिमेचा वृतांत देशील?”

“मी परत आलो, तर नक्की देईन.”

आमचा मित्र गेल्यावर पायरो पुटपुटला, “तो चांगला इन्स्पेक्टर गतीपूर्ण कामावर विश्वास ठेवतो. “तो प्रवास करतो. पायाचे ठसे मोजतो. चिखल व सिगरेटची राख गोळा करतो. तो

फार व्यस्त असतो. तो शब्दातीतपणे उत्साही आहे. जर मी त्याच्याजवळ मानसशास्त्राचा उल्लेख केला, तर माझ्या मित्रा, तो काय करेल माहिती आहे का? तो हसेल व स्वतःशी बोलेल, ‘बिचारा पायरो! त्याचे वय झाले आहे. त्याला म्हातारचळ लागला आहे.’ जाप तरुणपणाचे दार ठोठावतो आहे. ते सगळे तरुण दार ठोठावण्यात एवढे गुंग आहेत की ते दार उघडे असल्याचे त्यांना समजतच नाही.”

“आणि तू काय करणार आहेस?”

“आज मी पूर्णपणे मोकळा असल्याने मी रिट्झला फोन करून तीन पेनी खर्च करणार आहे --- तुला कदाचित माहिती असेल, तिथे आपला रोचेफोर रहातो. नंतर माझे पाय थोडे ओलसर असल्याने व मी दोनदा खोकल्याने, मी माझ्या खोलीवर परत येऊन, स्पिरीटच्या दिव्यावर औषधी वनस्पतींपासून चहा बनवेन.”

## पाच

दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत मी पायरोला पाहिले नाही. तो शांतपणे त्याची न्याहारी संपवत होता.

मी उत्सुकतेने विचारले, “काय, ठीक आहे? काय झाले?”

“काही नाही.”

“पण जाप?”

"तो मला भेटला नाही."

"आणि रोचेफोर?"

"त्याने रिट्झ परवाच सोडले."

"खुनाच्या दिवशी?"

"हो."

"मग सर्व काही समजले. रुपर्ट कॅरिंग्टनने काय केले ते समजले."

"कारण डे ला रोचेफोरने रिट्झ सोडले म्हणून? माझ्या मित्रा, तू फार वेगाने जातो आहेस."

"कसेही करून त्याचा पाठलाग केला पाहिजे व पकडून आत टाकले पाहिजे. पण त्याचा हेतू काय असेल?"

"शंभर हजार डॉलर किमतीची रत्ने, हे कुणासाठीही मोठे प्रलोभन असू शकते. नाही. माझ्या मनातील प्रश्न आहे, त्याने तिला का मारले? फक्त रत्ने का चोरली नाहीत? तिने काही त्याला कोर्टात खेचले नसते."

"का नसते खेचले?"

"माझ्या मित्रा, कारण ती बाई आहे. तिने एकदा या माणसावर प्रेम केले होते. त्यामुळे तिने तिचे नुकसान चुपचाप सहन केले असते. उमराव डी ला रोचेफोर बायकांचे मानसशास्त्र चांगले

जाणणारा असल्यामुळे यशस्वी होता. त्याला हे सगळे असे होणार असल्याचे, माहिती होते. तर दुसरीकडे रुपर्ट कॅरिंग्टनने तिला मारले असेल असे धरले, तर तिला मारल्याबद्दल त्याला गुन्हेगार ठरवले गेले असते, मग रत्ने कशासाठी चोरायची?"

"आंधळेपणाने, विचार न करता."

"माझ्या मित्रा, कदाचित तसे असेल. ओहो, हा जाप आला बघ. मला त्याची टकटक समजते."

इन्स्पेक्टरचा चांगला विनोदी स्वभाव डोकावत होता.

"पायरो, शुभ सकाळ. मी आताच आलो. मी काही चांगले काम केले आहे. तुझे काय?"

पायरो शांतपणे बोलला, 'मी माझ्या कल्पना आजमावून बघतो आहे."

जाप मनापासून हसला.

"म्हाताऱ्याचे वय वाढत चालले आहे." तो मनातल्या मनात म्हणाल्यासारखे मला वाटले. तो मोठ्याने बोलला, "असे आम्हा तरूणांना करून चालणार नाही."

पायरो म्हणाला, "अरेरे, किती त्रास?"

"मी काय केले, ते तुला ऐकायचे आहे का?"

“तू मला त्याचा अंदाज करायची परवानगी दे. वेस्टन आणि टाउनटनमधील रुळांवरील गुन्हा केलेला सुरा तू शोधून काढलास आणि वेस्टनला मिसेस कॅरिंग्टन ज्या वर्तमानपत्र विकणाऱ्या मुलाबरोबर बोलली, त्याची मुलाखत तू घेतलीस.”

जापचे तोड उघडे राहिले. “तुला कसे काय समजले? ‘मेंदूतील करड्या पेशींमुळे’ हे उत्तर देऊ नकोस.”

“तू एकदाची त्यांची ताकद कबूल केलीस, हे बघून मला आनंद झाला. मला सांग, तिने त्या मुलाला एक शिलिंग दिला का?”

जाप त्याचे चकित मन शांत करत व ओठ फाकवत बोलला. “नाही. अर्धा क्राउन दिला. हे अमेरिकन चांगलेच उदार असतात!”

“आणि त्या बदल्यात तो मुलगा तिला विसरला नसेल, नाही का?”

“तो नाही विसरणार. अर्धा क्राउन त्याच्या रोजच्या दिनक्रमात मध्ये आला नाही. तिने त्याचे कौतुक करून दोन मासिके घेतली. एकाच्या मुखप्रृष्ठावर निळ्या कपड्यातील मुलीचे चित्र होते. ती म्हणाली, “ते माझ्यासारखे आहे.” ओहो, त्याने तिला नीट लक्षात ठेवले. ठीक आहे. तेवढे माझ्यासाठी पुरेसे होते. डॉक्टरांच्या पुराव्याने, गुन्हा नक्की टाउनटन येण्यापूर्वी घडला असला पाहिजे. मला वाटते लगेच सुरा बाहेर फेकण्यात आला असावा. मी त्या

रेल्वे रुळांमधून हिंडून, तो शोधला. आणि तो मला सापडला. मी टाउनटन स्टेशनवर त्या माणसासाठी चौकशी केली. पण ते मोठे स्टेशन असल्याने, त्यांनी त्याला पाहिलेच असेल, असे नाही. तो बहुधा नंतरच्या गाडीने लंडनला परत गेला असेल."

पायरोने मान हलवली. "अशी शक्यता वाटते."

"पण मी परत आल्यावर मला दुसरी एक बातमी मिळाली. ती रत्ने इकडून तिकडे हलवली जात आहेत. ठीक आहे. नेहमीच्या एका कोट्र्यातून ---एक मोठे रत्न --- लाल रत्न --- काल गहाण ठेवले गेले. तुला काय वाटते, तो कोण असेल?"

"तो कुणी बुटका इसम होता, एवढेच मला माहिती आहे."

जापने सुरु केले, "तुझे बरोबर आहे. तो पुरेसा बुटका होता. तो वाईट स्वभावाचा रेड नार्की होता."

मी विचारले, "वाईट स्वभावाचा रेड नार्की कोण?"

"विशेष करून रत्ने चोरणारा, सर. खून करणारा नव्हे. सहसा ग्रेसी किड नावाच्या एका बाईबरोबर काम करतो.. पण यावेळेस ती नव्हती --- जर ती उरलेल्या रत्नांबरोबर हॉलंडला उतरली नसेल, तर."

"तू त्या वाईट स्वभावाच्या रेड नार्कीला अटक केलीस का?"

"नक्कीच केली. पण लक्षात ठेव आपल्याला मिसेस कॅरिंग्टनबरोबर गाडीतून गेला, तो दुसरा माणूस हवा आहे. तो तो

माणूस आहे, ज्याने हा बेत आखला, बरोबर ना? पण त्या रेड नार्कीने पोलिसांना त्याची साथीदार कोण, याची माहिती दिली नाही.”

मी पाहिले की पायरोचे डोळे हिरवे गडद झाले आहेत.

तो हळूवारपणे बोलला, “मी तुझ्यासाठी त्या रेड नार्कीच्या साथीदाराला शोधून काढेन, ठीक आहे?” जापने पायरोच्या नजरेला नजर देत म्हटले, “तुझ्या अनेक लहानशा कल्पनांपैकी एक! तू हे सगळे कसे काय जमवतोस? हे नवलपूर्ण आहे. अर्थात नशीब, दुसरे काय?”

माझा मित्र पुटपुटला, “असेल कदाचित. हेस्टींग्ज, माझी टोपी आणि ब्रश आण. आणि जर अजून पाऊस पडत असेल, तर माझे बूटही आण. आपण आपले औषधी वनस्पतींपासून चहा करायचे चांगले काम सोडायला नको. जाप, अच्छा.”

“पायरो, तुझे नशीब चांगले असो.”

पायरोने मिळालेली पहिली टॅक्सी घेतली व चालकाला ती पर्ल लेनला न्यायला सांगितली.

जेव्हा आम्ही हॅलीडेच्या घराशी पोचलो, तेव्हा पायरो झटपट बाहेर आला. चालकाला पैसे दिले व दाराची घंटी वाजवली. दारवानाने दार उघडल्यावर त्याने त्याला हळू आवाजात विनंती

केली व आम्ही लगेच घराच्या एकदम वरच्या मजल्यावर गेलो. तिथे एका चांगल्या झोपायच्या खोलीत बसलो.

पायरोची दृष्टी खोलीभर फिरली आणि एका लहानशा काळ्या बॅगेवर स्थिर झाली. तो त्या बॅगेसमोर गुडघे टेकून बसला व त्यावरील चिकटवलेले कागद वाचू लागला. मग त्याने त्याच्या खिशातून एक तारेचे भेंडोळे काढले.

त्याने दारवानाला विचारले, की मिस्टर हॅलीडे आम्हाला आता इथे भेटू शकतील का?

दारवान निघून गेला आणि पायरोने हळूहळू त्याच्या तयार हातांनी बॅगेचे कुलूप उघडायचा प्रयत्न केला. थोड्याच वेळात ते उघडले. त्याने बॅगेचे झाकण उघडले. सावकाशीने तो त्यातील कपडे वरखाली करू लागला व ते बाहेर काढून जमिनीवर ठेऊ लागला.

जिन्यात दमदार पाऊले वाजली व हॅलीडे खोलीत आला.

त्याने रोखून बघत विचारले, “तुम्ही इथे हे काय आरंभले आहे?”

पायरोने बॅगेतून गडद निळ्या रंगाचा स्कर्ट, कोट व फरची पांढरी टोपी काढत म्हटले, ‘मिस्टर, मी हे शोधत होतो.”

मी मागे वळून पाहिले, तर नोकराणी, जेन मेसन खोलीत आली होती. ती बोलली, “माझ्या बॅगेशी तुम्ही काय करत आहात?”

“हेस्टींग्ज, तू जरा दार लावशील का? आभारी आहे. तू दाराकडे पाठ करून उभा रहा. आता, मिस्टर हॅलीडे, मला ग्रेसी कीडशी तुमची ओळख करून देऊ दे, म्हणजेच जेन मेसन. इन्स्पेक्टर जापने पकडलेल्या तिच्या साथीदाराला, म्हणजेच रेड नार्कीला भेटायला जेन जापच्या देखरेखीखाली लवकरच तुरुंगात हजर होईल.”

## सहा

पायरोने नापसंतीदर्शक हात उचलला. “हे अगदी सोपे होते.” तो स्पष्टीकरण देऊ लागला.

नोकराणीचे त्या कपड्यांबद्दल ठासून सांगणे, की ते तिच्या मालकिणीने घातले होते, हे मला पहिल्यांदा थोडे विचित्र वाटले. आमचे लक्ष तिकडे जावे, म्हणून तिचा एवढा अट्टाहास का होता? ब्रिस्टॉलला डब्यात असलेल्या माणसाबद्दल फक्त त्या नोकराणीच्या सांगण्यावरच आम्ही अवलंबून होतो, असा विचार मी केला. डॉक्टरांचा पुरावा असे सांगत होता, की मिसेस

कॅरिंग्टनचा खून ब्रिस्टॉल येण्यापूर्वी होणे सहज शक्य होते. ती जणू गुन्हेगाराची साथीदार असल्याप्रमाणे, जेन तिच्याकडील इतर पुराव्यांचा निर्देश करायला तयार नव्हती. मिसेस कॅरिंग्टनने घातलेले कपडे धक्कादायक होते. तिच्या मालकिणीने कुठले कपडे घालावेत, याचा निवाडा नोकराणीला करायची बहुधा चांगली संधी असते. आता जर ब्रिस्टॉलनंतर एखाद्याने त्या बाईला गडद निळ्या कपड्यात व फरच्या टोपीत तिला पाहिले असते, तर त्याने शपथेवर ती मिसेस कॅरिंग्टन असल्याचे सांगितले असते.

मी मनाशी आडाखे बांधू लागलो. नोकराणीने तसेच दुसरे कपडे घातले असले, तर! तिने आणि तिच्या साथीदाराने बहुधा बोगद्यातील अंधाराचा फायदा घेऊन, मिसेस कॅरिंग्टनला क्लोरोफॉर्मने बेशुद्ध करून, भोसकले असावे. तिचे शव बसायच्या जागेखाली गुंडाळून ठेवले असावे आणि नोकराणीने तिची जागा घेतली असावी. वेस्टनला ती लोकांना दिसली असती. कशी? त्यासाठी वर्तमानपत्रवाल्या मुलाला निवडले गेले, अशी शक्यता वाटते. त्याला भरपूर पैसे देऊन, तो तिला ओळखेल, अशी खात्री निर्माण केली जाते. एका मासिकावर शेरा मारून, ती स्वतःच्या कपड्यांच्या रंगाकडे देखील त्याचे लक्ष वेधते. वेस्टन गेल्यावर ती सुरा बाहेर फेकून देते व त्या जागी गुन्हा घडला असल्याचे भासवते. मग तिचे कपडे बदलते. किंवा आहे त्याच कपड्यांवर लांब कोट घालून त्याची बटणे लावते. टाउनटन आल्यावर गाडीतून उतरते व

लवकरात लवकर ब्रिस्टॉलला परतते. तिथे तिच्या साथीदाराने सामान कुलुपबंद खोलीत ठेवलेले असते. त्या सामानाचे तिकीट तो तिला देतो व स्वतः लंडनला परत जातो. ती तिची भूमिका निभावत, फलाटावर थांबते. मालकिणीची वाट बघत असल्याचे नाटक करत, शेवटी जवळच्या हॉटेलमध्ये रात्रीपुरता आश्रय घेते आणि ती म्हटल्याप्रमाणे सकाळी गावाकडे परतते.

जेव्हा जाप त्याच्या मोहिमेवरून परत येतो, तेव्हा तो माझे सगळे अंदाज खरे असल्याचे सांगतो. तो मला हे देखील सांगतो, की तो प्रसिद्ध लबाड माणूस, रत्ने दुसऱ्याला देतो आहे. तो सांगतो आहे ते, जेनने वर्णन केलेल्या माणसाच्या बरोबर उलटे असते. जेव्हा मी तो नेहमी ग्रेसी कीडबरोबर काम करणारा, वाईट स्वभावाचा रेड नार्की असल्याचे ऐकले, तेव्हा माझ्या लक्षात आले, की तिला नक्की कुठे शोधायचे.''

''आणि उमराव हॅलीडे?''

''मी त्याच्याबद्दल जितका जास्त विचार केला, तितकी माझी खात्री झाली, की त्याचा या प्रकरणाशी काही संबंध नाही. खुनापासूनचे त्याचे कातडीबचाऊ धोरण त्याने काळजीपूर्वक पाळले होते. तेव्हा आपल्या तपासकामातून त्याला वगळलेलेच बरे!''

उमराव हॅलीडे म्हणाला, ‘‘मिस्टर पायरो, माझ्यावर तुमचे मोठे ऋण आहे. मी जेवणानंतर तुम्हाला जो चेक देईन, त्याने देखील ते फिटणार नाही.’’

पायरो नम्रपणे हसला आणि माझ्याजवळ पुटपुटला, ‘‘जापला व्यावसयिक मानमरातब मिळेलच. ते ठीक आहे. पण त्याने माझ्याकडून ग्रेसी कीडला मिळवले, तरी मला वाटते, मी अमेरिकन म्हणतात त्याप्रमाणे मी त्याला थोडेफार तरी चिडवून बेजार केले आहे.’’

# THE CHOCOLATE BOX

# चॉकलेटचे खोके



ती वादळी रात्र होती. बाहेर नुकसानकारक वारा गर्जत होता. जोरदार वाऱ्याबरोबर पाऊस खिडक्यांना झोडपून काढत होता.

पायरो व मी शेकोटीकडे तोंड करून बसलो होतो. आमचे पाय आम्ही उबदार विस्तवाकडे ताणले होते. आम्हा दोघांमध्ये टेबल होते. टेबलाच्या माझ्या बाजूला काळजीपूर्वक रीतीने अल्कोहोलिक पेय उकळत होते. मला कुणी शंभर पौंड दिले असते

तरी मी प्यायले नसतो, असा दाट फेसाळ चॉकलेटच्या पेयाचा कप पायरोकडे होता. गुलाबी कपातील ते पेय पायरो घोटाघोटाने पित होता व समाधानाने सुस्कारा टाकत होता.

तो पुटपुटला, “हे छान आयुष्य आहे.”

मी दुजोरा दिला, “हो. हे छान, जुने जग आहे. “मला काम मिळाले आहे आणि चांगले काम! आणि इथे प्रसिद्ध असा तू आहेस --- “

पायरो बचाव करत बोलला, “अरे माझ्या मित्रा!”

“पण तू आहेसच. आणि हे बरोबर आहे. जेव्हा मी तुझ्या यशमालिकेचा विचार करतो, तेव्हा मी फार आश्चर्यचकित होतो. पराभव म्हणजे काय हे तुला माहितीच नाही.”

“असे म्हणणारा लाळ गाळणारा भंपक असला पाहिजे.”

“नाही. मी गंभीरपणे म्हणतो आहे. तू कधी अयशस्वी झाला आहेस का?”

“खूप वेळा. माझ्या मित्रा, तू कोण आहेस? नशीबाने तू माझा मदतनीस आहेस. तू नेहमी सुदैवी असशील, असे नाही. माझे भाग्य फार उशीरा फळफळले. बरेच वेळा त्याच उद्दिष्टाकडे जाणारे दुसरे काम आधी झाले होते. दोनदा मी यश मिळवता मिळवता,

आजारपणाने यशापासून फेकला गेलो आहे. माणसाने यशाबरोबर अपयशदेखील पचवायला शिकले पाहिजे."

मी म्हणालो, "मला असे म्हणायचे नव्हते. मला असे विचारायचे होते, की तू कधी तुझ्या चुकीमुळे एखाद्या केसमध्ये पार कोलमडून पडला आहेस का?"

"ओहो, मला समजले. माझी कधी पार फजिती झाली आहे का, असे तू विचारतो आहेस." त्याच्या चेहऱ्यावर हळू एक विचारपूर्वक स्मित पसरले. "माझ्या मित्रा, एकदा --- मी मूर्ख बनलो."

तो खुर्चीत सरसावून बसला.

त्याने पुढे वाकून शेकोटीत एक लाकूड टाकले. मग काळजीपूर्वक त्याचे हात फडक्याने साफ करत तो परत मागे झाला व सांगू लागला,

"ती गोष्ट खूप वर्षांपूर्वी बेल्जियममध्ये घडली. फ्रान्समध्ये तेव्हा चर्च आणि राज्यामध्ये भयानक भांडणे चालू होती. मिस्टर पॉल डेरोलॉर्ड फ्रेंच उपव्यवस्थापक होता. ही उघड बाब होती, की तो आज ना उद्या मंत्री होणार असल्याची खात्री होती.

तो कॅथॉलिक पक्षाचा कडवा विरोधक होता. आणि हे नक्की होते की त्याने मंत्री म्हणून हातात सूत्रे घेतल्यावर, त्याला मोठ्या

शत्रुत्वाला तोंड द्यायला लागणार होते. त्याची काही वैशिष्ट्ये होती. तो सिगरेट ओढत नसे किंवा दारू पीत नसे. तथापि इतर बाबतीत तो एवढा जागरूक नव्हता. हेस्टींग्ज, तुला समजले असेल, बायकांच्या बाबतीत —त्याची कीर्ती एवढी बरी नव्हती.

काही वर्षांपूर्वी त्याने ब्रुसेल्सच्या एका बाईशी लग्न केले होते. तिने त्याला तिच्या वाट्याच्या  पैशांची भरपूर प्राप्ती करून दिली. त्याला त्या पैशांचा त्याच्या व्यवसायिक कामात उपयोग झाला. कारण त्याचे कुटुंब श्रीमंत नव्हते. जर शक्य असेल तर तो स्वतःला प्रथितयश उमराव  समजत असे. त्याला मुले नव्हती. दोन वर्षांनी त्याची बायको जिन्यातून पडून वारली. तिने त्याला दिलेल्या संपत्तीतून लुई रस्त्यावर त्याचे घर उभे होते.

या घरात तो अचानक वारला. हे त्याच वेळेस घडले जेव्हा तो ज्या मंत्र्याच्या जागी काम करणार होता, त्या मंत्र्याने राजीनामा दिला. सगळ्या कागदांवर, त्याच्या नेमणूकीची पत्रे लिहिलेली होती. संध्याकाळच्या जेवणानंतर तो अचानक हृदयक्रिया बंद पडून मेला.

“अरे मित्रा, तुला माहिती असल्याप्रमाणे, त्यावेळेस मी बेल्जियन गुप्तचर विभागात होतो. मिस्टर पॉल डेरोलार्डच्या

मृत्यूमध्ये मला काही स्वारस्य नव्हते. मी जन्मतः कॅथॉलिक असल्याने, मला त्याचा मृत्यू मला शुभशकून वाटला.

त्यानंतर तीन दिवसांनी, जेव्हा माझी सुट्टी नुकतीच सुरु झाली. तेव्हा मी रहायचो, तिथे एक मोठे अवगुंठन घेतलेली, पण बऱ्यापैकी तरुण बाई मला भेटायला आली. ती चांगल्या वागणुकीची बाई असल्याचे मी लगेच ओळखले. तिने हळूवार गोड आवाजात विचारले, "मिस्टर हर्क्युल पायरो तुम्हीच का?"

मी झुकलो.

"गुप्तचर म्हणून काम करणारे?"

परत मी झुकलो. "बाईसाहेब, मी तुम्हाला बसण्याची विनंती करतो."

ती खुर्चीवर बसली व चेहऱ्यावरील अवगुंठन दूर केले. तिचा चेहरा अश्रूंनी भरलेला असला व काळजीची उदासी पसरली असली, तरी सुंदर होता.

ती म्हणाली, "मिस्टर मला समजले आहे, की तुम्ही आता सुट्टीवर आहात. त्यामुळे तुम्ही माझी खासगी केस घेऊ शकाल. तुम्हाला समजले असेल, की मला पोलिसात जायचे नाही."

मी मान हलवली. “मला वाटते, तुम्ही म्हणता आहात ते करणे मला शक्य नाही. मी सुट्टीवर असलो, तरी पोलीसांच्या संपर्कात आहे.”

ती पुढे वाकली. “मिस्टर, ऐकून घ्या. मी तुम्हाला फक्त तपास करायला सांगते आहे. तुमच्या तपासाचे निष्कर्ष तुम्ही पोलिसांना सांगू शकता. जर मला वाटते, ते खरे असेल, तर आपल्याला कायद्याची मदत घ्यावी लागेल.”

मग ती बाब गुंतागुंतीची होऊ लागली. त्यामुळे अधिक विरोध न करता, मी तिला होकार दिला.

तिच्या गालांवर लाल रंग चढला. “मिस्टर, मी तुमची आभारी आहे. मी तुम्हाला मिस्टर पॉल डेरोलार्डच्या मृत्यूविषयी तपास करण्यास सांगते आहे.”

नवल वाटून, मी ओरडलो, “माझे मत?”

“मिस्टर, माझ्याकडे तसा पुरावा काही नाही --- पण माझ्यातील बाईपणाच्या अतींद्रिय शक्तीने मला असे जाणवते, की मिस्टर डेरोलार्ड यांचा मृत्यू हा नैसर्गिक रीत्या झालेला नाही.”

“पण डॉक्टरानी नक्कीच --- “

“डॉक्टराचे कदाचित चुकले असेल. तो इतका सुदृढ आणि बळकट होता. ओहो, मिस्टर पायरो, मी तुम्हाला मला मदत करायची कळकळीची विनंती करते.”

ती बिचारी मुलगी एकटीच होती. तिने माझ्यासमोर गुडघे टेकले असते. मी तिला मला जमेल तितके शांत केले.

“बाईसाहेब, मी तुम्हाला मदत करेन. मला खात्री आहे, की तुमची भीती निराधार आहे. पण आपण बघू. पहिल्यांदा मी तुम्हाला घरात कोणकोण रहाते याविषयी सांगायला सांगेन.”

“जेनेट, फेलिस आणि स्वयंपाकीण, डीनाइस एवढे लोक रहातात. डीनाइस इथे खूप वर्षे काम करते आणि इतर दोघी बिचाऱ्या गावाकडील मुली आहेत. अजून फ्रँकोइस नावाचा नावाचा म्हातारा नोकर रहातो. मिस्टर डेरोलार्ड यांची आई माझ्याबरोबर रहाते आणि मी. माझे नाव व्हर्जिन मेसनार्ड असून, मी वारलेल्या मिसेस डेरोलार्ड यांची गरीब पुतणी आहे. मिस्टर पॉल यांची बायको व मी तीन वर्षांपासून कुटुंबाचा भाग आहोत. तर असे मी तुम्हाला घरातील माणसांबद्दल सांगितले आहे. अजून दोन पाहुणेदेखील घरात रहातात.”

“आणि ते कोण आहेत?’

“फ्रान्सला मिस्टर डेरोलार्ड यांच्या शेजारी रहाणारे, मिस्टर डी सेंट अलार्ड व एक इंग्लिश मित्र, मिस्टर जॉन विल्सन.”

“ते दोघे अजूनही तिथे रहातात का?”

“मिस्टर विल्सन रहातात. पण मिस्टर डी सेंट अलार्ड कालच इथून गेले.”

‘आणि मिस मेसनार्ड, तुमचा काय बेत आहे?”

“जर तुम्ही अर्ध्या तासात घरी आलात, तर मी तुम्हाला सगळी गोष्ट सांगते. मी तुम्हाला पत्रकारितेशी संबंधित अंगाने जास्त चांगले सांगू शकेन. तुम्ही पॅरीसहून आला आहात, असे मी सांगेन आणि तुम्ही मिस्टर डी सेंट अलार्ड यांच्या ओळखीने आल्याचे सांगेन. डेरोलार्ड बाईसाहेब यांची तब्येत नाजूक आहे. त्या आपल्याकडे फार लक्ष देणार नाहीत.”

बाईसाहेबांच्या हुशार बेताप्रमाणे, मी घरी जाऊन पोचलो. जरी तब्येतीने ठीक नसल्या, तरी चांगली छाप पाडणाऱ्या व खानदानी दिसणाऱ्या मृत व्यक्तीच्या आईबरोबरील छोट्याशा मुलाखतीनंतर, मी तेथून निघालो.

“मला नवल वाटते, माझ्या मित्रा, [ पायरो बोलला ] तू माझ्या कामातील अडचणी बहुधा समजून घेऊ शकशील, नाही का? येथील माणसाचा तीन दिवसापूर्वी मृत्यू झाला आहे. जर इथे काही

लबाडीची वाईट गोष्ट घडली असेल, तर तर एकच शक्यता उरते -- ती म्हणजे विषप्रयोग! मला प्रेत बघायची संधी मिळाली नाही. त्यामुळे तिचे विश्लेषण वा तपासणी करायचा काही प्रश्नच येत नाही. त्यामुळे विषप्रयोग झाला असावा की नाही, हे ठरवायचे कसे? इथे काही खोटे वा कसलेही पुरावे नाहीत. हर्क्युल पायरोला काही मदत नसतानाच खून कोणी केला हे ठरवावे लागेल.

प्रथम मी घरातील लोकांच्या मुलाखती घेतल्या आणि त्यांच्या मदतीने त्या संध्याकाळी एकंदर काय झाले असेल, याचा अंदाज बांधला. जेवणातील अन्नाची व ते वाढण्याच्या पद्धतीची, मी विशेष दखल घेतली.

मिस्टर डेरोलार्ड यांनी सूपच्या भांड्यातून सर्वांना स्वतः सूप वाढले. मग कटलेट, चिकन आणि शेवटी साखरेच्या पाकात शिजवलेली फळे. सर्व काही टेबलावर ठेवलेले होते आणि ते स्वतः सर्वांना वाढत होते. मोठ्या भांड्यात कॉफी टेबलावर आणली गेली. आणि मित्रा, अजून काही नाही. विषप्रयोग झाला असला तर सगळयांनाच झाला असता. एकालाच होणे शक्य नाही.

जेवणानंतर, डेरोलार्ड आईसाहेब मिस मेसनार्डबरोबर त्यांच्या खोलीत गेल्या आणि तीन माणसे मिस्टर डेरोलार्डच्या अभ्यासिकेत गेली. तिथे त्यांनी मित्रत्वाने काही वेळ गप्पा मारल्या.

जेव्हा अचानक काही पूर्वसूचनेशिवाय, मिस्टर डेरोलार्ड जमिनीवर कोसळले. मिस्टर डी सेंट अलार्ड धावले व त्यांनी फ्रँकोइसला ताबडतोब डॉक्टरांना आणायला सांगितले. ते म्हणाले की ही नक्की फीट असणार. पण डॉक्टर आले तेव्हा मिस्टर डेरोलार्ड यांचा आधीच मृत्यू झालेला होता.

मिस्टर जॉन विल्सन हे त्याकाळी जॉन बुल इंग्लीशमन म्हणून सर्वत्र ओळखले जात. ते मध्यमवयीन असून दणकट होते. त्यांची माहिती त्यांनी ब्रिटीश फ्रेंचमधून दिली. ती साधारण मला आधी माहिती असलेलीच होती. ती अशीः

“डेरोलार्डचा चेहरा एकदम खूप लाल झाला आणि तो खाली पडला.”

आता तिथे अजून काही शोधायचे राहिले नाही. मग मी जिथे दुर्घटना घडली, तिथे गेलो आणि तिथे मी सांगितल्यामुळे एकांतात राहिलो. अजूनपर्यंत मिस मेसनार्डने सांगितलेले आजमावून बघायला मला काही संधी मिळाली नव्हती. तिच्या चेहऱ्यावरून मी असे धरून चाललो होतो, की मेलेल्या माणसाबद्दल तिच्या मनात काही अद्भुतरम्य भावना असणार ज्या तिला या केसबद्दलचा सामान्य दृष्टीकोन घेऊन देत नव्हत्या. मी अभ्यासिका  सूक्ष्मपणे तपासली. मृत माणसाच्या खुर्चीवर इंजेक्शनची सुई पडली होती.

तेच मरण्यापूर्वीचे शेवटचे इंजेक्शन असावे. मिनिटभर घुसवलेली ती सुई तशीच राहिली असणार. पण त्यामुळे आधीच्या हकीगतीमध्ये काही भर पडत नव्हती किंवा तिला काही आधारही मिळत नव्हता. मी दुःखाने खुर्चीत मटकन खाली बसलो.

मी मोठ्याने बोललो, “एकूण काय, तर मी ही केस सोडून देतो. मला इथे रहस्य उकलायला मदत करेल, अशी एकही गोष्ट सापडत नाही. सर्व काही अगदी सामान्य दिसते आहे.”

मी असे म्हणतो आहे तोच माझी नजर टेबलावरील मोठ्या चॉकलेटच्या  खोक्याकडे गेली. माझे हृदय उसळले. तो खोका मिस्टर डेरोलार्डच्या खुनाशी संबंधित नसेलही. पण शेवटी इथे काहीतरी सांमान्य नसलेले तर सापडले. मी खोक्याचे झाकण उघडले. तो खोका हातही न लावलेला, पूर्ण भरलेला होता. एकही चॉकलेट खाल्ले गेले नव्हते, ते मला विचित्र वाटले. पण हेस्टींग्ज, खोके गुलाबी असून झाकण निळे असेल तर सहसा गुलाबी खोक्याला निळी रिबीन बांधतात किंवा उलटे. पण खोके एका रंगाचे व झाकण दुसऱ्या रंगाचे --- नाही. --- कोणी काही  तक्रार करणार नाही, तरी हे मुद्दाम केलेले वाटत होते.

हा प्रसंग काही उपयोगाचा असेल, असे मला वाटत नव्हते. तरी पण तो थोडा वेगळा वाटल्याने, मी त्याचा शोध घ्यायचे

ठरवले. मी फ्रँकोइसला बोलावण्यासाठी घंटी वाजवली. त्याला मी विचारले की मिस्टर डेरोलार्डना गोड खाण्याची आवड होती का. त्याच्या ओठांवर फिकट उदास स्मित तरळले.

“त्याना प्रचंड आवड होती. ते नेहमी चॉकलेटचे खोके घरात ठेवत. ते कुठल्याही प्रकारचे उत्तेजक पेय पित नसत.”

“तरी या खोक्याला हातही लावलेला नाही.” मी खोक्याचे झाकण उघडून दाखवले.

“मिस्टर, ते त्यांच्या मृत्युच्या दिवशी खरेदी केले होते. दुसरे जवळजवळ संपले होते.”

“म्हणजे दुसरे त्यांच्या मृत्युच्या दिवशी संपले होते.” मी सावकाशीने म्हणालो.

“हो, मला ते त्या दिवशी रिकामे आढळले व मी ते फेकून दिले.”

“मिस्टर डेरोलार्ड दिवसभर चॉकलेटे खात असत का?”

“सहसा जेवणानंतर.”

मी दिवा बघू लागलो.

मी म्हणालो, “फ्रँकोइस, तू काळजीपूर्वक बोल.”

“मिस्टर, तशी गरज असेल, तर.”

“तर मग ऐक. मी पोलीसांपैकी आहे. तू मला तो फेकून दिलेला खोका शोधायला मदत करशील का?”

“नक्कीच. तो कचरापेटीत असेल.”

तो गेला व काही मिनिटात, धुळीने भरलेली एक वस्तु घेऊन आला. ती माझ्या हातात होती तशीच होती. फक्त तिचे झाकण गुलाबी असून खोके निळे होते. मी फ्रँकोइसला धन्यवाद दिले. परत एकदा त्याला मुद्देसूद व विचार करून बोलायची आठवण केली व लुई रस्त्यावरील त्या घरातून बाहेर पडलो.

नंतर मी मिस्टर डेरोलार्डला तपासणाऱ्या डॉक्टरला बोलावले. त्याच्याबरोबरचे माझे काम जरा अवघड होते. तो चतुराईने कायदेशीर भाषेआड दडला. पण मी असा तर्क केला, की तो या केसबद्दल पाहिजे तेवढा खात्रीपूर्वक बोलत नव्हता.

मी त्याच्याशी मित्रत्वाने वागायचा प्रयत्न केला, तेव्हा तो म्हणाला, “तिथे चमत्कारीक प्रकारच्या खूप घटना घडत होत्या. अचानक रागाचा पारा चढणे, जड जेवणानंतरचा भावनाक्षोभ, हे मला कळले. नंतर रागाचा पारा चढल्याने रक्त डोक्यात उतरणे आणि असेच काही!”

“पण मिस्टर डेरोलार्ड यांचा भावनाक्षोभ कधी होत नसे.”

“होत नसे? माझी खात्री झाली की मिस्टर डी सेंट अलार्ड यांच्याबरोबर त्यांचे जोरदार भांडण झाले असावे.”

“पण काय कारणावरून?”

डॉक्टरने खांदे उडवले, “ते होणारच होते. मिस्टर डी सेंट अलार्ड टोकाचे कॅथॉलीक नव्हते का? आणि मिस्टर डेरोलार्ड कॅथॉलिक पक्षाचे कडवे विरोधक होते, यावरून त्यांची मैत्री तुटली असावी. त्यांचे वाद झाले नाहीत, असा एकही दिवस जात नसे. मिस्टर डी सेंट अलार्ड यांना मिस्टर डेरोलार्ड ख्रिश्चन नाहीतच असे वाटे.”

हे अनपेक्षित होते. यामुळे माझ्या विचारांना खाद्य मिळाले.

“डॉक्टर, अजून एक प्रश्न, चॉकलेटमध्ये जहाल विष भरलेले असण्याची किती शक्यता वाटते?”

डॉक्टर सावकाश म्हणाले, “मला वाटते, शक्य आहे. जर बाष्पीभवन होणार नसले, तर शुद्ध पृसीक आम्लाने मृत्यू होऊ शकेल. त्याचा बारीकसा घास नकळत गिळला गेला असेल --- पण मला असे होण्याची शक्यता कमी वाटते. विषारी औषध मिसळलेले चॉकलेट! त्याने उबग आल्यासारखा वेडावाकडा चेहरा केला. “मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती आहे एखादा घोट

पुरेसा ठरतो! धोकादायक असल्याची जाणीव नसलेले असे काही पोटात गेले, तर मग सर्व संपलेच.''

''डॉक्टर, आभारी आहे.''

मी लुई रस्त्याच्या आसपास असलेल्या औषधांच्या दुकानात चौकशी केली. खरे तर हे पोलिसांनी केलेले बरे. पण मला काही त्रास न होता, मला हवी असलेली माहिती मिळाली. समस्या असलेल्या घरात विष विकल्याचे मला समजले. हे वयस्क डेरोलार्ड बाईसाहेबांचे डोळयात घालायचे थेंब, अट्रोपाईन सल्फेट होते. अट्रोपाईनमध्ये विष असते. क्षणभर मला आनंद झाला. पण याची लक्षणे टोमेनशी मिळतीजुळती आहेत. मी अभ्यासत असलेल्या विषाशी त्याचे साम्य नव्हते. शिवाय ''डॉक्टरांची ते औषध आणण्याबद्दलची चिठ्ठी जुनी होती. डेरोलार्ड बाईसाहेबांचे दोन्ही डोळयात गेली अनेक वर्षे मोतीबिंदू होता.

मी निराश होऊन परतताना मला दुकानदाराचा आवाज आला, ''मिस्टर पायरो, एक मिनिट. मला आठवले, ज्या मुलीने तो डॉक्टरांचा कागद आणला होता, ती इंग्लिश दुकानात जाण्यासंबधी काही बोलत होती. तुम्ही तिथे प्रयत्न करून बघा.''

मी ते केले. माझे काम प्रसिद्ध असल्याने, अजून एकदा मला पाहिजे ती माहिती मिळाली. मिस्टर डेरोलार्डच्या मृत्युच्या

आदल्या दिवशी, त्यांनी ती डॉक्टरांची चिठ्ठी मिस्टर जॉन विल्सनला ते औषध हवे असल्याचे सांगून त्याच्या नावावर वापरली होती. त्यात फारसा खोटेपणा नव्हता. त्या साध्या लहानशा ट्रिनीट्रीनच्या गोळ्या होत्या. मी त्या बघायला मागितल्या. त्याने त्या दाखवल्या. आणि माझे ह्रदय जोरात धडधडू लागले --- कारण त्या लहान गोळ्या चॉकलेटच्या होत्या.

“मी विचारले, “हे विष आहे का?”

“नाही.”

“तुम्ही याचे होणारे परिणाम वर्णन करू शकाल का?”

“त्याने रक्तदाब कमी होतो. ते काही ह्रदयविकारांवर दिले जाते --- उदाहरणार्थ अंजायना. ते रोहिणीतील ताण कमी करते. रक्तवाहिन्या आकुंचन पावल्या --- “

मी मध्येच बोललो, “खरे का? या लांबलचक वर्णनामध्ये मला फारसे काही दिसत नाही. यामुळे चेहरा भावनामयतेने लाल होतो का?”

“नक्कीच होतो.”

“आणि समजा, मी या दहा वीस गोळ्या खाल्ल्या, तर?”

त्याने कोरडेपणे म्हटले, “मी तुम्हाला असे करायचा सल्ला देणार नाही.”

“आणि तरी तुम्ही म्हणता की त्या विषारी नाहीत?”

तो पूर्वीसारखाच कोरडेपणे बोलला, “ज्याला विष म्हटले जात नाही, अशा पुष्कळ गोष्टी आहेत, ज्यामुळे माणसे मरतात.”

मी दुकान सोडून, आनंदाने बाहेर पडलो. शेवटी गोष्टी काही प्रमाणात हलू लागल्या तर!

आता मला समजले की जॉन विल्सनने गुन्हा केला होता --- पण उद्देश काय, ते अजून समजत नव्हते. तो व्यापारासाठी बेल्जियमला आला होता. आणि त्याच्या थोड्याफार ओळखीच्या असलेल्या मिस्टर डेरोलार्डला त्याच्याकडे रहाण्याबद्दल विचारले होते. पण डेरोलार्डच्या मरणाने त्याचा काही फायदा होत असल्याचे दिसत नव्हते. शिवाय मी इंग्लंडमध्ये चौकशी करून, त्याला गेली काही वर्षे अंजायनाचा, हृदयाशी संबंधित आजार असल्याचे शोधून काढले. त्यामुळे त्याला त्याच्याकडील त्या गोळ्या घ्यायचा अधिकार होता. पण माझी खात्री पटली, की कुणीतरी चॉकलेटच्या खोक्याशी गेले असणार आणि चुकून प्रथम भरलेले खोके बघून नंतर दुसऱ्या संपत आलेल्या खोक्याशी गेले असणार व ते तळाला गेलेले पाहून, त्यातील बऱ्याच ट्रिनीट्रीनच्या गोळ्या चॉकलेटे म्हणून उचलली असणार. चॉकलेटे मोठी होती. उरलेल्या

वीस तीस ट्रिनीट्रीनच्या गोळयांत चॉकलेटे मिसळली असणार. पण हे कुणी केले?”

घरात दोन पाहुणे होते. जॉन विल्सनकडे गोळयांचे साधन होते. मिस्टर डी सेंट अलार्ड यांच्या मनात आकस होता. ते एककल्ली होते आणि धार्मिक बाबतीत एककल्ली म्हणजे बघायला नको. त्याना काही कारणाने जॉन विल्सनच्या ट्रिनीट्रीनच्या गोळया मिळाल्या असतील का?

दुसरीही एक कल्पना माझ्या डोक्यात आली. ओहो, तुम्ही माझ्या कल्पनांना हसत आहात! विल्सनच्या ट्रिनीट्रीनच्या गोळया एवढ्या कमी कशा झाल्या? त्याने नक्कीच इंग्लंडहून पुरेसा साठा आणला असणार. मी एकदा लुई रस्त्यावरील घरात फोन केला. विल्सन बाहेर गेला होता. पण त्याची खोली आवरणारी मुलगी, फेलीस भेटली. मी तिला लगेच विचारले, की विल्सनच्या मांडणीमधून काही दिवसांपूर्वी औषधांच्या गोळयांची बाटली हरवली होती का? मुलीने तत्परतेने ते खरे असल्याचे सांगितले. त्याबद्दल तिला दोष दिला गेला. विल्सनला वाटले, की ती तिच्या हातून फुटली असणार. पण असे तिला म्हणणे त्याला न आवडल्याने तो तसे काही बोलला नाही. पण तिने तर बाटलीला

हातदेखील लावला नव्हता. त्यामुळे अपरिहार्यपणे ती जेनेटच होती --- कारण नसतांना जिकडेतिकडे नाक खुपसणारी!

मी माझे तोंड आवरते घेऊन, तिथून निघालो. आता मला हवे ते सर्व समजले होते. आता फक्त माझी केस सिद्ध करणे उरले होते. तेदेखील माझ्या मते सोपे नव्हते. मला साधारण खात्री होती की विल्सनच्या मांडणीतून मिस्टर डी सेंट अलार्डने ट्रिनीट्रीनच्या गोळ्यांची बाटली हलवली. पण इतरांचा विश्वास बसावा म्हणून, मला पुरावे गोळा करायला हवेत. पण माझ्याकडे तर काहीच पुरावे नव्हते!

पण म्हणून काय झाले? मला माहिती होते --- ही मोठी गोष्ट होती. हेस्टीग्ज, तुला स्टाइल्स केसमधली आपली अडचण आठवते का? तिथेही मला माहिती होते --- तिथे पण मला खुनाच्या साखळीतील पुरावे शोधायला खूप वेळ लागला होता.

मी मिस मेसनार्डला भेटायचे ठरवले. ती लगेच आली. मी तिच्याकडे मिस्टर डी सेंट अलार्डचा पत्ता मागितला. तिचा चेहरा त्रासिक बनला.

“मिस्टर, तुम्हाला तो का हवा आहे?”

“बाईसाहेब, तो मिळणे जरुरीचे आहे.”.

ती त्रासलेली व संशयी दिसत होती.

“तो तुम्हाला काही सांगू शकणार नाही. त्याचे विचार कुठे तरी भरकटत असतात. त्याच्याभोवती काय चालले आहे, याची तो क़्वचितच दखल घेतो.”

“मिस, तो मिस्टर डेरोलार्डचा जुना मित्र होता. तो कदाचित काही गोष्टी सांगू शकेल --- भूतकाळातील काही गोष्टी --- काही खुन्नस किंवा प्रेम प्रकरणे.”

ती मुलगी लाजली व तिने ओठ चावले.. ठीक आहे --- पण --- मला आता असे वाटते आहे, की माझा काहीतरी गैरसमज झाला. माझे ऐकून तुम्ही ही केस घेतलीत, म्हणून बरे झाले. पण मी जरा उदास झाले होते --- फारच दुःखी झाले होते. आता असे दिसते आहे की या प्रकरणात काही गूढ नसावे. मिस्टर तुम्ही आता जास्त त्रास घेऊ नये.”

मी तिला जवळून न्याहाळले.

“मिस, कधीकधी कुत्र्याला वासावरून माग काढणे कठीण जाते. पण एकदा तो वास आला, की मग तो त्याची छाननी करणे कधीच सोडत नाही. म्हणजे जर तो चांगला कुत्रा असेल, तर! मी हर्क्युल पायरो एक चांगला कुत्रा आहे.”

काही न बोलता, तिने पाठ वळवली. काही मिनिटाने ती एका कागदावर पत्ता लिहून परतली. मी निघालो. माझ्यासाठी फ्रँकोइस बाहेर थांबला होता. त्याने माझ्याकडे उत्कंठेने पाहिले.

"मिस्टर, काही बातमी मिळाली नाही का?"

"मित्रा, अजून तरी काही नाही."

त्याने एक सुस्कारा टाकला.."ओहो! बिचारे मिस्टर डेरोलार्ड! मी सुद्धा त्याच्यासारखाच विचार करत होतो. मी धर्मगुरूची पर्वा करत नाही. मी घरातही कधी काही म्हणत नाही. सर्व बायका फार धार्मिक असतात --- ही कदाचित चांगली गोष्ट असेल. माझी आई फार धार्मिक बाई आहे. मेसनार्ड बाईसाहेब धार्मिक असून कुमारिका आहेत."

"कुमारिका आहे? ती खूप धार्मिक आहे का? पहिल्या दिवशी मी पाहिलेला तिचा अश्रुंनी भरलेला भावपूर्ण चेहरा आठवून, मला आश्चर्य वाटले होते.

मला मिस्टर डी सेंट अलार्डचा पत्ता मिळाल्यावर, मी वेळ घालवला नाही. मी शेजारील अर्डेन्स राज्यातील चटाऊमध्ये त्याच्या घरी जाण्याचा प्रयत्न केला. शेवटी मी त्यात यशस्वी झालो --- कसा झालो असेन? --- एक प्लंबर म्हणून. अरे मित्रा, त्याच्या झोपायच्या खोलीतील गॅसमधील गळती थांबवणे एका मिनिटाचे

काम होते. मी हत्यारे आणायला म्हणून गेलो व अशा वेळी परत आलो, की मला एकांत मिळेल. मी काय शोधत होतो, ते खरे तर मलाही माहिती नव्हते. मला गरजेची असलेली एक गोष्ट मला मिळेल, असे मला वाटत नव्हते. त्याने ती वस्तू बाहेर दिसेल अशी ठेवायचा धोका बहुधा घेतलेला नसणार.

पण मला एक बंद कपाट दिसले. मला त्यात काय आहे, हे बघायचा मोह आवरेना. कुलुप अगदी साधे होते. ते मी उघडले. आत जुन्या बाटल्यांचा खच होता. मी त्या एकेक करून थरथरत्या हाताने काढल्या. अचानक मी किंचाळलो. माझ्या मित्रा, काही कल्पना कर. मी माझ्या हातात एक सिलिंडरच्या आकाराची काचेची बाटली धरली होती. त्यावर लिहिले होते, ‘मिस्टर जॉन विल्सनच्या ट्रिनीट्रीनच्या गोळ्या, जेव्हा लागेल, तेव्हा एक घेणे.’

मी माझ्या भावना आवरल्या. कपाट लावले. बाटली माझ्या खिशात टाकली आणि परत दुरुस्तीचे काम करू लागलो. प्रत्येकाने शिस्तशीर असले पाहिजे. मग मी तिकडून निघालो. लवकरात लवकर गाडी पकडून रात्री उशीरा ब्रुसेल्सला आलो. सकाळी मी पोलिसांच्या मुख्यासाठी अहवाल लिहित होतो. तेव्हा मला एक चिठ्ठी मिळाली. ती वयस्क मिसेस डेरोलार्डने पाठवली होती. तिने मला लवकरात लवकर लुई रस्त्यावरील घरी बोलावले होते.

फ्रँकोइसने माझ्यासाठी दार उघडले.

“बाईसाहेब तुमची वाट बघत आहेत.”

मला त्याने तिच्या खोलीत नेले. ती एका मोठ्या आरामखुर्चीत बसली होती. मिस व्हर्जिन मेसनार्ड तिथे नव्हती.

वयस्क बाई म्हणाली, “मिस्टर पायरो, मला आताच असे समजले, की तुम्ही खासगी गुप्तहेर नसून, पोलीस ऑफिसर आहात.”

“बाईसाहेब, ते तसे आहे.”

“तुम्ही इथे माझ्या मुलाच्या मृत्यूची चौकशी करायला आलात. बरोबर?”

मी परत म्हणालो, “हो, बाईसाहेब, ते तसे आहे.”

“मला ऐकायला आवडेल की तुम्ही काय प्रगती केली आहे?”

मी कां कू करू लागलो.

पहिल्यांदा मला हे समजले तर आवडेल, की बाईसाहेब, तुम्हाला हे सर्व कसे समजले?

“जो आता या जगात नाही, त्याच्याकडून.”

तिचे शब्द व ते उच्चारायची तिची धाटणी बघून माझ्या ह्रदयात कळ उठली. मी अवाक् होऊन माझी बोलती बंद झाली.”

“मिस्टर, त्यामुळे मी तुम्हाला कळकळीची विनंती करते, की तुम्ही तुमच्या तपासकामात कायकाय प्रगती झाली, ते मला सांगावे.”

“बाईसाहेब, माझा तपास संपलेला आहे.”

“माझा मुलगा?”

“त्याला मुद्दाम मारण्यात आले.”

“कोणी, ते तुम्हाला माहिती आहे का?”

“हो, बाईसाहेब.”

मग कोणी?”

“मिस्टर डी सेंट अलार्ड.”

“तुम्ही चुकता आहात. मिस्टर डी सेंट अलार्ड असा गुन्हा करणे शक्य नाही,”

“पण माझ्याकडे पुरावे आहेत.”

“मी तुम्हाला मला एकदा पूर्णपणे काय झाले, ते सांगायची विनंती करते.”

यावेळेस मी तिची आज्ञा पाळली. घडलेली प्रत्येक पायरी मी सांगत गेलो आणि मला सत्यपरिस्थिती समजून आली. तिने सर्व काही लक्षपूर्वक ऐकले.

“हो. हो. एक गोष्ट सोडून, तुम्ही सांगितले तसेच सर्व झाले. मिस्टर डी सेंट अलार्ड यांनी नव्हे, तर त्याच्या आईने, म्हणजे मी तो खून केला.”

मी तिच्याकडे निरखून पाहिले. तिची मान हळूहळू हलत होती.

“तुम्हाला मी बोलावून घेतले, म्हणून बरे झाले. व्हर्जिनने चर्चमध्ये जाण्यापूर्वी तिने काय केले ते मला सांगितल्यामुळे, देवाची कृपा झाली. मिस्टर पायरो, नीट ऐका. त्याने चर्चची आज्ञा मोडली. त्याने देवाविरुद्ध वागून पाप केले. त्याने इतरांनाही त्याच्यासारखे वागायला भाग पाडले. पण त्याने त्याहूनही वाईट केले. एका सकाळी या घरातील माझ्या खोलीतून मी बाहेर आले, मी माझ्या सुनेला जिन्याच्या वरच्या टोकाला उभे असलेले पाहिले. ती एक पत्र वाचत होती. मी माझ्या मुलाला तिच्यामागे उभे असलेले पाहिले. एक धक्का बसून, ती जिन्यातून गडगडली. पायऱ्यांवर तिचे डोके आपटले. तिला उचलले, तेव्हा ती मेल्याचे

लक्षात आले. माझा मुलगा खुनी होता आणि हे फक्त त्याच्या आईला, म्हणजे मला माहिती होते.”

तिने क्षणभर डोळे मिटून घेतले. “मिस्टर, माझे दुःख आणि त्रास तुम्ही समजू शकणार नाही. मी काय करणार? त्याला पोलिसात द्यायचे? मी स्वतः तर हे करू शकत नव्हते. ते माझे कर्तव्य होते पण मी शारीरिक दृष्ट्या दुर्बळ होते. शिवाय त्यांनी माझ्यावर कसा काय विश्वास ठेवला असता? माझी दृष्टी विशेष चांगली नाही --- मला नीट दिसले नसेल, असे ते म्हणाले असते. मी गप्प राहिले. पण माझी सद्सदविवेकबुद्धी मला शांती लाभून देत नव्हती. शांत राहून मी देखील खुनी ठरत होते. माझ्या मुलाला त्याच्या बायकोचे पैसे मिळाले. लायकी नसतांना त्याची दिवसेंदिवस प्रगती होत चालली होती. आणि आता तर तो मंत्री होणार होता. आणि मग तिथे व्हर्जिन होती. गरीब बिचारी, सुंदर, नैसर्गिक रीत्या धार्मिक असणारी मुलगी. तिला तो फशी पाडायला बघत होता. त्याला स्त्रियांवर विचित्रपणे भयानक हुकमत गाजवता येत असे. मी ते बघत होते. हे थांबवण्यास हतबल होते. त्याचा तिच्याशी लग्नाचा विचार दिसत नव्हता. ती त्याला सर्वस्व अर्पण करायला निघाल्याची वेळ जवळ येत चालली होती.

मग मला माझा रस्ता स्वच्छ दिसला. तो माझा मुलगा होता. मी त्याला आयुष्य दिले होते. मी त्याच्यासाठी जबाबदार होते. त्याने एका बाईचे शरीर मारले होते. आता तो दुसऱ्या एका बाईच्या आत्म्याचा विनाश करायला निघाला होता. मी मिस्टर विल्सनच्या खोलीत गेले आणि गोळ्यांची बाटली घेतली. तोच एकदा हसत म्हणाला होता, की एखाद्या माणसाला मारायला त्या पुरेशा आहेत. मी अभ्यासिकेत गेले. नेहमी टेबलावर असणारे चॉकलेटचे मोठे खोके उघडले. मी चुकून नवीन खोके उघडले. तेही टेबलावरच होते. पहिल्यात फक्त एक चॉकलेट उरले होते. त्यामुळे गोष्टी सोप्या झाल्या. माझा मुलगा आणि व्हर्जिन सोडून कुणीच चॉकलेट खात नसे. मी त्या रात्री तिला माझ्याबरोबर ठेवले. सर्व बेत माझ्या मनाप्रमाणे जुळून आला --- "

एक मिनिट ती डोळे मिटून थांबली आणि मग परत डोळे उघडले.

"मिस्टर पायरो, आता मी तुमच्या हातात आहे. ते म्हणतात, आता माझे फार दिवस राहिले नाही. मी देवासमोर माझ्या कृत्यांचा जाब द्यायला तयार आहे. मला पृथ्वीवरदेखील तो दिला पाहिजे का?"

मी कां कू करू लागलो. अजून वेळ घालवण्यासाठी मी विचारले, “पण बाईसाहेब, रिकामी बाटली? ती मिस्टर डी सेंट अलार्ड यांच्या ताब्यात कशी आली?”

“मिस्टर, ते जेव्हा माझा निरोप घ्यायला आले, तेव्हा मी ती त्यांच्या खिशात घातली. या भानगडीतून कसे सुटावे, ते मला माहिती नव्हते. मी वयामुळे इतकी दुर्बळ आहे, की मी कुणाच्या मदतीशिवाय हलू शकत नाही. माझ्या खोलीत ती रिकामी बाटली सापडली असती, तर नसता संशय घेतला गेला असता. मिस्टर, तुम्हाला कळते आहे ना?” ती ताठ झाली --- हे मिस्टर डी सेंट अलार्ड यांच्यावर संशय जावा म्हणून केले नाही. अशी गोष्ट मी स्वप्नातदेखील पाहू शकत नाही. मला वाटले त्याचा नोकर रिकामी बाटली पाहून ती त्याला प्रश्न न विचारता फेकून देईल.”

मी माझे डोके झुकवले व म्हणालो, “बाईसाहेब, मला समजले.”

“आता तुमचा निर्णय काय असेल?”

तिचा आवाज न थरथरणारा व ठाम होता. तिचे डोके नेहमीप्रमाणे उंच होते.

मी उभा राहिलो..

मी बोललो, “बाईसाहेब, तुम्हाला शुभ दिवस म्हणायचे माझे भाग्य आहे. मी माझा तपास केला आणि पराभूत झालो. आता मी हे प्रकरण इथेच बंद करतो.”

तो क्षणभर स्तब्ध झाला व नंतर शांतपणे बोलला, “त्यानंतर आठवड्याने ती वारली. मिसेस व्हर्जिन चर्चच्या शपथविधीतून गेली आणि तिने समारंभपूर्वक दीक्षा घेतली. तर माझ्या मित्रा, अशी ही कथा आहे. मला हे कबूल केले पाहिजे, की मी त्यात फार चांगला तपास केलेला नाही.”

मी माझी नापसंती दर्शवत बोललो, “पण हा काही पराभव म्हणता येणार नाही. आहे या परिस्थितीत, तुम्ही याहून काय वेगळा विचार करू शकला असता?”

पायरो एकदम जिवंतपणे ओरडला. “अरे पवित्र मित्रा, “तुला हे दिसत नाही का? मी छत्तीस वेळा मूर्ख ठरलो. माझ्या करड्या पेशी, त्यांनी काहीच कार्य केले नाही. सर्व वेळ पुरावे माझ्या हातात होते.”

“कोणते पुरावे?”

“चॉकलेटचे खोके! तुला दिसत नाही का? ज्यांची नजर चांगली आहे, अशा कुणी अशी चूक करावी? मला माहिती आहे मिसेस डेरोलॉर्डला मोतीबिंदू होता --- अॅट्रोपाईन थेंबांवरुन ते मला

समजले. घरात फक्त एकाच व्यक्तीची नजर अशी कमकुवत होती. तिला कळले नाही की कुठले झाकण बदलायचे. त्या चॉकलेटच्या खोक्याने मला योग्य त्या तपासावर आणले आणि तरीही, शेवटपर्यंत मी त्याचे खरे वैशिष्ट्य जाणू शकलो नाही!"

"माझे मानसशास्त्र देखील चुकीचे होते. जर मिस्टर डी सेंट अलार्ड गुन्हेगार असते, तर त्यांनी ती त्याना गुन्हेगार ठरवू शकेल अशी बाटली कधीच कपाटात ठेवली नसती. ती सापडली, हे त्यांच्या निरपराधीपणाचे व निरागसतेचे लक्षण होते. मी आधीच मिस व्हर्जिनकडून ऐकले होते की तो एककल्ली आहे. एकंदरीत पहाता, हे दयनीय प्रकरण होते. ही गोष्ट मी फक्त तुला सांगितली आहे. तुला ती समजली असेल. मी यात यश मिळवू शकलो नाही. त्या वयस्क बाईने तिचा गुन्हा इतक्या साध्या पद्धतीने व हुशारीने कबूल केला, की मी हर्क्युल पायरो पूर्णपणे फसला गेलो. अरे बापरे! मला तर विचारही करवत नाही! विसरून जा --- किंवा नाही --- ती लक्षात ठेव. आणि जर तुला कधी असे वाटले की मी फार फुशारक्या मारतो आहे तर --- म्हणजे तसा संभव कमीच आहे, पण असे होऊ शकते."

मी छुपे स्मित केले.

“ठीक आहे. मित्रा, तेव्हा तू मला म्हणशील, “चॉकलेटचे खोके”. हे ठरले?”

“हा आपल्यातील करार आहे!”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “शेवटी, मला एक नवीन अनुभव मिळाला. सध्या युरोपमधील संशयातीतपणे तल्लख मेंदू असलेलाही क्षम्य ठरू शकतो!”

मी हळू पुटपुटलो, “चॉकलेटचे खोके.”

“काय म्हणालास, मित्रा?”

तो शोधक दृष्टीने पुढे वाकला, तेव्हा मी पायरोच्या निरागस चेहऱ्याकडे पाहिले आणि माझे हृदय थरकापले. मला त्याच्यामुळे नेहमी त्रास होतो. पण माझा मेंदू संशयातीतपणे युरोपमधील तल्लख मेंदू नसला, तरी क्षम्य ठरू शकतो!

मी खोटे बोललो, “हे काही नाही.” आणि स्वतःशी हसत, पाइप पेटवला.

## अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे पंचवीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.


संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५














## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके

ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)














वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे पंचविसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल

(१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२५), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(३) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ

आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।